म. ग्रं. सं. ठाणे

विषय

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

७३

ज्ञाति

मराठी ग्रंथ संग्रहालय

# तुर्क व रशियन लोकांचे लढाईचा इतिहास.

ही लढाई सन १८७७-७८ सालीं झाली.

हा ग्रंथ

गणेश मोरेश्वर सोवनी

व

शिवराम गणपतराव बांब्रस

यांनीं

अनेक इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें तयार केला,

तो

**गणेश मोरेश्वर सोवनी**

यांनीं

पुणें येथें

" श्री शिवाजी " छापखान्यांत छापिला.

( हा ग्रंथ सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें गणेश मोरेश्वर सोवनी यांनीं रजिस्टर केला आहे. मालकीचा सर्व हक्क प्रकाशकाकडे आहे. )

शके १८०२.

सन १८८०.

## प्रस्तावना.

हा इतिहास वाचण्याचे अगोदर तुर्कीचें राज्य किती व कोठें हें समजणें विशेष उपयोगी पडणारें आहे असें समजून त्याची माहिती देण्यांत येत आहे. युरोपखंडाचे अग्नेय कोपऱ्यास हें राज्य आहे. याचा अर्धा भाग युरोपखंडांत व अर्धा एशियाखंडांत आहे. युरोपांतील राज्यांत, थेसली, इपायरस, मासिडोनिया, अलबोनिया, रूमेलिया, बलगेरिया, रूमेनिया, सर्विया, हरजीगोविना, बोसनिया, मान्टनिग्रो आणि बसारेबिया इतके प्रांत आहेत. यांतील रूमेनिया, सर्विया आणि मान्टनिग्रो हीं तीन निराळीं संस्थानें असून त्या प्रांतांचा कारभार तेथील राजांकडेसच आहे. ते स्वामित्वाबद्दल तुर्क सरकारास कांहीं खंडणी देतात. तुर्क राज्यांत राजधानीचें शहर कान्स्टांटिनोपल (इस्तांबूल) आहे. एशियाखंडांतील भागास पूर्वी रूमशाम व आतां एशियामायनर असें म्हणतात. एशियाखंडांतील तुर्की आणि युरोपांतील तुर्की ह्मणण्यापेक्षां एशियामायनर व तुर्की अशीं नांवें देऊन या पुस्तकांत निर्वाह केला आहे.

या राज्यांत थोडें कांहीं कारण झालें कीं युरोपखंडांतील सर्व राष्ट्रें त्या प्रकरणांत हात घालण्याचा प्रयत्न करितात. याचें कारण हें आहे कीं हें राज्य युरोप, एशिया व आफ्रिका या तिन्हीं खंडांत असल्या कारणानें येथील राजाचा भूमध्य समुद्रावर बराच अंमल चालतो, व मोठें आरमार ठेवण्याची तेथें फार उत्तम सोय आहे. याशिवाय पूर्वेकडील देशांत येण्याचा रस्ता ताब्यांत राहून व्यापाराची मोठी सोय होणारी आहे. या सर्व कारणानें तुर्कीचे राज्यास मोठें महत्व आलें आहे; व हें राज्य आपले ताब्यांत असावें अशी प्रत्येक राष्ट्राची इच्छा आहे. हें राज्य ज्याचे हातीं जाईल तो मोठा बलाढ्य होईल या भीतिस्तव व आपणास न मिळालें तर निदान तें राज्य दुसऱ्याचे हातीं जाऊं नये या इच्छेनें सर्व राष्ट्रें तेथील प्रकरणांत पडतात. या राज्याची सध्यां अशी स्थिती

होते. त्यांतून हें उघड रीतीनें झालेलें बंड पाहून आणि साऱ्याची तस्ती लागल्यामुळें पुष्कळ लोक बंडांत सामील झाले. कित्येकांस ठार मारण्याचें व घरें जाळण्याचें भय घालून आपले बाजूस वळेंच ओढून घेतलें. जे वेळेस हा दंगा सुरू झाला ते वेळेस या दंगेखोर लोकांस त्या प्रांताचा मुत्तेसरीफ म्हणजे गवरनर यानें आपले कचेरीस बोलाविलें. हे लोक त्याचे कचेरीस गेले नाहींत एवढेंच नव्हे परंतु कोणी एक मनुष्य कांहीं कामासाठीं त्याचे कचेरीस गेला होता त्यास त्यांनीं ठार मारिलें. अशा रीतीनें बंडाचा फैलाव होऊन मुसलमान लोकांवर जुलूम होऊं लागल्यामुळें तें बंड मोडण्यासाठीं जरी फारसें तुर्की सैन्य त्या प्रांतीं नव्हतें तरी जेवढें होतें तेवढ्याची तुर्क सरकारानें योजना केली. या सैनिक लोकांनीं ख्रिस्ती लोकांचा बराच पाडाव केला, परंतु तेणेंकरून बंडास अधिक तेजी आली, आणि ख्रिस्ती व मुसलमान लोक यांमध्यें अधिक वैमनस्य वाढलें. हें बंड मोडलें असतें परंतु त्यास गुप्त रीतीनें उत्तेजन वरचेवर मिळत होतें व मांट-निग्रन लोकांची उघड मदत होती यामुळें तें बंड समूळ नाहींसें झालें नाहीं. सारा वसूल करण्याचे कामीं कामगार लोकांनीं जुलूम केला हे कांहीं अंशीं खरें आहे, परंतु अशा प्रकारचा जुलूम रयतेवर होत आहे याची खबरही तुर्क सरकारास नव्हती.

सन १८७५चे अगष्ट महिन्याचे २२वे तारखेस कान्स्टांटिनोपल शहरामध्यें युरोपखंडांतील मोठमोठ्या राष्ट्रांचे वकील होते त्यांनीं हरजिगोविना प्रांतामध्यें चौकशी करण्यासाठीं पंच ( कमिशन ) पाठविण्याची सूचना सुल्तानास केली. या वकील मंडळीकडे बंडवाल्यांनीं अर्ज केला, त्यांतील मुख्य कलमें येणेंप्रमाणें:—

"उत्पन्नांतील दहावा हिस्सा सारा घ्यावा असा ठराव असून शेंकडा साडेबारा या मानानें वसूल तुर्क लोकांनीं आम्हाजवळून घेतला आहे. दुष्काळामुळें आम्हास सारा माफ करावा तो, नकरतां अधिक वाढवून जुलमानें कामदार लोक वसूल करीत आहेत. ख्रिस्ती लोकांस जबरदस्तीनें सडकेवर काम करावयास लावतात. लोकांचे घोडे जबरदस्तीनें लष्करचे उपयोगासाठीं धरून नेतात. आह्मांस न्याय मिळत

नाहीं. आमचा जीव, आमची अबरू व आमची मालमत्ता निर्भय नाहीं. असा अनेक प्रकारचा जुलूम आम्हांवर होत असल्यामुळें आम्हीं तुर्की सरकारचे अमलाखालीं राहण्यास खुषी नाहीं"

या अर्जावरून सुलतानानें आक्टोबर महिन्याचे दुसरे तारखेस 'इद्री' नांवाचा व दिसेंबर महिन्याचे १२वे तारखेस 'फरमन' नांवाचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यांत मुसलमान व ख्रिस्ती लोक यांस सारखे रीतीनें वागविण्याचें सुलतानानें कबूल केलें. न्यायांचे कोर्टांची नीट व्यवस्था करून प्रामाणिक, लोकप्रिय, व विश्वासू असे न्यायाधीश नेमण्यांत येण्याची तजवीज केली. राज्य कारभार चालविण्यास लोकांनीं पसंत केलेले लोक घेण्याचें ठरविलें. यांत जातीचा कांहीं भेदाभेद ठेविला नाहीं. मुसलमान व ख्रिस्ती यांमधील भांडणाचा निकाल करण्याचें काम मुलकी कामदाराकडेस सोपविलें. सारा व कर हेही कमी करून उत्पन्नाचा चवथा हिस्सा साऱ्यादाखल घेण्याचें ठरविलें. मक्तेदाराकडून सारा वसूल करण्याची चाल मोडून लोकांनीं पसंत केलेले कामदार नेमून त्यांचे हातून वसूल करण्याची तजवीज योजिली. योग्य फिर्यादीची दाद सुलतानापर्यंत लागावी अशी तजवीज केली.

एशिया मायनर म्हणजे रूमशाम प्रांतांत दुष्काळ पडला होता. तुर्की मधील प्रजेची इतराजी झाली होती, रशियन कर- कार प्रसंगांची वाट पाहात होते, परराष्ट्रांतील जे राजे मित्र होते त्यांनीं आपलें आंग काढून घेतलें, राज्यामध्यें अवाढव्य खर्च असल्यामुळें तुर्क सरकारास पैशाची मोठी अडचण पडली, तथापि सुलतानाचे घरखर्चांत कांहीं काटकसर चालली नव्हती. एका सुलतानासाठीं दररोज ९४पात्रें तयार करावीं लागत असत. दररोज दहाप्रकारचें अन्न तयार होई. त्यांतील जें आवडेल तें सुलतानानें खावें. त्याजवळ खाजगी ८०० घोडे होते. त्याला ७०० बायका होत्या. त्यांस संभाळण्यास ३५० खोजे होते. या एवढ्या मंडळीसाठीं दर वर्षास ४०,००० बैल मारावे लागत. याशिवाय दररोज २०० मेंढे,

१०० बकरीं, ४०० कोंबड्या, २०० खबुतरें व ५० बदकें मारावीं लागत. या सर्वांचा दरवर्षास दोन कोटी रुपयांचा खर्च होता.

सन १८५४ सालापर्यंत तुर्कसरकारास अगदीं कर्ज नव्हते. त्या दिवसापासून कर्जास आरंभ झाला. एकंदर २० वर्षांत १७५ कोटी पौंड कर्ज वाढलें. या कर्जाचे व्याजाची फेड होईना म्हणून सन १८७५ सालीं निमें व्याज रोख व निम्या व्याजाबद्दल नवीन खतें करून देण्या विषयीं जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यामुळे युरोपातील सावकार लोकांत मोठी दिलगिरी उत्पन्न झाली.

सन १८७५ सालीं तुर्कीचे राज्याचें उत्पन्न २,१७,११'७६४ पौन्ड होतें; आणि खर्च २,६२,९९,१७८ पौंड होता. या शिवाय वर सांगितलेले रकमेचें दरसाल१,४०,००,०००पौंड व्याज द्यावे लागत असे. हरजी गोविना प्रांतांत बंड होण्याचे अगोदरच तुर्कराज्याचे जमाखर्चाकडे युरोपखंडांतील शहाणे लोकांचें लक्ष लागले होतें. त्यांतून पुढें लढाई होण्याचीं चिन्हें दिसूं लागल्या मुळें सावकार कर्ज ही देईनात. रशिया, जर्मनी व आस्त्रिया येथील त्रिकूट बादशाहांचा तुर्कीचे संबंधानें कांहीं गुप्त विचार चालू झाला होता. या विचाराने अंतीं आस्त्रिया देशाचे मुख्य प्रधान कौंट अंद्रासी यांनीं अंद्रासी नोट या नांवाची यादी काढली. त्यांतील मुख्य कलमें येणे प्रमाणें:—

तारीख १२ दिसेंबर रोजीं सुलतानानें जो जाहीरनामा काढला त्या प्रमाणें युरोप खंडांतील राष्ट्रांनीं त्यास वागण्यास लावावें. त्यांत लिहिलेल्या सुधारणा अमलांत आणल्या किंवा नाहीं हें पाहाण्यासाठीं पंच नेमावेत. त्यांत निमे मुसलमान व निमे ख्रिस्ती लोक असावेत. सुलतानाचे मुलखांतील पडित जमीन थोडे पैशानें गरीबाकडें लावणीस लावावी. ज्या कामासाठीं कर बसविला असेल त्याचा पैसा त्याच कामास लावावा. सुलतानाचे बोलण्यावर लोकांचा आतां विश्वास नाहीं यास्तव त्याज पासून या शर्ती कबूल केल्या बद्दल त्याची लेखी कबूली युरोप खंडातील इतर राष्ट्रांनीं घ्यावी. युरोप खंडातील राष्ट्रांनीं सुलतानाकडून या अटी ताबडतोब कबूल करून घेणें जरूर आहे. कारण सार्वेया, मांटनिग्रो व बलगेरिया येथील लोकांचीं

मनें अस्वस्थ झालीं आहेत. हे लोक बंड करण्यास प्रवर्त झाल्यास फारच गोंधळ होणार आहे.'

या सूचनेची यादी जेव्हां इंग्लंड देशाचे राजसभे पुढें आली तेव्हां त्यांतील मतलब रशिया वगैरे परमुलखांतील लोकांचा अंमल तुर्क लोकांवर बसून सुलतानाचें स्वातंत्र्य लढाई न करितां नष्ट करावयाचें आहे हें पाहून त्यांनीं यादींतील मतलब तुर्क सरकारास कळविला. सुलतानानें वरकड सर्व अटी कबूल केल्या परंतु बंड झालेल्या मुलखांमधील अमूक कराचा झालेला वसूल अमूकच खर्चाकडे लावावा एवढी शर्त मात्र नाकबूल केली; परंतु त्या पैकीं कांहीं रकम निराळी ठेवून बोसनिया व हरजिगोविना प्रांतांत जरूरीच्या कामाकडे खर्चीं घालण्यांत येईल हें कबूल केलें.

इकडे या गोष्टी चालल्या आहेत तों तुर्कस्थानांत दुसरी एक विलक्षण गोष्ट घडून आली. ती अशी कीं, मासिडोनिया प्रांतांत सालोनिकाचे आखाताजवळ सालोनिका ह्मणून एक गांव आहे. त्या प्रांतीं सन १८७५ सालीं मे महिन्याचे ५ वे तारखेस बलगेरियन जातीचे एका मुलीनें मुसलमानी धर्म स्वीकारला. तो धर्म मी आपले खुषीनें स्वीकारला असें अधिकाऱ्यापुढें कबूल करण्यासाठीं ती मुलगी आगगाडींत बसून सालोनिका येथें गेली. ही बातमी चोहोंकडे पसरली. त्या प्रांतांत जे खिस्ती लोक होते त्यांत असा पुकार झाला कीं, या मुलीला बळेंच मुसलमान केले आहे. या भपकीवर ग्रीक धर्मानुयायी पुष्कळ खिस्ती लोक एकत्र जमा झाले आणि त्या मुलीस मुसलमानांचे हातून सोडवावें असा त्यांनीं निश्चय केला. ती मुलगी आगगाडींतून उतरून गव्हरनरचे बंगल्याकडे जात असतां वाटेंत तीस खिस्ती लोकांनीं गांठले, आणि धरून नेले. दुसरे दिवशीं सुमारे ५००० मुसलमान गवरनरचे घरीं गेले आणि त्यांनीं गवरनरास सांगितलें कीं ती मुलगी परत आमचे स्वाधीन करावी नाहीं तर मोठा अनर्थ होईल. त्यांनी गवरनरानें समजूत घालून त्यांस परत पाठविलें. ते लोक परत आपल्या घरोघर न जातां एका मशिदींत जमा झाले, आणि याच गोष्टीचा विचार करूं लागले, इतक्यांत जर्मन आणि फ्रेंच वकील त्या

ठिकाणीं गेले; नंतर त्यांची व मुसलमान लोकांची कांहीं बोलाचाली झाली, व ती मुलगी जर्मन वकिलाचे घरीं आहे अशी मुसलमान लोकांस बातमी लागली होती, या दोन कारणांवरून भांडण वाढत जाऊन त्या दोन्ही वकिलास मुसलमानांनीं ठार मारलें.

या दोन वकिलास मारलें या कारणानें यूरोप खंडांतील सर्व राष्ट्रांस तुर्क सरकारचा राग आला. फ्रेंच आणि जर्मन सरकारांचीं लढाऊ जहाजें सालोनिकाचे आखातांत येऊन दाखल झालीं. तुर्क सरकारानें त्या वकिलास मारणारांचा शोध करून त्यांस १६ मे रोजीं फाशी दिलें व ठार मारलेल्या वकीलांचे कुटुंबास देण्याकरितां ४०,००० पौंड नुकसानीबद्दल दोन्ही सरकारांस दिले यामुळें तो तंटा मिटला; परंतु मुसलमान व ख्रिस्ती यां मध्यें वैमनस्य अधिक वाढलें.

सालोनिका येथें ही गडबड चालली आहे तोंच मे महिन्याचे ११ वे तारखेस आस्त्रियाचे प्रधान कौंट अंद्राशी, रशियाचे प्रधान प्रिन्सगार्चाकाफ व जर्मनीचे प्रधान प्रिन्सबिस्मार्क हे तिघे कांहीं मसलत करण्यासाठीं बर्लिन येथें जमा झाले. या त्रिवर्गांचा दोन दिवस विचार होऊन तिसरे दिवशीं ह्मणजे मे महिन्याचे १३ वे तारखेस बर्लिन मेमोरांडम या नांवानें एक याद त्यांनीं काढली. यांत लिहिलें होतें कीं कौंट अंद्राशी यांनीं तुर्की मध्यें सुधारणा करण्याचे संबंधानें ज्या सूचना केल्या होत्या त्या सूचना तुर्कीचे सुलतानानें कबूल केल्या असून अंमलांत आणल्या नाहींत. आतां तरी त्या अंमलांत आणविणें हे रास्त आहे. कारण ख्रिस्ती लोकांचा आतां तुर्क सरकारावर भरंवसा राहिला नाहीं. सुलतानानें ज्या सुधारणा करण्याचें कबूल केलें आहे त्या सुधारणा त्याचेकडून अमलांत आणण्यासाठीं हमी घेतली पाहिजे. व त्या अमलांत आल्या कीं नाहीं हें पहाण्यास तेथें जे वकील आहेत तेच पंच नेमावेत. बंडवाल्याबरोबर जी लढाई चालली आहे ती दोन महिने तहकूब करावी. बंडवाल्यानीं जो अर्ज केला आहे त्याचा विचार व्हावा. नेमलेले दोन महिन्यांत बंडवाल्यांचा आणि तुर्क सरकारचा तंटा न मिटेल तर हमीदार राष्ट्रांनींमध्यें पडून तो तंटा तोडावा. या यादीतील सर्व

कलमें यूरोप खंडांतील राष्ट्रांनीं कबूल केलीं परंतु ती याद जेव्हां इंग्लंड देशांतील राजसभेपुढें आली तेव्हां त्यांनीं ती नापसंत करून तिन्ही राष्ट्रांनीं मिळून केलेल्या सुचना व्यर्थ दवडल्या. या कामीं इंग्लंडच्या कारभाऱ्यांचा विचार पूर्वीं घेतला नव्हता, व या सुचने-प्रमाणें तुर्की सरकारच्या कारभारांत हात घालण्याचा परमुलखांतील लोकांस अधिकार नाहीं व तुर्क लोक याप्रमाणें वागण्यास कधीं कबूल होणार नाहींत या कारणामुळें इंग्लंड देशांतील कारभाऱ्यांनीं आपलें मत दिलें नाहीं.

ह्या सूचना निरर्थक होण्याचे पूर्वींच बलगेरिया प्रांतांत बंड उठलें. हा प्रांत यूरोपांतील तुर्की मध्यें आहे. याचे उत्तरेस रोमानिया, दक्षिणेस रूमेलिया पश्चिमेस सर्वीया आणि पूर्वेस काळा समुद्र आहे. यांतील लोक स्लावेनिक जातीचे आहेत. येथें एकंदर तीस लक्ष लोक वस्ती आहे. हे लोक ग्रीक धर्माचे ख्रिस्ती आहेत. सन १३९२ मध्यें हा देश तुर्क लोकांनीं जिंकला, आणि तेव्हांपासून त्यांचेच ताब्यांत आहे. बालकन पर्वत या देशाचे मधून गेला आहे. तेवढी जागा सोडून बाकीचा प्रांत मोठा सुपीक आहे. सन १७६७ मध्यें या लोकांनीं ग्रीक धर्माचा त्याग करून रोमन धर्माध्यक्षाचा आश्रय केला. यामुळें ग्रीक धर्माचे लोकांनीं सुलतानाबरोबर कांहीं बोली करून धर्माचे बाबदीत बलगेरियन लोक आपले हातीं घेतले; आणि पहिले धर्माचे पाद्री होते त्यांस काढून टाकून त्यांचें उत्पन्न आपण घेऊन तेथील पाद्री होऊन बसले. थोडे दिवस गेल्या-वर या पाद्री लोकांचा जुलूम काढून टाकण्यासाठीं बलगेरियन लोकांनीं सुलतानाकडे फिर्याद केली; परंतु धर्माची बाब असल्यामुळें सुलतानानें त्या प्रकरणांत हात घातला नाहीं. पुढें त्या लोकांनीं आपल्या धर्मा-च्या पृथक शाळा घातल्या, आणि आपले स्वतःचे प्रयत्नानें त्या पाद्री लोकांचे जुलमापासून सुटण्याचा प्रयत्न चालविला. सन १८६० सालीं हे लोक ग्रीक धर्माच्या धर्माधिकाऱ्याच्या अमलापासून तुटक झाले.

सुलतानाकडून या धर्माचे बाबदींत कोणास कांहीं वाईट वाटण्या-सारखें वर्तन झालें नाहीं व सन १८७० सालीं बलगेरियन लोकांची धर्मसंबंधी

स्वतंत्रता कबूल केली ह्मणून व वरचेवर मुसलमान लोकांचे बरोबरीनें हक्क मिळत गेल्यानें त्या लोकांची तुर्क सरकाराबद्दल कांहीं कुरकुर नव्हती. येथील सर्वच लोक नवीन झालेल्या तटाचे अनुयायी आहेत असें नाहीं. तथापि सर्व जातीचे सर्व धर्माचे लोक या वेळीं फार राजी व आनंदी होते.

सर्विया, बोसनिया, हरजीगोविना, मांटनिग्रो आणि बलगेरिया इतके देश आपल्या ताब्यात असावे, ह्मणजे कान्टांटिनोपल शहर आपले ताब्यांत येईल तेणेंकरून आपणास मोठें आरमार ठेवितां येईल, आणि भूमध्य समुद्रांत आपलें वरचस्व बसून पूर्वेकडील देशांशीं आपला मोठा व्यापार वाढेल मग आपणासारखे सामर्थ्यवान व संपत्तीवान राष्ट्र जगांत दुसरें मिळणार नाहीं अशी इच्छा रशियन लोकांची फार दिवसांपासून आहे. हे देश लढाई करून घेण्यास युरोपांतील राष्ट्रांचा प्रतिबंध असल्यामुळें उघड रीतीनें रशियन सरकारास तुर्क लोकांबरोबर लढाई करतां येईना; यास्तव त्यांनीं गुप्त कमीटींची स्थापना केली. बाह्यात्कारें ह्या कमीटींचा हेतु स्लाव जातीचे जितके लोक आहेत तितक्यांस फुकट विद्या शिकवावयाची असा होता; परंतु मनांत असा हेतु होता कीं बलगेरियन वगैरे स्लावजातीचे लोक आहेत त्यांस आपलें विद्या शिकवून बंड करावयास लावावें आणि मग त्यांस हाताखालीं घेण्याची संधी सापडेल. हा हेतु पूर्ण करण्याकरितां ओडेसा* वगैरे ठिकाणीं रशियन लोकांच्या शाळा होत्या, त्या शाळेत बलगेरियन लोकांचीं मुलें विद्या शिकविण्यासाठीं फुकट घेऊं लागले. त्या शाळांमध्यें त्या मुलांस रशियन व बलगेरियन हे एक धर्मी व एक जातीचे आहेत यास्तव बलगेरियन लोकांनीं आपले सजातीय लोकांस सोडून पराधीन राहणें योग्य नाहीं असें शिकवीत. त्या मुलांस गोड भाषणामुळें रशियन लोकांची मोठी आवड लागे आणि पुढें शाळा सोडून परत आपले देशीं आल्यावर बलगेरियन लोकांस रशियन लोकांचा ओढा लागेल अशा रीतीनें वागत. या शिवाय त्या गुप्त कमीटीच्या शाखा तुर्कांच्या सर्व राज्यभर होत्या. त्यांनीं ही

* ओडेसा म्हणून रशियाचे राज्यांत काळ्या समुद्राचे कांठीं बंदर आहे.

फितवाफितव करण्याचें गुप्त रीतीनें काम चालविलेंच होतें. अशा रीतीचीं रशियन लोकांचीं कारस्थानें पुष्कळ दिवसांपासून चालू होतीं. तुर्क अमलाखालील ग्रीक धर्मी ख्रिस्ती लोकांचे संबंधानें धर्म संबंधाचे बाबदींत मुख्यपणा रशियानें आपलेकडे सन १८१२ सालचे लढाई नंतर करून घेतला, व धर्माचे मिषानें आपला अधिकार सर्व मुलखावर बसविण्याकरितां पुष्कळ प्रयत्न केले. शेवटीं सन १८६७ सालीं बलगेरियामध्यें राज्यसंबंधानें गडबड झाली. या वेळेस रशियन सरकारानें ग्रीकधर्मानुयायी पुष्कळ लोक बलगेरियांत पाठविले होते. परंतु रशियन लोकांचा प्रयत्न व्यर्थ जाऊन बंडास उत्तेजन देणारे लोकांस बलगेरियन लोकांनींच आपण होऊन बरेंच प्रायश्चित्त भोगावयास लाविलें; तथापि रशियनांनीं आपला प्रयत्न सोडिला नाहीं. सन १८७३ व ७५ सालीं पुनः गडबड करण्याचा प्रसंग त्यांनीं आणिला होता; परंतु दोन्ही वेळेस तुर्क सरकारानें ताबडतोब चांगला बंदोबस्त केल्यामुळें गडबड मोडली गेली. सन १८७६चे मे महिन्याचे पहिले तारखेस मोठी गडबड करण्याचें रशियन लोकांनीं आपलें गुप्त कमेटींत ठरविलें. या विचारास बलगेरियन लोक अनुकूळ नव्हते. कारण तुर्क सरकारानें तेथें सुधारणा चांगली केली असल्यामुळें लोक बरेच खुषी होते, परंतु उठावणी करणारांनीं त्यांस सांगितलें कीं, तुम्ही पुढें होऊन बंडास आरंभ करा. तुह्मांस हत्यारें दारूगोळा व सैन्य वगैरेची मदत बाहेरून येईल एवढेंच नव्हे परंतु तुमचे घरादाराचा व मालमत्तेचा जो नाश होईल ती नुकसानी भरून देण्यासाठीं सोन्याचे नाण्यांनीं भरलेल्या पेट्या रशियांतून येतील. अशा प्रकारें तुमचें नुकसान न होता तुह्मांस जर स्वतंत्रता मिळत आहे तर मग परतंत्र राहण्याची इच्छा कां बरें करतां ?" बलगेरियन लोक पुढें होऊन बंडास आरंभ करणार नाहींत असें समजून रशियन लोकांनीं कांहीं लोक आपल्या देशांतून पाठविले. यांची अप्रेल महिन्यांत बुखारेस्ट येथें गुप्त सभा भरली. त्यांनीं मसलत ठरविली कीं, मुसलमान लोकांची कत्तल उडवावी, मोठमोठालीं शहरें जाळावीं, आगगाडीचे रस्त्यावरील रेल उपटून टाकावे, आगगाड्या मोडाव्या, पुष्कळ ठिकाणीं

लुटावीं व जाळावीं. तातर-बाजारजिक शहरावर हल्ला करून सरकारी कांच्या आपल्या ताब्यांत घ्याव्या, यास जर बलगेरियन लोक अनुकूळ न झाले तर त्यांस भय घालून दावदडव करून हें काम करण्यास लावावें. या मसलतीप्रमाणें उद्योग करण्यास ते लोक लागले. परंतु संकेत केलेल्या मुदती पूर्वीं बलगेरियन लोकांपैकीं टण्को नांवाच्या एका साथिदारानें ही बातमी तुर्क अधिकाऱ्यांस कळविली. तीन महिने फितवाफितव करण्याचें काम रशियन दूत करीत होते.

बालकन पर्वतामध्यें कांहीं खेडीं होतीं त्या खेड्यांमध्यें हे लोक राहत होते. त्यांनीं रशिया, रुमानिया व सर्विया येथून दारुगोळा व हत्यारें आणून ठेवलीं होतीं. बलगेरियाचे गव्हरनरास ही बातमी लागल्याबरोबर त्यानें 'अक्मन आगा' यास 'आटलेकाई' येथें व 'नजीबअगा' यास 'अन्वात आलन' येथें कांहीं पोलिस शिपाई बरोबर देऊन पाठविलें. ते दोघेजण नेमलेले गांवीं गेले आणि लोकांची बंड करण्याची तयारी पाहून 'नजीबअगा' यानें दोन दंगेखोरांस धरून कैदेंत घातलें. हें कृत्य पाहून बंडांतील जे पुढारी होते ते लढाईस तयार झाले आणि कैद केलेले मनुष्यास सोडून द्या अशी त्या अधिकाऱ्याजवळ मागणी केली; आणि एकदम त्याचे व त्याचेबरोबर जे शिपाई होते त्यांचेवर हल्ला करून शिपायांजवळचीं हत्यारें हिसकावून घेतलीं. या गडबडींत नजीबआगाला फुरसत सांपडली तेवढ्यांत तो पळून गेला. परंतु त्यासही थोड्या जखमा लागल्याच होत्या. ही बातमी तुर्क सरकारास लागल्याबरोबर त्यांनीं फिलीपोलिस येथें जें सैन्य होतें त्यास त्या गडबड झालेले अन्वात आलन गांवीं पाठविलें. हें सैन्य त्या ठिकाणीं जाण्याचे अगोदरच बंडवाले लोकांनीं कित्येक मुसलमान लोकांची कत्तल उडविली. अशा रीतीनें बंडाची उभारणी करून त्यांनीं आपले सैन्य साहा ठिकाणीं गोळा करून व तेथें किल्ले, मोरचे वगैरे तयार करून ते मदत येण्याची वाट पाहात बसले. बंड मोडण्या इतकें सैन्य ह्या प्रांतीं तुर्क सरकाराजवळ नसल्यामुळें नवीन उमेदवार मुसलमान होते त्यांचीं सैन्यांत भरती करून त्यांस फिलीपोलिस व बाजारजिक येथें जमा केलें; याशिवाय आणखी दुसरीकडून सैन्याची मदत

वा. ३, ५५/२



आणली. या सर्वांनीं मिळून तें बंड मोडलें, परंतु मुसलमान लोकांनीं, रागाचे आवेशांत बुलगेरियन लोकांवर मोठा कहर केला.

अशा वेळेस तुर्क लोकांचा सुलतान अबदुल अझीझ हा निर्बल व दुर्व्यसनी असल्यामुळें जनरल इग्नेटीफ नांवाचे रशियन वकिलाचे सुलतानावर मोठें वजन होतें. तो सांगेल त्याप्रमाणें सुलतान वागत असे. या वकिलानें सुलतानास असें सुचविलें कीं हें क्षुल्लक बंड आहे, यावर उत्तम सैन्य पाठविण्याची कांहीं जरूर नाहीं. बाशी बुझूक, सरकयाशियन् वगैरे अशिक्षित बाजारबुणगे सैन्य पाठवून त्याचे हातून याचा शेवट करावा. अशा लोकांचे हातून बंड मोडविल्यास लोकांवर जुलूम होईल आणि मग आपले सरकारास मध्यें पडण्यास सवड सांपडेल असा त्या वकिलाचा हेतु होता. सर हेन्री एलियट नांवाचा इंग्रज सरकारचा वकील तेथें होता. त्यानें अशा लोकांकडून बंड मोडवू नये ह्मणून सुलतानास पुष्कळ वेळ सुचविलें, परंतु त्याचे सांगण्याचें वजन पडलें नाहीं.

या अशिक्षित सैन्यानें पुष्कळ निरपराधी खिस्ती लोकांस मारिलें असा चोहोंकडे बोभाट झाला. कोणी ४००० पासून १२००० पर्यंत, कोणी २५०००, कोणी ४००००, कोणी ६०००० लोक मारिले असें ह्मणत होते. रशियन सरकारचे एजंटांनीं व बलगेरियन लोकांनीं अर्पण होऊन आपलींच कित्येक गांवें जाळिलीं आणि ५२० मुसलमान उगीच मारिले. या सर्व गोष्टी स्वतंत्र शोधाअंतीं अशा निर्णयास आल्या आहेत कीं एकंदर तुर्क लोकांनीं सुमारें १०० गांवें जाळिलीं व १८३६ खिस्ती लोक ठार मारिले. ही गोष्ट तुर्क सरकारानेंही कबूल केली आहे.

खिस्ती लोकांची मुसलमानांनीं मोठी कत्तल उडविली असा बोभाट सर्व युरोपखंडभर झाला. मोठमोठाले राष्ट्रांनीं तुर्क सरकारास याबद्दल बराच दम दिला. यावरून तुर्क सरकारानें अपराधी लोकांची चौकशी करून सरासरी दोनचार मुख्य पुढारी माणसें कैदेंत टाकलीं. कांहीं लोकांची नुकसानी भरून देण्याचें सुलतानानें कबूल केलें. तसेंच

जीं जीं गांवें जाळलीं होतीं तेथील साराही माफ करण्याचा व यांस नवीं घरें बांधून देण्याचा सुलतानानें हुकूम दिला.

अशा प्रकारची गडबड राज्यामध्यें चालली आहे तोंच मे महिन्याचे १२ वे तारखेस कान्स्टांटिनोपल शहरीं मोठी गडबड झाली. महमूद पाशा मुख्य वजीर होता त्यास काढून त्याचे जागीं महमद रशदी यास नेमिलें. हा वजीर झाल्यावर त्यानें बादशहास घरगुती खर्च कमी करण्यास सांगितलें व बादशहाचा अधिकार कमी करण्याचा यानें प्रयत्न चालविला. हें बादशहास आवडलें नाहीं. पुढें प्रधान मंडळीचें व बादशहाचें वाकडें आलें.

एका मनुष्यासाठीं सर्व देशाचें नुकसान करून घेऊं नये असा प्रधान मंडळीनें बेत करून सुलतानास पदभ्रष्ट करण्याचा निश्चय ठरविला. मुख्य प्रधान महमद रशदी, लष्करी प्रधान हुसेन आवनी, मिधत *पाशा वगैरे मंडळी या कटांत होती. ही बातमी हाफिजपाशानें २९ वे तारखेचे रात्रीस सुलतानास कळविली. सुलतानानें आपले प्रधान मंडळीस बोलावणें पाठविलें परंतु कोणी आला नाहीं. ते सर्व त्या रात्रीं विचार करण्यास्तव एका ठिकाणीं जमले होते. त्यांनीं महमद मुराद एफंडी यास गादीवर बसविण्याचा विचार केला. हा अबदुलअझीझचा पुतण्या होय.

ठरविल्याप्रमाणें रेडीफ पाशानें सुलतानाचा वाडा समुद्राचे बाजूनें जहाजांनीं व जमिनीवर पायदळाकडून घेरिला. ज्या राजपुत्रास गादीवर बसविण्याचा बेत केला होता त्यास सुलतानानें राजवाड्यांतच आपले आटकेंत ठेविलें होतें. हें पाहून हुसेन अवनी पाशा स्वारांचा एक रिसाला बरोबर घेऊन राजवाड्याजवळ गेला; आणि तेथील चाकर लोकांस फितवून त्यानें राजपुत्रास हळूच बाहेर काढिलें आणि गाडींत बसवून सेरास्किरेट ह्मणून राजदरबारची जागा आहे तेथें नेऊन पाचवा सुलतान मुराद या नांवानें त्याची द्वाही फिरविली. या वेळेस मक्केचा मुख्य

*पाशा म्हणजे सरदार, मिधत पाशा प्रथम बलगेरिया देशाचा गवरनर होता. नंतर त्यास कारभारी मंडळीतील एक जागा दिली होती.

शेरीफ तेथें होता व तो या गोष्टीस अनकूल होता यामुळें लोकांनीं ह्या मुरादास राजा असें कबूल केलें. नवा राजा झाल्याची बातमी जागोजागचे वकिलास तारायंत्राचे द्वारें कळविली. अशाप्रकारें तुर्कस्थानांत नवा राजा झाला.

ही गडबड पाहून अबदुल अझीझ जनानखान्यांत जाऊन जिवाचे भयास्तव लपला. सकाळचे प्रहरीं रेडिफ पाशा कांहीं सरदार बरोबर घेऊन राजवाड्यांत माजी सुलतानास भेटण्यास गेला. कांहीं खोजे लोकांनीं यांस अडथळा केला परंतु त्यांस त्यांनीं बांधून टाकिलें. अबदुल अझीझ याला रेडिफपाशा भेटण्यास आल्याची बातमी कळली परंतु तो त्याचे भेटीस येईना. यावर रेडिफपाशानें निरोप पाठविला कीं जर आपण बाहेर येऊन आह्मांस भेटणार नाहीं तर आह्मांस जनानखान्यांत शिरणें भाग पडेल. या निरोपाबरोबर अबदुल अझीझ व त्याची आई असे दोघे बाहेर आले. तेवेळेस रेडिफपाशानें त्यास सांगितलें कीं आतां आपलें राज्य नाहीं आपण राजवाडा मोकळा करावा. अबदुल अझीझला हें खोटें वाटलें, परंतु रेडिफपाशानें निक्षून सांगितलें कीं खिडकी उघडून बाहेर पहा. अबदुल अझीजनें चोहोंकडून वाडा वेढलेला पाहून रेडिफ पाशास सांगितलें कीं आपणास वाटेल त्याप्रमाणें माझी व्यवस्था करा. मग त्या सुलतानास सेराग्लिओ* पाईंट येथें एक जुना राजवाडा आहे तेथें होडींत बसवून नेऊन ठेवलें.

पाचवा मुराद बादशहा गादीवर बसला तेव्हां त्याचें वय ३६ वर्षांचे होतें. हा शरीरानें अशक्त, मनाचा दुर्बळ जगाची माहिती नाहीं असा होता. याचा गादीवर बसेपर्यंत जन्म बायकांत गेला होता. हा केवळ प्रधान मंडळाचे सांगण्याप्रमाणें वागणारा होता. यानें आपला घरचा बराच खर्च कमी केला आणि खाजगी उत्पन्नापैकीं पुष्कळ उत्पन्न खजिन्याकडे लावून दिलें, अबदुल अझीजनें आपल्या पुतण्यास पत्र लिहिलें कीं 'आपल्यास राज्य मिळालें हें पाहून मला मोठा आनंद झाला आहे. आपण मला सेराग्लिओ येथें ठेवलें आहे तेथून काढून शेरागान येथें ठेवावें.' सांगितल्याप्रमाणें त्यास कुटुंबासहवर्तमान शेरा-

* कान्स्टांटिनोपल शहराजवळच हे जुनें राजवाडे आहेत.

गान येथें नेऊन ठेवलें. तारीख ३१ मे पासून तो वेड्यासारखा करूं लागला; व कांहीं खाईनासा झाला, शेवटीं १४ जून रोजीं आत्महत्या करून घेऊन मरण पावला.

एक घोटाळा संपतो तोंच दुसरा घोटाळा कान्स्टांटिनोपल शहरांत उद्भवला. जून महिन्याचे १५ वे तारखेस या नवीन प्रधान मंडळीची सभा मिधतपाशाचे घरीं जमली असतां हासन नांवाचा एक सरक्याशियन जातीचा सरदार तेथें गेला, आणि त्यानें एकदम हुसेन अवनी पाशावर गोळी घातली. हें पाहून रशिदपाशा व अहमद कईसरली शिवाय करून बाकीचे सभासद पळून एका खोलींत जाऊन लपले. रशीदपाशा जागचे जागींच घाबरून स्तब्ध बसला. अहमद मात्र त्या मारेकऱ्याचे आंगावर धावून गेला आणि त्यानें त्याचे दोन्ही हात धरले. मारेकऱ्यानें आपला उजवा हात त्याचे हातून हिसकावून काढून चाकूनें त्यास जागोजाग जखमा केल्या. मग महमद ही पळून गेला. गोळीनें हुसेन अवनी कांहीं मेला नाहीं तो हळूं हळूं ज्या ठिकाणीं दुसरे लोक लपले होते त्या खोलीकडे रांगत चालला होता. त्यास मारेकऱ्यानें चाकूचे वार करून ठार मारिलें. इतका वेळ पर्यंत रशीदपाशा आपल्या जागींच स्तब्ध होता. त्यासही गोळी घालून मारेकऱ्यानें मारिलें. नंतर तो मारेकरी ज्या खोलींत लोक लपले होते तेथें गेला. दार लावलेलें आहे हें पाहून त्यानें मुख्य प्रधानाला हाक मारून सांगितलें कीं तुह्माला मारण्याचा माझा हेतु नाहीं तुह्मी दार उघडा. त्यास वजीरानें उत्तर दिलें कीं यावेळेस तूं रागांत अहेस याकरितां आतां दार उघडीत नाहीं. असे उत्तर मिळाल्याबरोबर त्या मारेकऱ्यानें दाराचे भोंकावाटें गोळी घातली, परंतु ती कोणास लागली नाहीं. अहमद आगा व चर्केब्रे असे दोघे खोलींतून बाहेर आले. त्या दोघांसही त्या मारेकऱ्यानें ठार मारलें. इतक्यांत त्याठिकाणीं कांहीं पोलीसचे व कांहीं लष्करी लोक आले. त्यांनीं त्या खुनी मनुष्यास धरलें परंतु यांतील ही एक मनुष्य त्यानें मारला व सहा असामी जखमी केले. या मारेकऱ्यास १७ वे तारखेस फाशी दिले.

अशा प्रकारची गडबड कान्स्टांटिनोपल शहरीं चालू झाल्यावरून

तुर्कांचें राज्य खास बुडतें असें लोकांस वाटूं लागलें. असाच ग्रह सर्वियाचे राजाचा ही झाला आणि तुर्की लोकांपासून सुटका करून घेण्याची हीच वेळ आहे असें त्यानें मनांत आणलें. बोसनिया व हरजीगोविना येथील लोकांचा पक्ष धरून तुर्की सरकाराबरोबर लढाई करावी असें सन १८७६ सालचे आरंभापासून त्याचे मनांत यावयास लागलें होतें; परंतु हा स्वतंत्र होण्याचा हेतु उघड रीतीनें दाखवितां येत नव्हता ह्मणून त्यानें खोटा बहाणा केला तो असाकीं हरजिगोविना व मांटनिग्रो हे दोन प्रांत जर एकत्र केलें किंवा आस्त्रियाचे बादशहानें आपलें सैन्य बोसनिया प्रांतांत पाठविलें तर आमचे संस्थानचे बचावाकरितां आह्मांस खचीत लढाई करावी लागेल असें सर्वियाचा राजा प्रिन्स मिलन यानें फेब्रुवारी महिन्याचे ८ वे तारखेस प्रसिद्ध करून लढाईचे तयारीस लागला. यास रशियाची आंतून मदत होती. जनरल चिरनीफ नांवाचे सरदारास सर्वियाचे राजाचे चाकरीस जाऊन राहण्याची रशियन सरकारानें परवानगी दिली. सर्विया देश रुमेनिया, बलगेरिया, बोसनिया व अलबेनिया इतक्या प्रांतांस लागून आहे. हा देश १५५ मैल लांब आणि १५० मैल रुंद आहे. हा डोंगराळ असून यांत सुमारें १५ लक्ष मनुष्यांची वस्ती आहे. हे लोक स्वरूपानें मोठे सुंदर आहेत. हे स्लाव जातीचे असल्यामुळें यांस रशियन लोकांचा मोठा ओढा आहे. येथील राजास तुर्कांचे सरकारास स्वामित्वाबद्दल दरसाल वीस हजार पौंड खंडणी द्यावी लागते.

जूनचे २२ वे तारखेस प्रिन्स मिलन यानें तुर्कांचे मुख्य वजीरास पत्र लिहिलें, आणि जुलै महिन्याचे पहिले तारखेस आपले राज्यांत जाहिरनामा प्रसिद्ध केला तो येणेंप्रमाणें:—बोसनिया व हरजिगोविना प्रांताचे लोकांनीं स्वतंत्र होण्याचे कामास आरंभ केला आहे तेंच काम करून आपल्यास तुर्कांचे जुलमापासून सोडवावें. आपण आपले देशाचे कल्याणासाठीं लढाई करणार. कोणाचा नाश करावा ह्मणून किंवा कोणाचे राज्यांत राज्यक्रांति व्हावी ह्मणून लढाई करतों असें नाहीं. आपले देशांत व्यवस्था राहावी, आपली मालमत्ता निर्भय असावी व आपले हक्क संभाळले जावेत म्हणून आपण लढाईस तयार

झाल्यों आहों. सर्वियन लोक मोठे नीतिमान आहेत अशी अब्रू मिळवा. शेजारचे राजांचे सरहद्दींत जाऊं नका. बांधवहो, तुम्ही खरे देशाभिमानी व शूर आहात अशी माझी खात्री आहे म्हणून मी या लढाईस आरंभ केला आहे. मी तुम्हांबरोबर तुमचे स्वामित्व पत्करून येतो. आपणास आपले भाऊ मान्टनिग्रन लोक मदतीस आहेत. याचप्रमाणें हरजिगोविनाचे शूर लोक आपले मदतीस आहेत. आपली पाठ राखण्यास बोसनियन लोक आहेत. बलगेरियन लोक आपली वाट पहात आहेत, व 'थेमिस्टाक्लीस' सारख्या महापुरुषाचे कुळांत उत्पन्न झालेले जे ग्रीक लोक ते परतंत्र होऊन स्वस्थ बसणार नाहींत. शिपाई बहादरानों, पुढें चाल करा. देवाचें नांव घ्या. तोच यश देणारा आहे. आपले हक्क आपली स्वतंत्रता व सुधारणा इतक्यांचें साधन करावयाचे आहे हें मनांत वागवा. तुमचें कल्याण असो व तुह्मास यश मिळो."

सर्वियाचे राजानें लढाईचा जाहीरनामा लावल्यानंतर पाठोपाठ तारीख २ जुलै रोजीं मान्टनिग्रोचे राजानें लढाईचा जाहीरनामा लावला. मान्टनिग्रो हें फार लहान संस्थान आहे. येथें सुमारें १२०००० मनुष्यवस्ती आहे. हे लोक मोठे शूर व धीट आहेत. यांस ग्रीक धर्माचा मोठा अभिमान आहे. हेही स्लावोनिक जातीचेच आहेत. यांच्या व तुर्क लोकांच्या नेहमी लढाया होतात. शेवटची लढाई सन १८६१ सालीं झाली तींत मान्टनिग्रन लोकांचा 'ओमरपाशानें' अगदीं पराभव केला. आणि त्या दिवसापासून त्यांनीं तुर्क सरकारचें स्वामित्व कबूल केलें. तथापि पुन: लढाई करण्याची त्यांची उमेद कांहीं गेली नव्हती. त्यांस आनायासें मिळालेले संधीचा त्यांनी लागलीच उपयोग करून घेतला.

मान्टनिग्रन लोकांची नेहमी लढाई चालते यामुळें या लोकांनीं लढाईची तयारी केली यांत कांहीं नवल नाहीं, परंतु सर्वियन लोकांनीं तुर्क सरकाराबरोबर लढाई करणें ह्मणजे केवळ अन्याय करणें होय. कारण सर्वियन लोकांवर तुर्क लोकांचे फार उपकार झाले आहेत; आणि कांहीं कारण नसतां उगीच लढाईस प्रवृत्त झाले हें केवळ रीश-

यन सरकारचे सांगण्यावरून त्यांनीं हें काम केलें असावें हें खचीत आहे; कारण लांगवर्थ म्हणून इंग्रज सरकारचा वकील बेलग्रेड शहरीं होता त्यानें आपले सरकारास लिहिलें कीं, रशियन सरकाराकडून फितूर करणारे लोक सर्विया देशांत आले आहेत. त्यांनीं आपलीं नांवें बदलून मुसलमानांसारखीं नांवें धारण केलीं आहेत. त्यांचा ख्रिस्ती लोकांवर हल्ला करून गडबड सुरू करण्याचा बेत आहे." ह्या गोष्टी घडून येण्याचे अगोदर ह्मणजे सन १८६२चे सुमारास रशियन लोकांचे सांगणीवरूनच सर्वियन लोकांनीं मुसलमान लोकांची अशी कत्तल उडविली कीं, प्रेतें गाड्यांत घालून न्यावीं लागलीं. या वेळेस देखील तुर्क सरकारानें सर्वियन लोकांस क्षमा केली. नंतर रशिया देशांतून हत्यारें व दारू गोळयांची मदत सर्वियन लोकांस येऊं लागली; ह्मणून तुर्क सरकारानें आपलें सैन्य सर्विया देशाचे सरहद्दीवर पाठविलें. हें पाहून युरोपखंडातील ख्रिस्ती सरकारांनीं एकदम चोंहोंकडून ओरडा ओरड केली; यामुळें तुर्क सरकारास आपलें सैन्य माघारें नेणें भाग पडलें. अशा प्रकारच्या पूर्वापार घडून आलेल्या गोष्टी सध्याचे लढाईस कारणीभूत झाल्या.

रशियन सरकाराकडून मदत मिळेल या भरंवशावर व कदाचित् पराभव झाल्यास युरोपांतील मोठीं राष्ट्रें आपणास बुडूं देणार नाहींत या खात्रीवर सर्वियन राजानें तुर्क सरकाराबरोबर लढाई आरंभली. या वेळेस सर्वियन सरकाराजवळ दोन लक्ष ब्रिचलोडिंग बंदुका, एक लक्ष मझललोडिंग बंदुका व बारा तोफांची एक बातरी अशा २९ बातरी तोफा होत्या. दारूगोळाही पुष्कळ होता. २,९०,००० मनुष्यांस पुरतील इतक्या भाकरी दररोज तयार होण्याचीं यंत्रें सरहद्दीवर पाठविलीं. इस्पितळांसाठीं शाळांच्या जागा रिकाम्या करविल्या. याशिवाय सरहद्दीवरच्या सरकारी इमारती दारूगोळा व अन्न सामुग्री ठेवण्यासाठीं घेतल्या.

अशा प्रकारची तयारी करण्याचें कारण तुर्क सरकारानें सर्वियाचा राजा प्रिन्स मिलन यास विचारिलें. शेजारचे प्रांतांत गडबड चालली आहे याकरितां सरहद्दीचें संरक्षण करण्यासाठीं ही तयारी केली आहे

असें त्यानें उत्तर दिलें; आणि आपला एक वकील कान्स्टांटिनोपल येथें सुलतानाकडे पाठविला. एवढ्या सांगण्यावरून तुर्क सरकारचें समाधान झालें नाहीं. त्यानीं जूनचे १० वे तारखेस सर्वियाचे राजाला तीन पत्रें पाठविलीं. पहिले पत्रांत बाकी राहिलेले खंडणीचा ऐवज मागितला. दुसरे पत्रांत सर्वियन राजानें एकदम आपलें सैन्य सरहद्दीवरून मागें न्यावें असें लिहिलें होतें; आणि तिसरें पत्र पाचवे मुराद बादशाहाची बेलग्रेड येथें द्वाही फिरवावी व १२१ तोफांची सलामी द्यावी याबद्दलचें होतें. या तिन्ही पत्रांचें उत्तर न देतां व त्याप्रमाणें न वागतां उलटें अधिक सैन्य त्यानें सरहद्दीवर पाठविलें. नंतर तुर्कांचे मुख्य प्रधानास एक पत्र लिहिलें आणि लढाईची प्रसिद्धी केली. याच वेळेस मान्टानिग्रन सरकारानेंही वर्तमानपत्रांतून लढाईची प्रसिद्धी केली.

सर्वियन सैन्यावर जनरल चरनीफ नांवाचा रशियन सरदार मुख्य सेनापती होता. त्यानीं आपले सैन्याची मुख्य जागा आलेक्झीनाज येथें केली. यांचे एकंदर ९०,००० सैन्य जमा झालें होतें. या सैन्याचे त्यांनीं दोन तुकडे केले. निश्च येथें तुर्क सरकारचें ३९,००० सैन्य होतें. या सैन्यावर अबदूल करीमपाशा मुख्य होता. यानें दोन तीन लढायांत सर्वियन लोकांचा पराभव करून त्यांस परत आपले देशांत घालविलें. ३१ जुलै रोजीं तुर्कांचें सैन्य सर्वियांत शिरलें; आणि कुझाझेवेज येथें पुनः सर्वियन सैन्याचा तारीख ९ आगष्ट रोजीं पराभव केला; आणि आलेक्झीनाझ येथें तुर्की सैन्य जाऊन पोहोंचलें. सेप्तेंबरचे पहिले तारखेस तें शहर तुर्क सैन्यानें घेतलें. सर्वियन लोकांस मदत करावी ह्मणून रशिया देशांतून सरदार व शिपाई उघड रीतीनें येऊं लागले. ही मदत वरचेवर येऊं लागली तेणेंकरून सर्वियाचे राजास मोठा आनंद झाला; परंतु लोकांस वाटूं लागले कीं, आतां आपणास रशियन सरकारचें अंकित व्हावें लागेल ह्मणून ते रशियन शिपायांचा द्वेष करूं लागले. त्याचप्रमाणें रशियन शिपाई ही त्यांचा द्वेष करूं लागले.

आलेक्झीनाज येथें जे दिवशीं सर्वियन सैन्याचा पराभव झाला तेच

दिवशीं सर्वियाचे राजानें लढाई बंद करण्यासाठीं इंग्रज सरकारास मध्यस्तीस घातलें. खालीं लिहिलेले अटीवर तुर्क सरकार ही तह करण्यास कबूल झालें; त्या अटी येणेंप्रमाणें:—

१ मिलन राजानें कान्स्त्यांटिनोपल शहरीं येऊन सुलतानास आपली स्वामिभक्ती दाखवावी.

२ सर्विया देशांतील ४ किल्ल्यांत तुर्कांचे सैन्य असावें.

३ सर्वियाचे राजानें १०,००० पेक्षां अधिक सैन्य ठेवूं नये, व फक्त दोन बातरी तोफा ठेवाव्यात.

४ नवीन बांधलेले किल्ले सर्व पाडावें.

५ सर्विया देशांत अगगाडी करण्याचा अधिकार तुर्क सरकारास असावा. सर्वियन राजानें जास्ती खंडणी द्यावी किंवा तुर्क सरकारचें झालेलें नुकसान भरून द्यावें.

ह्या अटी इतर सरकारांनीं कांहीं कबूल केल्या नाहींत. सप्तेंबरचे २५ तारखेपर्यंत लढाई तहकूब करण्याचें मात्र सुलतानानें कबूल केलें. ही मुदत संपेपर्यंत रशिया देशांतून पुष्कळ सैन्य सर्वियाचे मदतीस आलें. मुदत संपताच पुन्हा लढाई सुरू झाली. २६,२७,२८ आणि २९ सेप्तेंबर रोजीं ज्या लढाया झाल्या त्यांत तुर्क शिपायांनीं आपले शौर्याची कमाल करून सर्वियन सैन्याचा अगदीं पराभव केला. आक्टोबरचे २३ वे तारखेस जुनिस शहर तुर्क सैन्यानें घेतलें; आणि नोवेंबरचे पहिले तारखेस डेलीग्रेड घेतलें. हें शहर घेतलें तें दिवशीं सर्वियन सैन्याची अगदीं पळापळ झाली व सर्व सर्विया देश तुर्क सरकारचे हातीं आल्या सारखा झाला.

ह्या गोष्टी घडून येण्याचे अगोदर कान्स्त्यांटिनोपल शहरीं दुसरीच एक गडबड झाली. पांचवा मुराद सुलतान हा दुर्बळ व मतीहीन राजा होता असें मागें सांगितलेंच आहे. राज्यांत असा घोटाळा झालेला पाहून तो बिचारा अगदीं घाबरून गेला, आणि भ्रमिष्टा सारखा करूं लागला. यामुळें आगष्ट महिन्याचे ३१वे तारखेस त्यास गादीवरून काढलें आणि त्याचा भाऊ अबदूल हमीद म्हणून होता त्यास

गादीवर बसविलें. याचें वय ३४ वर्षांचें होतें. याची शरीर संपत्ता चांगली असून हा मोठा शहाणा आहे असें म्हणतात.

वास्तविक म्हटलें असतां ख्रिस्ती लोकांनीं मुसलमानांवर जुलूम केला असा बोभाट व्हावा. तो तसा न होता मुसलमान लोकांनीं ख्रिस्ती लोकांवर मोठा जुलूम केला असा सर्व वर्तमानपत्रांतून गवगवा चालू झाला.

सर्विया, बोसनिया, मान्टनिग्रो व बलगेरिया या देशांतील लोकांस उद्देशून असें एक पत्र लिहिलें होतें कीं, ज्या लोकांनीं तुमचा नाश केला व तुमचा देश उध्वस्थ केला त्यांची जाळी मुळी खणून काढा. हजारों ख्रिस्ती लोक मुसलमानांनीं मारले त्यांचा सूड उगवा. ज्यांनीं तुमच्या आया बहिणींची अब्रू घेतली त्यांच्या आया बहिणींची आब्रू तुम्ही घ्या. या तुर्क लोकांनीं सुधारणुकेस काळीमा लावली एवढेंच नव्हे परंतु परमेश्वरानें दिलेल्या स्वभावास डाग लाविला आहे. या तुर्क लोकांनीं केलेलीं कृत्यें ऐकून ज्याचें आंगावर कांटा उभा राहणार नाहीं असा अधम, पाषाण हृदयीं मनुष्य या जगांत सांपडणार नाहीं. या लोकांस तुम्ही आतां सोडल्यास ते तुमचा सूड घेतल्याशिवाय कधीं राहणार नाहींत. यांचे अघोर कृत्यामुळें यांची चोहोंकडे बेअब्रू झाली आहे तर अशा वेळेस आपला हेतु पूर्ण करून घ्या. अशी वेळ पुनः येणार नाहीं यासाठीं ही वेळ व्यर्थ घालवूं नका. यांचा निःपात केल्याशिवाय राहूं नका. तुमचे रक्षण करण्यास मोठमोठीं राष्ट्रें तुमचे पाठीवर आहेत. भिऊं नका. हें माझें वारंवार सांगणें आहे. जगांत कधीं कोणावर जुलूम झाला नसेल असा जुलूम तुह्मांवर होत आहे. असें दुष्ट सरकार पूर्वींही झालें नाहीं व पुढेंही होणार नाहीं तर त्यास शिक्षा केल्याशिवाय राहूं नका. याप्रमाणें इंग्लंडांत गडबड झाल्यामुळें इंग्रज सरकारानेंही ख्रिस्ती लोकांस स्वतंत्रता द्यावी व ज्यांनीं बलगेरियन लोकांचा छळ केला त्यांची चौकशी करून त्यांस शिक्षा द्यावी असें सुलतानास कळविलें. ग्ल्याडस्टन साहेबांनीं या जुलमाबद्दल पुष्कळ लेख प्रसिद्ध केले.

बोसनिया, हरजिगोविना व बलगेरिया येथील लोकांस प्रथम

बंड करण्यास लावलें. नंतर सार्वियन लोकांस सैन्याची व दारू गोळ्याची मदत करून लढाई करण्यास लाविलें तथापि रशियन सरकाकारचा हेतु सिद्धीस गेला नाहीं. हें पाहून सप्तेंबर महिन्याचे २६ तारखेस रशियन सरकारचे मुख्य प्रधान प्रीन्स गाचीकाफ यानीं इंग्रज सरकारचे परदेशसंबंधी प्रधान लार्ड डर्बी ह्यास निरोप पाठविला कीं, तह करण्याची अटी आपण तुर्क सरकारास सांगूं आणि जर त्या अटी त्या सरकारानें नाकारल्या तर बोसनिया देश आस्त्रियाचे बादशहानें आपल्या ताब्यांत घ्यावा. बलगेरिया आम्ही ताब्यांत घेतो आणि बाकीचे राष्ट्रांचे आरमारानीं बासफरसचे सामुद्रधुनीमध्यें यावें. अशा रीतीनें तर्कीचें राज्य सर्वांनीं वाटून घ्यावें. ही मसलत इंग्रज सरकारास पसंत पडली नाहीं.

पुन्हा रशियन प्रधानानें सुचविलें कीं, युरोपांतील मोठाले राष्ट्रांची सभा भरून तहाचा विचार होईपर्यंत सार्विया व तुर्की यांमध्यें चाललेली लढाई तहकूब करवावी. हें बोलणें इंग्रज सरकारास व इतर सर्व मोठाले राष्ट्रांस पसंत पडले आणि ही बातमी तुर्कीचे सुलतानास तारीख ५ आक्टोबर रोजीं कळविली. यास सुलतानानें उत्तर दिलें कीं, आम्ही आपले प्रजेस सन १८७५ चे डिसेंबर महिन्यांत फिरमन म्हणून जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यांत पुष्कळ मोकळीक दिली आहे व पुष्कळ सुधारणा करूं असें कबूलही केलें होतें, परंतु त्या सुधारणा अजून न होण्याचें कारण आमच्या प्रजेनें बंड करावें व आमचे राज्यांत नेहमीं घोटाळा चालावा ह्मणून दुसरीं राष्ट्रें आमचे प्रजेस मदत करतात त्यास आमचा उपाय नाहीं. सार्वियन लोकांचा अगदीं पराभव झाला हें पाहून एक महिना किंवा सहा आठवडे लढाई तहकूब करावी असा निरोप रशियन सरकारानें तुर्की सरकारास पाठविला. यास तुर्की सरकारानें परत उत्तर पाठविलें कीं, इतके थोडे दिवस लढाई तहकूब करण्यांत आमचें नुकसान आहे. पाहिजे असल्यास तहकुबीची मुदत अधिक वाढवा ह्मणजे तह करण्यासही वेळ पुष्कळ मिळेल आणि आह्मी सुधारणा करण्याच्या ठरविल्या आहेत त्याही पूर्णपणें अमलांत येतील. इंग्रज सरकारास अधिक मु-

दतीची युक्ती बरी वाटून तहकुबीची मुदत आक्टोबरचे पहिले तारखे-पासून मार्च महिन्याचे ३१ वे तारखेपर्यंत ६ महिन्याची केली. ही मुदत रशियन सरकारास पसंत वाटली नाहीं. त्यानीं परत इंग्रज सरकारास निरोप पाठविला कीं, इतके दिवस सैन्याचा खर्च सर्विया सरकारास सोसला जाणार नाहीं. हें रशियन सरकारचें म्हणणें इ-तालियन सरकारानें पसंत केलें. इंग्रज सरकारानें जर्मन सरकारास सांगितलें कीं, तुम्ही रशियन सरकारास सांगून सहा महिन्यांची मुदत कबूल करवा. यास जर्मन सरकारानें उत्तर दिलें कीं, सहा महि-न्यांची मुदत करणें चांगलें आहे परंतु दुसऱ्या सरकारास तुम्ही ही मुदत कबूल करा असें सांगणें आम्हांस बरें दिसत नाहीं. इतक्यांत तुर्कसरकारानें निरोप पाठविला कीं, आम्ही सहा आठवड्यांची मुदत कबूल करतों परंतु तेवढ्या वेळांत जर तह नाहीं झाला तर पुन्हा सहा आठवड्यांची आणखी मुदत करावी, आणि त्याही वेळांत तह न झाल्यास पुन्हा दोन महिन्यांची मुदत करावी लागेल.

३१ आक्टोबर रोजीं जनरल इग्न्याटीफ म्हणून जो रशियन सर-कारचा वकील कान्स्टांटिनोपल येथें होता त्यानें सुलतानास आपल्या सरकारचे मार्फतीनें कळविलें कीं जर ४८ तासांचे आंत सहा आठ-वड्यांची तहकुबीची मुदत तुम्ही नाकबूल कराल तर तुमची व रशियन सरकारची खास लढाई होईल. या धमकीमुळें तुर्क सरकारानें सहा आठवड्यांची मुदत कबूल केली.

ही बातमी इंग्रज सरकारास कळल्या बरोबर कौंटशुवोलाफ म्हणून रशियन सरकारचा वकील इंग्रज सरकारचे दरबारी होता त्यास लार्ड डर्बी साहेबानें सांगितलें कीं तुर्की लोकांची बलगेरियन लोकांबरोबर कोणत्याही प्रकारची वर्तणूक असो, परंतु तुमच्या निरोपाच्या झोकाव-रून असें दिसतें कीं तुर्क राज्याबद्दल तुमचे मनांत कांहीं तरी काळापा-त आहे. तुम्हांस आमचे इतकेंच सांगणें आहे कीं कोणत्याही प्रकारें कान्स्टांटिनोपल शहरास किंवा येथील राज्यास धक्का लागतो असें इंग्र-ज सरकारास वाटल्यास या गोष्टीचा परिणाम मात्र निराळ्या प्रकारचा

होईल. ही बातमी रशियन सरकारास कळल्यावर त्यांनीं इंग्रज सरकारची बरीच समजूत घातली.

कान्स्टांटिनोपल येथें कान्फरन्स भरवून तुर्कीचे राज्याची व्यवस्था करण्याचा सर्व राष्ट्रांचा विचार ठरला ; व या विचारास तुर्क सरकारानें ही आपले अनुमोदन दिलें. या कान्फरन्समध्यें विचार होण्याच्या गोष्टी ठरल्या त्या येणेंप्रमाणें:——

१ ओटोमान ( तुर्की ) राज्याचें स्वातंत्र्य व ऐक्य नष्ट होऊं नये.

२ कोणत्याही राष्ट्रानें मुलूख मिळविण्याचें किंवा आपल्या फायद्याची विशेष सोय करून घेण्याचें साधन करूं नये.

३ सर्वियाशीं तह करण्याच्या ज्या अटी तुर्क सरकारानें पूर्वी कबूल केल्या आहेत त्यांतच काय फेरफार करणें असेल तो करावा.

४ नवीन सुधारणा कोणत्या झाल्या पाहिजेत. ज्या सुधारणा करण्याचे तुर्क सरकारानें कबूल केले आहे त्यांत बल्गेरिया, बोसनिया व हरजिगोविना यांतील नवीन बंदोबस्तही सामील करावा.

५ मांटनिग्रोचे राजास कांहीं नवीन मुलूख द्यावा.

या कान्फरन्सला जाण्यासाठीं इंग्लंड देशाहून लार्ड सालिसबरी नोवेंबर महिन्याचे २० वे तारखेस निघाले. जातांना वाटेंत युरोपखंडांतील मोठमोठ्या मुत्सद्यांचा विचार घ्यावा असा बेत करून प्रथम ते फ्रान्स देशांत गेले. तेथील फारेन मिनिस्टर ड्युक डिक्याझेस यानें सांगितलें कीं तुर्कीच्या संबंधानें रशियन सरकारास अडथळा करण्याचें सामर्थ्य फ्रेंच सरकारचे आंगीं नाहीं. तेथून लार्ड सालिसबरी बर्लीन शहरीं जाऊन त्यांनीं प्रिन्स बिस्मार्कची भेट घेतली. त्यांत प्रिन्स बिस्मार्कानें सांगितलें कीं आम्ही तुर्कीचे स्वतंत्रेविषयीं १८५६ सालीं झालेल्या तहांत हामीदार आहोंत खरें परंतु जर लढाईचा प्रसंग आला तर मात्र आम्ही तुर्कीचे प्रकरणांत हात घालणार नाहीं. आम्ही अगदीं तिऱ्हाईत राहूं. तेथून लार्ड साहेब विएना येथें गेले. तेथील अधिकाऱ्यांनीं तुर्कीस मदत करण्याचें कबूल केलें खरें परंतु त्यांचेंही बोलणें असें धरसोडीचेंच होतें. नंतर सालिसबरी साहेब रोम शहरीं गेले. तेथील अधिकाऱ्यानेंही रशियाचे बादशहाचे विरुद्ध वागण्याचें

नाकारिले. दिसेंबरचे ५ वे तारखेस सालिसबरी साहेब कान्स्टांटिनोपल येथें जाऊन पोहोंचले. जनरल इग्न्याटिफ व लार्ड सालिसबरी यांचा मोठा स्नेह जडला व सालिसबरी साहेब जनरल साहेबाच्या ह्मणण्याप्रमाणें वागावयास लागले. पहिली सभा ११ दिसेंबर रोजीं रशियन वकिलाचे घरीं जमली. तेवेळेस तुर्क सरकाराकडील मुखत्यारांस त्या सभेंत घेतलें नाहीं. तुर्क सरकारानें खालीं लिहिलेल्या गोष्टी कबूल कराव्या असे आयतेवेळीं कान्फरन्सचे सभासदांनीं अपसांत ठरविलें. ती कलमें येणेंप्रमाणें:—बलगेरिया देशाचे दोन भाग करावे आणि दोन्ही भागावर ख्रिस्ती गवरनर जनरल नेमावेत. ते गवरनर जनरल कोणत्याही देशांतील असले तरी चालतील. त्यांची नेमणूक सुलतानानें करावी परंतु ते पसंत करण्याचें काम मोठ्या राष्ट्रांकडे असावें. तुर्कीचें सैन्य मोठमोठ्या शहरीं व किल्ल्यांत मात्र असावें. व गवरनर जनरलांचे मदतीस दुसऱ्या देशांतील सैन्य आणावें. ज्या लोकांनीं बलगेरियन लोकांवर जुलूम केला त्यांस शिक्षा व्हावी. बंडखोर लोकांस माफी करावी. अशाच प्रकारची व्यवस्था बोसनिया व हरजिगोविना प्रांतांची व्हावी. सर्विया व मांटनिग्रोचे राजांशीं तह करतेवेळेस त्यांस थोडा थोडा मुलूख तुर्क सरकारानें द्यावा. या देशांत सुधारणा करण्यासाठीं एक वर्षपर्यंत ह्या देशांतलेंच कमिशन ( पंच ) नेमून त्यांजकडून सुधारणा करवावी. ह्या सूचना जर सुलतानानें मान्य न केल्या तर सर्वांनीं कान्स्टांटिनोपल शहर सोडून जावें. अशी मसलत त्या सभेंत ठरली.

तुर्कीमध्यें शांतता करावी या हेतूनें कान्स्टांटिनोपल येथें सभा भरून विचार चालला होता. तथापि रशियन सरकार व तुर्क सरकार हे दोघेही लढाईचे तयारीस लागले होते. नोवेंबर महिन्याचे अखेरीस सेंटपिटर्सबर्ग शहराहून प्रिन्स निकोलास नांवाचा बादशहाचा भाऊ दक्षिणेकडील सैन्याचे अधिपत्य स्वीकारण्यासाठीं निघाला. लढाईचे खर्चासाठीं कर्ज काढण्याची बादशहानें परवानगी दिली. याचप्रमाणें तुर्क सरकारानें ही तयारी चालविली. महमद रषदीपाशास वजीरीचे कामावरून काढून त्याचे जागीं मिधतपाशास नेमिलें. आणि

सुधारणा करण्याचें काम मोठे जारीनें सुरू केले. ह्या सुधारणेबद्दल कायदा केला तो येणेंप्रमाणें:—

१ सुलतान राज्याचे बंदोबस्तासाठीं केलेला राजा आहे असें समजावें.

२ कायद्यानें रयतेचे स्वातंत्र्याचें रक्षण करावें.

३ राजकर्त्याचा धर्म मुसलमानी असावा. रयतेनें पाहिजे त्या धर्मानें चालावें, धर्मामुळें रयतेचे हक्कास कोणत्याही प्रकारें बाध येऊं नये.

४ आपले विचार छापण्याची परवानगी राहील आणि रयतेस शिक्षण राजाकडून मिळत जाईल.

५ मुसलमान असो किंवा ख्रिस्ती असो सुलतानाचे अमलाखालचे सगळ्या प्रजेस कायदा सारखा लागू राहील, सारखे कर बसविले जातील, व सर्वांची मालमत्ता सारखी संभाळली जाईल. कोणावर कोणत्याही प्रकारचा जुलूम होणार नाहीं. न्यायाचें काम प्रसिद्ध रीतीनें चालेल.

६ राज्य चालविण्यास एक सभा निवडली जाईल. त्या सभेंत लोकांनीं पसंत केलेले सभासद घेतले जातील. प्रत्येक चवथे वर्षीं हे सभासद बदलले जातील.

तारीख २३ दिसेंबर रोजीं मुखत्यारांची पुन्हा सभा भरली. या सभेंत एकंदर ११ सभासद होते. जर्मनी, इताली व रशिया या देशच्या सरकारांकडून एक एक मुखत्यार आला होता. फ्रान्स, इंग्लंड, आस्त्रिया व तुर्की येथील दोन दोन मुखत्यार होते. तुर्कीचे सफवेटपाशा व इधेमपाशा हे दोन मुखत्यार होते. या सभेंत सफवेटपाशाला अध्यक्ष नेमिलें होतें. पहिले दिवशीं मुखत्यारांनीं तुर्कीचे मुखत्यारांपुढें बल्गेरिया, बोसनिया व हरजीगोविनाया देशांमध्यें कोणत्या प्रकारचा राज्य कारभार असावा याबद्दलचा मसूदा ठेविला. नंतर तुर्कीचे मुखत्यारांनीं त्या प्रांतांत लढाई कशी सुरू झाली वगैरेची हकीकत सभेस कळविली. तारीख २८ रोजीं दुसऱ्यानें सभा भरली. तींत सर्विया व मान्टनिग्रो येथील लढाई दोन महिने तहकूब करण्याचें ठरलें. तीस दिसेंबर रोजीं तिसऱ्या-

नें सभा भरली. तींत तुर्कांचे राज्यांत कशी व्यवस्था असावी याबद्दलची याद तुर्कांचे मुखत्यरांस दिली. या यादीस कांहीं हरकती आहेत परंतु त्या आज सांगतां येत नाहींत असें सफवेटपाशानें उत्तर दिलें. त्यास जनरल इग्नाटीफ यानें आतांच उत्तर द्या असें सांगितलें, सर्वांचा आग्रह पडल्यावरून तुर्कांचे मुखत्यारांनीं सांगितलें कीं आह्मी ज्या सुधारणा करून राज्य व्यवस्था केली आहे तीच व्यवस्था आह्मी चालवूं. पहिली जानेवारी सन १८७७ रोजीं चवथ्यानें सभा भरली. तेवेळेस इंग्रज सरकारचे मुखत्यार लार्ड सालिसबरी साहेबांनीं तुर्कांचे मुखत्यारांस सांगितलें कीं आह्मी ज्या कांहीं सूचना तुह्मांस केल्या त्या तुह्मीं नाकारल्या हें बरें केलें नाहीं. यांत तुर्क सरकारचें फार नुकसान होणार आहे. यास सफवेतपाशानें उत्तर दिलें कीं,:——

१. राज्य व्यवस्थेची देखरेख पाहाण्यासाठीं कमिशन नेमणें.

२. पर राज्यांतील सैन्य मदतीस आणणें.

३. आमचें सैन्य मोठमोठे शहरीं व किल्ल्यांत मात्र ठेवणें.

४. गवरनर जनरल नेमण्याची पसंती दुसऱ्याचे हातीं ठेवणें व बलगेरियाचें राज्य व्यवस्थेसाठीं भाग करणें.

५. सरक्याशियन लोकांला एशिया खंडांत राहाण्यास जाण्यास सांगणें.

६. सार्विया व मान्टानिग्रोचे राजांस अधिक मुलुख देणें.

इतक्या सूचना आह्मांस नाकबूल आहेत व यावर बोलण्याचाही आम्हांस अधिकार नाहीं. इतकें झाल्यावर सभा उठली आणि पुन्हा चवथे तारखेस सभा भरली. मध्यंतरीं लार्ड सालिसबरी साहेबांनीं मुख्य वजीर मिधतपाशा याची भेट घेतली आणि त्यास सांगितलें कीं, आम्ही ज्या सूचना केल्या त्या तुमच्या मुखत्यारांनीं नाकबूल केल्या हें बरें केलें नाहीं. कारण अशानें जर कदाचित लढाईचा प्रसंग आला तर तुम्हांस कोणापासूनही मदत मिळणार नाहीं. सगळीं राष्ट्रें तुमचे शत्रूसच मदत करतील. अशाच प्रकारचा आग्रह धरून सन १८२८ सालीं तुम्ही ग्रीस देश गमावला. यास मिधतपाशानें उत्तर दिलें कीं, आमचें राज्य नष्ट व्हावें असें जर परमेश्वराचेंच

मनांत असलें तर तेथें कोणाचाच उपाय चालणार नाहीं. परंतु जो म्हणून जातीचा तुर्क आहे तो कधींही तुम्ही सांगितलेल्या सहा सूचना कबूल करणार नाहीं.

२८ डिसेंबर रोजीं मिधतपाशाची व सर हेनरी एलिएट म्हणून इंग्रज सरकारचा वकील कान्स्न्याटिनोपल येथें होता त्याची गांठ पडली ते वेळेस मिधतपाशा त्यापाशीं बोलला तें येणेंप्रमाणें:—

रशियन सरकाराबरोबर लढाई झाल्यास आमचा नाश होईल हें उघड आहे. परंतु सर्व तुर्क लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, बेअब्रू करून घेऊन मरण पावण्यापेक्षां शूरपणा करून मरण पावावें यांतच भूषण आहे. मुखत्यारांनीं केलेले सूचनेवरून दिसतें कीं, रशियन सरकारचे मनांत आमचे राज्यांत लहान लहान पुष्कळ संस्थानें करावयाचीं आहेत. बोसनिया व हरजिगोविना येथें फक्त किल्ल्यामध्येंच जर तुर्कांचें सैन्य राहिलें तर जसा सर्विया देशाचा परिणाम झाला तसाच या दोन देशाचा परिणाम होईल. ते लोक आपल्या देशांतून तुर्क लोकांला अगदीं हाकून देतील. राज्य कारभार चालविणारांचे मदतीस परदेशांतून सैन्य आणावें अशी एक सूचना आहे, परंतु हें कांहीं सुलतानास कबूल नाहीं. पाहिजे असल्यास पर देशांतून सरदार व अंमलदार आम्ही आणवूं, परंतु त्यांनीं सुलतानाचे नौकर आहों असें समजलें पाहिजे. राज्य कारभाराची देखरेख ठेवण्यासाठीं पंच नेमावें अशी दुसरी एक सूचना आहे हें आह्मांस कबूल आहे, परंतु आम्ही कबूल न करण्याचें कारण यांत आमचें स्वातंत्र्य मोडतें आणि तें मोडावें असें रशियन सरकाराचें मनांत आहे. या गोष्टीस सर्व राष्ट्रें अनुकूळ झालीं हें पाहून आम्हांस आश्चर्य वाटतें.

ठरलेले तारखेस पुनः सभा भरली आणि तुर्क सरकाराच्या मुखत्यारांनीं सूचना नाकबूल करण्याची योग्य कारणें दाखविलीं. आणखी त्यांनीं असें बोलून दाखविलें कीं सभा भरण्याचें अगोदर ज्या मुद्यांचे गोष्टींचा विचार व्हावयाचा ठरला होता त्या मुद्यांच्या गोष्टी सुटून भलत्याच प्रकरणाचा विचार चालविला हें बरें नाहीं. आणखी ८ वे तारखेस सभा भरून वाटाघाट झाली. पुनः सातव्यानें ११ वे तार-

खेस सभा भरली. तेवेळेस सालिसबरी साहेब बोलले कीं बोसनिया व हरजिगोविना प्रांतांतील कारभाराची देखरेख ठेवण्यास कमिशन नेमावें, असें तुर्क सरकारांनीं कबूल केले असून आतां त्या गोष्टीस अडथळा आणतात हें बरोबर नाहीं. यास तुर्कीचे मुखत्यारांनीं उत्तर दिलें कीं, कमिशन नेमणें हे आह्मास कबूल आहे परंतु त्या कमिशनांत मनुष्यें निवडण्याचा अधिकार सुलतानास असावा.

अशा रीतीनें तुर्क सरकारचे मुखत्यारांनीं सयुक्तिक कारणें दाखवून बाकीचे सभासदांस कुंठित केलें. पुढें १२ वे तारखेस सभा भरून त्यांत विचार ठरला कीं १५ वे तारखेस पुनः सभा भरवून तुर्क सरकारास निक्षून सांगून पहावें आणि त्यांचेकडून खालीं लिहिलेलीं कलमें खेरीज करून बाकीचीं कलमें तरी निदान कबूल करून घ्यावीत. व गळलेलीं कलमें येणेंप्रमाणें:——

१ परदेशांतलें सैन्य कमिशनचे मदतीस येऊं द्यावें.

२ तुर्क सैन्य मुख्य मुख्य शहरीं व किल्ल्यांत असावें.

३ बलगेरिया देशाचे सरहद्दीची नीट व्यवस्था करावी.

४ या प्रांतांतील गवरनर खिस्ती असावेत.

१५ वे तारखेस शेवटची ८ वे वेळेस सभा भरली. तेवेळेस वर सांगितलेलीं ४ कलमें वगळून बाकीबद्दलची यादी तुर्कीचे मुखत्याराजवळ दिली; आणि सांगितलें कीं, या गोष्टी जर तुह्मी तारीख १८ पर्यंत कबूल करणार नाहींत तर ती शेवटची सभा असे समजून आह्मी आपापले देशांस निघून जाऊ. या अखेरच्या यादींत कलमें होतीं तीं येणेंप्रमाणें:—मांटनिग्रो देशास थोडासा मुलूख जोडून या देशाची सरहद्द दुरूस्त केली पाहिजे. ही हद्द कमिशनानें ठरवावी. डान्युब नदींत जहाजें नेण्यास प्रतिबंध नसावा व या नदीचे कांठीं जे किल्ले असतील त्यांचा लढाईचे कामीं उपयोग करूं नये. सर्विया देशाशीं पहिला होता तसाच तह करावा व बोसनिया प्रांताचे बाजूस सर्वियाची हद्द दुरूस्त करण्यास पंच नेमावेत. सर्विया व मांटनिग्रो या देशांतील जो मुलूख तुर्क सैन्यानें घेतला असेल तो त्यांचा त्यांस परत देऊन तुर्क सरकारानें आपलें सैन्य परत आणावें. लढाईंत जे लोक कैद केले

असतील ते परत देऊन आपले कैदी मोबदला सोडून घ्यावेत. लढाई करण्यास प्रवृत्त झालेले प्रजेस माफी केल्याचा जाहीरनामा प्रसिद्ध करावा. बोसनिया, हरजिगोविना व बलगेरिया या देशांचा कारभार करण्यास जे गवरनर जनरल नेमावयाचे ते ५ वर्षेपर्यंत निवडण्याचा अधिकार सुलतानास असावा. परंतु ते लोक पसंत करण्याचें काम सहा सरकारचे वकिलांचे विचारें व्हावें. आपापले प्रांताचे कारभारांत विचार करण्याचा रयतेस अधिकार असावा. अशा प्रकारची व्यवस्था तीन महिन्याचे आंत तुर्क सरकारानें करावी. कराचे मक्ते देण्याची चाल मोडावी, न्यायाचा बंदोबस्त करावा, धर्म संबंधीं कोणावर जुलूम होऊं नये. शेतकरी लोकांची स्थिती सुधारावी. ही सर्व व्यवस्था पहाण्यास दोन कमिशनें नेमावीत. या कमिशनरांनीं कोणत्या प्रकारानें चालावें याबद्दलचे नियम तो कमिशनर ज्या सरकारचा असेल त्या सरकारानें त्यास करून द्यावेत.

शेवटची तारीख १८ वी नेमिली होती परंतु त्या दिवशीं कांहीं सभा भरली नाहीं. २० वे तारखेस भरली. ते दिवशीं सफवेतपाशानें सांगितलें कीं, आपण सांगितलेले गोष्टींचा विचार करण्याकरितां सुलतानानें मोठी सभा भरविली होती. त्यांत आमच्या राज्यांतील सर्व प्रांतांतले व सर्व जातींतील निवडलेले लोक सुमारें २०० आले होते. आणि त्या सभेंत आम्ही या गोष्टीचा विचार केला. त्यांत कमिशन नेमण्याचे व गवरनर जनरल पसंत करण्याचें काम दुसऱ्या सरकारांकडे देणें बरें नाहीं असें ठरलें. तथापि सऱ्याचा घोटाळा मिटविण्यासाठीं मुसलमान व ख्रिस्ती असे मिश्रित कमिशन एक वर्षपर्यंत नेमण्यास सुलतान साहेब कबूल झाले आहेत परंतु या कमिशनवर देखरेख ठेवण्याचा अधिकार सुलतानास असावा. असा प्रकार आहे तेव्हां मला असें वाटतें कीं, आतां साहा सरकारांच्या मुखत्यारांनीं उगीच आग्रहास पडूं नये व तंटा मिटवून घ्यावा.

यावर जनरल इग्न्याटीफ बोलले कीं, तुर्क सरकार आपण होऊन इतर सरकारांबरोबरचा संबंध तोडीत आहे. मान्टनिग्रो व सर्विया येथील लढाई तहकूब केली परंतु ती पुनः सुरू होईल. ख्रिस्ती लो-

कांवर जुलूम झाल्यास रशियन सरकारास लढाई करण्यास तें कारण पुरें होईल. यांस तुर्क सरकारचे मुखत्यारांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. नंतर ही सभा संपली.

तुर्क सरकारास निक्षून शेवटचें विचारणें विचारावें ह्मणून २१ वे तारखेस सभा भरली परंतु त्या सभेस तुर्कांचे मुखत्यार आले नाहींत. हे मुखत्यार अपापले देशास निघून गेले. परंतु त्यांची भेट कांहीं सुलतानानें घेतली नाहीं.

हें सभेचें काम चाललें आहे तोंच रशियन सरकारानें लढाईची तयारी चालविली. ६०,००० अमानत सैन्य बसारेबिया प्रांतांत पाठविलें. तुर्क लोकही लढाईस तयार झाले. कांहीं ग्रीक धर्मानुयायी लोकांस ही रशियनाचे ताब्यांत राहाण्यापेक्षां तुर्क सरकारचे ताब्यांत राहाणें बरें असें वाटून तुर्की सैन्यांत जाऊन सामील झाले. नंतर कान्स्त्यांटिनोपल येथें मोठी सभा भरली. त्यांत मिधतपाशानें भाषण करून लढाई पासून हेणारा नाश लोकांस कळविला. तो म्हणाला कीं आतां तुर्क सरकारास कोणी मदत करणार नाहीं. इतर सरकारांनीं सांगितल्याप्रमाणें जर वागावें तर आजच आपले स्वातंत्र्याचा नाश होत आहे.. ख्रिस्ती लोकांचें रक्षण करण्याचे निमित्त करून तुर्कांचें राज्य बुडविण्याची रशियन सरकारानें वेळ आणली आहे. आतां आपण एका राजाची प्रजा आहों. आपले धर्म निरनिराळे असले ह्मणून चिंता नाहीं परंतु हा देश तुह्मासर्वांचा आहे. याचें रक्षण करणें तुम्हा सर्वांचें काम आहे.

सर्व युरोप खंडांत तुर्कांस मदत करणारा कोणी राहिला नाहीं. फक्त हंगारियन लोकांस मात्र तुर्कांची दया आली कारण १८४९मध्यें हंगारियन लोकांनीं स्वतंत्र होण्यासाठीं बंड केलें तेव्हेळेस रशियन सरकारानें आस्त्रियन सरकारास मदत करून तें बंड मोडलें. यांत जे पुढारी होते ते पळून गेले आणि त्यांनीं तुर्क सरकारचा आश्रय केला. हे बंडवाले परत द्यावे ह्मणून आस्त्रियन सरकारानें तुर्क सरकाराजवळ मागणें केलें परंतु तुर्कसरकारानें कांहीं ते लोक दिले नाहींत. त्या दिवसापासून

इंगारियन लोक रशियन लोकांचा द्वेष करतात व तुर्क सरकारची कीव करतात.

कान्फरन्स उठून गेल्यावर आपली अव्यवस्था सुधारण्याची तुर्क सरकारानें मोठी इच्छा धरली. कायदा सर्वांस सारखा लागू केला. खिस्ती लोकांचे मुलांस लष्करी शाळेंत घेऊं लागले. मुसलमान व खिस्ती लोक अशा मिसळीचें एक सैन्य तयार करून त्यावर वालन टाईन बेकर नांवाचे इंग्रजी सरदारास अधिकारि नेमिले. स-रक्याशियन लोकांस रुमेलिया प्रांतांत येऊन राहण्याची मनाई केली. हुकुमाशिवाय कोणी हत्यार बाळगूं नयें असा कायदा केला. बंडवाल्यांस माफी दिली. पाहिजे त्यानें पाहिजे त्या धर्मानें वागण्याची मोकळीक दिली. राजसभेसाठीं लोक निवडण्याचें काम चालू झालें. पुष्कळ खिस्ती लोकांस या सभेंत घेतलें.

अशा रीतीनें सुधारणेचें काम चालले असतां एकाएकी फेब्रुवारी महिन्याचे ५ वे तारखेस मिथत पाशास वजीरीचे कामावरून काढून हद्दपार केलें. कारण यानें अबदूल हमीद सुलतानास गादीवरून काढण्याचा बेत चालविला होता. याचे जाग्यावर इधेमपाशास मुख्य वजीर नेमिले.

जानेवारीचे २९ वे तारखेस तुर्क सरकारानें एक सर्क्युलर काढलें. त्यांत लिहिलें होतें कीं, कान्फरन्समध्यें अमुक गोष्टीचा विचार व्हावा असें इंग्रज सरकारांनीं प्रसिद्ध केलें होतें त्या गोष्टीचा विचार न होतां भलत्याच गोष्टीचा विचार कान्फरन्समध्यें काढला. पारिस येथील तहनाम्याप्रमाणें सुलतानाचे राज्यांतील गोष्टीचा विचार करण्याचा अधिकार कोणासही नसतां त्याच गोष्टीचा विचार करण्यास कान्फरन्स-नें आरंभ केला. सर्विया व मान्टनिग्रो येथील राजांशीं पहिल्या-प्रमाणें तह करावा असें ठरलें असून कान्फरन्समध्यें त्यांस अधिक मुलूख द्यावा असें ठरविलें. ठरविलेले गोष्टी पेक्षां निराळ्या गोष्टी कान्फरन्समध्यें निघाल्या त्या सर्व आम्ही कबूल केल्या. फक्त गवरनर जनरल नेमण्याचा अधिकार सुल-तानाखेरीज दुसऱ्यास नसावा व कमीशनवरही सुलतानाचा अधिकार

असावा. या दोन गोष्टी कान्फरन्सनें नाकबूल केल्या. यावरून कानफरन्सचा हेतू तुर्कीचें राज्य नष्ट करावें असा होता असें दिसतें.

• सुलतानाचे मुलखांत प्रांतोप्रांतीं अपसांत लढाई चालली होती. ग्रीक लोक आपला मुलूख परत मिळविण्याची संधी पाहात होते. सर्वियाव मान्टनिग्रो लोकांशीं लढाई चाललीच होती, रशियन सरकाराबरोबर लढाईचा प्रसंग येईल असें दिसत होतें. मदत करण्यास किंवा धीर देण्यास कोणी मित्र राहिला नव्हता, तुर्क लोकांमध्यें ही असंतोष उत्पन्न झाला होता, मुख्य वजीर आपल्यास गादीवरून काढण्याचे खटपटीस लागला होता, अशा जरी आणखी दुसऱ्या शेकडो आडचणी आल्या होत्या तथापि सुलतान हामीद घाबरला नाहीं. रात्रंदिवस आपले देशाचे कल्याणासाठीं झटत होता. व त्याची चित्तवृत्ती मोठी स्थीर होती. अशा गडबडींत पार्लमेंट सभेची स्थापना झाली.

अशा प्रकारें कान्फरन्सचा बेत फसला हें पाहून रशियन सरकारानें इतर सरकारांची मसलत घेण्यासाठीं जनरल इग्नाटिफ यास पाठविलें. आणि 'प्रोटोकोल' म्हणून एक याद त्याजवळ सर्व राष्ट्रांच्या सह्या घेण्याकरितां दिली. तो मार्च महिन्याचे १६ वे तारखेस लंडन शहरीं जाऊन पोहोंचला.

ह्या प्राटोकोल मध्यें असा मजकूर होता कीं, यूरोपांतील तुर्कीचे प्रांतांत स्वस्थता व्हावी म्हणून सर्व राष्ट्रांनीं एक होऊन आपापले मुखत्यार कान्स्ट्यांटिनोपल येथें कान्फरन्स भरविण्यास पाठविले. तुर्कीचे राज्यांत जी ख्रिस्ती प्रजा आहे तिची स्थिति सुधारावी, बोसनीया, हरजेगोविना व बलगेरिया प्रांतांत राज्यव्यवस्था नीट चालावी याची जबाबदारी जामीनदार सरकारावर होती ती तुर्क सरकारानें आतां आपल्या शिरावर घेतली आहे.

सर्वियाचे राजाबरोबरचा तह सर्वांनीं पसंत केला. मान्टनिग्रोची सरहद्द वाढवावी व डान्युब नदींत जहाजें जाण्यास आडथळा न व्हावा म्हणून बंदोबस्त करावा असा सर्व राष्ट्रांनीं विचार ठरविला व ही गोष्ट सुलतान पत्करील असें सर्वांस वाटत आहे. सुलतानानें बंदोबस्तास जरूर तेवढें सैन्य ठेवून बाकीचें कमी करावें आणि कान्फ-

र्न्समध्यें ठरल्याप्रमाणें आपले राज्यांत सुधारणा करावी. आणि सुलतान त्याप्रमाणें करील असें आह्मांस वाटतें.

सुलतानानें सुधारणा करण्याचे कबूल केलें आहे त्याप्रमाणें त्यानें सुधारणा कराव्या. आपले ख्रिस्ती प्रजेची सुधारणा करावी. येणें करून सर्व युरोपखंडांत स्वस्थता राहणार आहे व त्यांत सुलतानाचेंही कल्याण आहे.

या सुधारणा योग्य रीतीनें अमलांत आणिल्या कीं नाहीं हे आपापल्या वकिलाच्या मार्फतीनें सर्व सरकार पाहील. जर या सुधारणा अमलांत आल्या नाहींत व ख्रिस्ती प्रजेची स्थिती सुधारली नाहीं तर त्या गोष्टीची व्यवस्था लावण्याचा अधिकार सर्व सरकारांस आहे. मग ते पाहिजेल त्या रीतीनें या गोष्टीचा बंदोबस्त करतील.

या यादीवर सहा सरकारच्या सह्या होत्या.

आपल्या सैन्याची तयारी होण्यासाठीं रशियन सरकारानें प्रोटोकोल ह्मणून एक उगीच याद काढून लढाईचें प्रकरण लांबणीवर टाकिलें.

ही यादी एप्रीलचे तिसरे तारखेस इंग्रज सरकारचे वकिलानें तुर्क सरकारास वाचून दाखविली; आणि सैन्य कमी करण्यास सांगितलें. याच वेळेस मान्टनिग्रोचे राजाशीं लढाईची तहकुबी केलेली मुदत संपली; आणि पुनः लढाई सुरू झाली. यादीस उत्तर देतांना तुर्क सरकारानें सांगितलें कीं जर रशियन सरकार आपलें सैन्य कमी करील तर आम्हीहि आपलें सैन्य कमी करूं. आजपर्यंत इतर राष्ट्रांशीं आमचे जे तहनामे झाले आहेत त्या तहनाम्यांप्रमाणें आमचे राज्याचे कारभारांत हात घालण्याचा कोणासही अधिकार नाहीं. जगांत आजपर्यंत कोणाचा अपमान झाला नाहीं अशा प्रकारचा अपमान आह्मीं कां बरें करून घेऊं. ही यादी आमचे संमतानें निघाली नाहीं. सर्वानुमतें ठरलेला पारिसचा तहनामा एकीकडे ठेवून सर्वांनीं ती यादी पसंत केली याचें आह्मांस आश्चर्य वाटतें. पारिसचा तहनामा नाहीं असें समजून जरी आपण वागलों तरी तुर्क सरकारास इतर सरकारांप्रमाणें हक्क नाहींत काय? २० वर्षांपूर्वी सर्वानुमतें ज्या गोष्टी ठरल्या आहेत त्यास अपवाद काय ह्मणून आणावा, याचा उलगडा आह्मांस होत

नाहीं. या यादींत लिहिलें आहे कीं, जर सांगितल्याप्रमाणें सुधारणा तुर्कींचे राज्यांत झाल्या नाहींत तर अन्य उपायांची योजना करण्यांत येईल. ही धमकी कशासाठीं ? तुर्क सरकारास अब्रू नाहीं काय ? या यादीनें पुढें मागें घोटाळा झाल्याशिवाय राहणार नाहीं असें आह्मास वाटतें, म्हणून तुर्क सरकार असें प्रसिद्ध करीत आहे कीं, हा केवळ अन्याय आहे. परमेश्वरावर भरंवसा ठेवून त्यानें जें राज्य आह्मांस दिलें आहे त्याचा संभाळ करण्याचा तुर्क लोकांचा निश्चय झाला आहे. या यादीप्रमाणें आह्मास वागावयास लावण्याचा युरोपियन राष्ट्रांस कांहीं अधिकार नाहीं, असें आह्मी उघड रीतीनें सांगतों.

एप्रीलचे १२ वे तारखेस यादीस तुर्क सरकारानें दिलेलें उत्तर इंग्रज सरकारास मिळालें. त्यांनीं तुर्कीचे वकिलास सांगितलें कीं, रशियन सरकारानें सांगितल्याप्रमाणें एक वकील रशिया देशांत पाठवा आणि दोघांचे संमतीनें सैन्य कमी करून लढाईचा प्रसंग टाळा. यास तुर्क वकिलानें उत्तर दिलें कीं, प्रोटोकोल यादी नष्ट केल्याशिवाय रशिया देशांत वकील पाठविण्याचा तुर्क सरकारचा विचार नाहीं।

रशियन सरकारानें पूर्णपणें लढाईची तयारी केली; आणि रशियन बादशहा आपलें सैन्य पाहण्यासाठीं एप्रिलचे २० वे तारखेस सेंटपिटर्सबर्ग शहर सोडून निघाला. तो २२ वे तारखेस बसोरेबिया प्रांतांत बिरसुला म्हणून गांव आहे तेथें येऊन दाखल झाला. या गांवीं नववी कोर ( सैन्य ) जमा झाली होती. सैन्याची पाहणी केल्यावर बादशहानें आपले सरदारांशीं भाषण केलें कीं, 'आतां तुम्ही लढाईस जात आहां तर तुम्हांस त्या कामीं यश येवो असा माझा आशिर्वाद घ्या. जेथें शत्रु तुह्मांस भेटेल तेथें त्याशीं शूरपणानें लढाई करून तुह्मी आपले पलटणीचें नांव राखा. लढाई पाहिली नाहीं असें कित्येक लोक तुम्हांमध्यें आहेत. ते लढाई केलेले शिपायांसारखे वागतील अशी माझी आशा आहे. तुह्मी जय मिळवून लवकर परत या. लढाई न व्हावी म्हणून मी पुष्कळ प्रयत्न केला,

पुष्कळ दम खाल्ला परंतु सर्व निर्फळ झालें. आतां माझा सलाम घ्या आणि लढाईस जाण्याचे तयारीस लागा."

२३ वे तारखेस कान्स्टांटिनोपल येथील रशियन प्रजेचें संरक्षण करण्याचें काम जर्मन वकिलाकडे सोपवून रशियन वकील तें शहर सोडून निघून गेला.

२४ एप्रिल रोजीं रशियाचे बादशहानें कसनीफ येथून जाहीरनाम्यानें लढाईची प्रसिद्धी केली. या जाहीरनाम्यांत लिहिलें होतें कीं तुर्की राज्यांतील गांजलेले प्रजेची रशियन बादशहास फार दया येते. त्यांची स्थिती सुधारावी एवढेंच बादशहाचें मनोगत आहे आणि याच-प्रमाणें सर्व रशियन लोकांस वाटून आपल्या बांधवास सोडविण्यासाठीं ते तयार झाले आहेत. लढाईचा प्रसंग न येतां काम झाल्यास करावें ह्मणून यूरोपखंडांतील राजांचे मदतीनें त्यानें पुष्कळ खटपट केली; परंतु तुर्क लोकांचे हटवादीपणानें ती निर्फळ झाली. आतां लढाईशिवा-य दुसरा उपाय नाहीं ह्मणून लढाई करणें भाग पडलें आहे. आपण योग्य कारणावरून व परमेश्वरास स्मरून लढाई करीत आहोंत. आपणांस स्वत: लढाई करावी लागेल असें पूर्वी मी सांगितलें होतें तसाच प्रसंग आला आहे. आतां ईश्वराचें नांव घ्या आणि तुर्कांचे मुलखांत शिरा.

याच दिवशीं सेंटपिटर्सबर्ग येथें जे तुर्कांचे वकील वगैरे लोक होते त्यास प्रिन्स गार्चीकाफ यानें सांगितलें कीं ज्यांची खुषी असेल त्यांनीं आतां रशिया देश सोडून जावें, आणि जे येथें राहतील त्यांचा योग्य रीतीनें बंदोबस्त ठेविला जाईल.

२५ वे तारखेस तुर्क सरकारानें आपले देशोदेशींचे वकिलांस क-ळविलें कीं बोसनिया, हरजिगोविना व बलगेरिया प्रांतांत बंडें झालीं तीं केवळ रशियन लोकांनीं करविलीं. सर्विया व मांटनिग्रोचे रा-जांस रशियन सरकारानेंच लढाई करण्यास लाविलें. रशियाचे मदती-शिवाय लढाई करण्याची त्यांची छाती नव्हती. आज दोन वर्षें रशियन सरकारानें आमचे राज्यांत घोंटाळा करण्याचा प्रयत्न चाल-विला आहे. तुर्कांवर ज्यानें स्वारी करण्याचें मनांत आणिलें आहे तो ख्रिस्ती व मुसलमान या दोन्ही लोकांचा शत्रु झाला आहे. पारिस

येथील झालेले तहनाम्याप्रमाणें एकटे रशियन सरकारास तुर्कांवर स्वारी करण्याचा अधिकार नाहीं. यासाठीं सर्वांनीं मध्यें पडून हा लढाईचा प्रसंग मिटवावा अशी आमची सर्वांस विनंती आहे.

सुल्तानानें आपले सैन्यांत जाहीरनामा प्रसिद्ध केला तो:——

रशियन सरकारानें विनाकारण आपणाबरोबर लढाई करण्याचें प्रसिद्ध केलें आहे. ईश्वरावर व आपले पैगंबरावर विश्वास ठेवून तुम्ही ह्या लढाईस तयार व्हा. जरी आपण हातांत तरवार धरली आहे तरी मनांत शांतता असूं द्या. यूरोपखंडांतील राजांनीं जसें आपणास सांगितलें तसें आपण वागलों. आपलें राज्य व आपलें स्वातंत्र्य नष्ट करावें असें आपले शत्रूचे मनांत आहे. कांहीं कारण नसतां आपणावर त्यानें स्वारी केली आहे. न्यायाचा व हक्काचा संरक्षण करणारा परमेश्वर आहे. आपण झटून शौर्यानें लढल्यास तो खास यश देईल यांत संशय नाहीं. शत्रूचा हेतु साध्य होऊं देऊं नका. परमेश्वरावर माझा भरवंसा आहे. खऱ्या कामास तो यश देतो. आपल्या पूर्वजांचा व आपल्या नांवाचा माझे शिपाई अभिमान बाळगून आपले कीर्तीस डाग लावून घेणार नाहींत अशी माझी खात्री आहे. सरदार व शिपाई यांस माझा सलाम सांगा. तुम्ही आपली उत्कंठा आपलें शौर्य व आपला उत्साह सोडूं नका. आपले ताब्यांत जो मुलूख आहे तो आपले पूर्वजांनीं प्राणांची आहुति देऊन मिळविलेला आहे हें ध्यानांत असूंद्या. आपले राज्याचें स्वातंत्र्य आणि हक्क संभाळा. यांतच तुम्हास यश मिळेल. तुमच्या बायकापोरांचा संभाळ करणें राजाचें काम आहे. तुम्ही मागली काळजी धरूं नका. तुम्हांस यश यावें म्हणून सुलतान परमेश्वराची प्रार्थना रात्रंदिवस करील; आणि गरज लागल्यास तुर्क लोकांचें स्वातंत्र्य, अब्रु व हक्क संभाळण्यासाठीं कुराण हातांत घेऊन तुम्हांमध्यें लढून प्राण देण्यास तुमचा सुलतान तयार आहे. परमेश्वर तुम्हांस यश देवो. अशा रीतीनें दोन्हीं राष्ट्रें लढाईस तयार झालीं. आतां आपण प्रत्येकाचे राज्याची युरोपखंडांत स्थापना कशी झाली, व त्यांमध्यें पिढीजात वैमनस्य पडण्याचें कारण काय याचा विचार करूं.

ग्रीक आणि रोमन लोकांस युरोप व एशिया खंडाचे उत्तरे कडील देशाची माहिती दोघांसही मुळींच नव्हती. या देशास सिथिया असें नांव असे व त्यास अज्ञात मुलूख अशी संज्ञा दिली होती. कल्पित कादंबरी शिवाय तिकडील माहिती प्राचीन काळांत मुळीच नाहीं. ज्या देशाला हल्लीं रशिया असें म्हणतात त्यास पूर्वीं सार्मेशिया म्हणत असत. येथील लोक रानटी, क्रूर, व शूर होते असें वर्णिलें आहे. इतर रानटी लोकांप्रमाणें त्यांसही लुटालूट करण्याची सवय व गोडी असे. यांतील एका जातीचे लोकांचें नांव रोक्सोलोनी असें होतें, आणि यावरूनच रशियन नांव पडलें असावें असें म्हणतात. या देशांत पुष्कळ लहान लहान संस्थानें होतीं. त्यांत कीफ व नोवगोरद हीं दोन मोठीं संस्थानें होतीं. या दोन संस्थानांमध्यें जेव्हां तंटा लागला तेव्हां नोवगोरदचे संस्थानिकानें सन ८६२ मध्यें स्कयांडिनेव्हियन जातीचे रूरिक नांवाच्या एका लुटारू सरदारास आपले मदतीस बोलाविलें. त्यानें नोवगोरदचे आसपासचा मुलूख घेऊन आपण तेथला राजा होऊन बसला. पुढें नोवगोरद हें शहर त्यानें आपले राजधानीची जागा केली. हा राजा मेल्यावर त्याचा मुलगा इगार यानें दगाबाजी करून कीफ संस्थान घेतलें; आणि तें शहर राजधानी केली. १० वे शतका पर्यंत या रूरिकचे कुळांतील राजांनीं काळया समुद्रापर्यंत देश जिंकिला.

या वेळेस कान्स्टांटिनोपल शहरीं ग्रीक धर्मी बादशहा होता. याचे राज्यास इस्टर्न एम्पायर म्हणत. काळ्या समुद्रापर्यंत रशियन लोक आऊन पोंहोंचल्यावर कान्स्टांटिनोपलचे बादशहाचे राज्यांत समुद्रांतून गलबतांत बसून तें स्वाऱ्या करीत व पुष्कळ लूट मिळवून आपल्या स्वदेशीं येत. या राज्यांत रशियन लोकांचें जाणें येणें होऊं लागल्यानें कांहीं लोकांनीं ग्रीक धर्माचा स्वीकार केला. हावेळपर्यंत रशियन लोकांत एक धर्म चालू नव्हता. इगार मरण पावल्यावर त्याची बायको ओलगा राज्य करूं लागली. सन ९४५ त लूट करण्यासाठीं ही कान्स्टांटिनोपल येथें गेली असतां तेथेंच तिनें ग्रीक धर्माचा स्वीकार केला. तथापि रशियन लोक अजून ख्रिस्ती झाले न-

व्हते, बहुतेक मूर्तीपूजकच होते. हिचे मागें हिचा मुलगा स्वीयाटोस्लोफ राजा झाला. याचे मागें राज्याचे तीन तुकडे झाले. सन ९८४ मध्यें व्लाडीमीर यानें सर्व राज्य एकत्र करून कान्स्टांटिनोपल येथील आठवे कान्स्टंटाईन बादशहाचे अना नांवाचे मुलीशीं लग्न करून आपणही ख्रिस्ती झाला. यानें जबरदस्तीनें आपले लोकांस ख्रिस्ती केले. यास १२ पुत्र होते. त्यामुळें याचे मागें याचे राज्याचे १२ भाग झाले. पोलंड देशाचा राजा यावेळेस बराच बलाढ्य होता. त्यानें रशिया देशावर स्वारी करून बराच मुलूख उध्वस्त करून टाकिला. पुढें सन ११२५ मध्यें व्लाडीमीर मानोमाक्स नांवाचा मोठा शहाणा राजा झाला. याचें राजधानीचें शहर कीफ होतें. त्यानें आपले राज्यांत स्वस्थता करून लोकांस विद्या शिकविण्यास आरंभ केला. हावेळपर्यंत रशियन लोकांस लिहितां वाचतां येत नव्हते. यानें नवीं शहरें वसविलीं व रशिया देश बराच उदयास आणिला. यानें मरणकाळीं आपले मुलांस उपदेश केला तो:—

"माझ्या मुलांनो, ईश्वराची भक्ती करा. चांगलें काम केल्यानें जसें तुमचे तारण होईल तसें उपास केल्यानें किंवा एकांतांत राहिल्यानें किंवा संन्यास घेतल्यानें होणार नाहीं. गरीबांचा समाचार घेत जा, त्यांचा सांभाळ करा. जगांतील सर्व चांगल्या वस्तूंचा स्वामी ईश्वर आहे. तें स्वामित्व त्यानें थोडा वेळ तुमचे स्वाधीन केले आहे. जमिनींत पैसा पुरून ठेवूं नका. अनाथ मुलांचें पालन करा. विधवा बायकांचा स्वतः न्याय करा. सामर्थ्यवानांकडून गरीबांस त्रास होऊं देऊं नका. अपराधी अगर निरपराधी मनुष्यांचा जीव घेऊं नका. चाकरांवर विश्वास न ठेवितां घरांतील देखरेख तुम्ही स्वतः पहा, म्हणजे जेवणामध्यें किंवा घरांमध्यें कसलीही चूक दुसऱ्यांचे नजरेस येणार नाहीं. लढाईचे वेळेस हुशार राहण्याचा कित्ता आपले सरदारांस घालून द्या. मेजवानीची किंवा आनंदाची ती वेळ नसते हें ध्यानांत असूं द्या. रात्रीचे पहारे बसविल्यावर विश्रांती घेत जा. निजण्याचे वेळेस आपलीं हत्यारें व घोडा लांब ठेवीत जाऊं नका. गरीब किंवा श्रीमंत, व्यापारी किंवा वकील असल्या परकीय लोकांचा मान राखीत

जा. त्यांस बक्षीस देण्याचें तुह्मांस सामर्थ्य नसले तर त्यांस तुह्मी खाऊं पिऊं घालून त्यांचें समाधान करा, कारण अशा लोकांकडून परदेशीं कीर्ति किंवा अपकीर्ति होत असते. जो भेटेल त्यास सलाम करीत जा. आपले बायकोवर प्रीति करा, परंतु तिचा अंमल आपल्यावर चालेल असें होऊं देऊं नका."

रशिया देशांत निरनिराळीं संस्थानें असल्यामुळें त्यांत वारंवार भांडणें लागत; यामुळें तातर देशांतील लोकांचें लक्ष या देशाकडे लागलें. प्रथम १२९३ मध्यें जंगीजखानाचें मुलानें या देशावर स्वारी केली. दुसरी स्वारी सन १२३६ त त्याचे नातवानें केली. यानें सर्व देश जिंकून सर्व संस्थानिकांस आपले हास्तक करून ठेविलें.

सन १३२१ मध्यें कीक संस्थान बुडालें, आणि इव्हान राजानें मास्को आपलें राजधानीचें शहर सन १३२८ मध्यें केलें. एथील राजास ग्रयांड डूयक म्हणत. इव्हयानचे मागें डिमिट्री इव्हयान नांवाचा राजा गादीवर बसला. यानें तातर लोकांस आपले राज्यांतून हकून दिलें. पुढें बरेंच दिवस रशिया देशांत स्वस्थता होती. सन १३९२ सालीं तातर लोकांनीं पुन्हां स्वारी केली, आणि मास्को शहर घेतलें. तेथील लोकांस मारून व लूटून ते लोक परत गेले. पुढें सन १३९५ मध्यें टामर्लेन नांवाचे राजानें स्वारी केली. हा परत गेला तथापि वयापचाक येथें कांहीं मुसलमान लोक वस्ती करून राहिले व त्यांनीं निराळ्याच राज्याची स्थापना केली. तिसऱ्या इव्हयान राजानें सन १४६२ सालीं रशिया देशांतून तातर लोकांचा अंमल अगदीं उडविला. यानेंच झार ही पदवी सन १४८२ सालीं आपले नांवास लावून घेतली. हा हल्लींचे रशियाचे बादशहाचे घराण्याचा मूळ पुरुष आहे असें मानिले तरी चालेल. यानें सर्व लहान संस्थानें आपल्या ताब्यांत आणून एका मोठ्या राज्याची स्थापना केली. हा झार मेल्यावर व्यासली इव्यान नांवाचा याचा मुलगा गादीवर बसला. हा पुन्हा तातर लोकांस अंकित झाला. याचे मागें याचा मुलगा गादीवर बसला. यानें तातर लोकांचें वरचस्व काढून तो टाकून स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. याच्या अमलामध्यें युरोपांतील देशांतून वकील प्रथम

मास्को शहरीं आले. विद्या व कला शिकविण्याचें काम यानेंच सुरू केलें. या झारानें तातर लोकांच्या स्वाऱ्या बंद करण्यासाठीं त्यांचे वाटेवर किल्ले बांधिले; व डानकोसाक लोक जिंकून त्यांस आपले ताब्यांत आणिलें, नवीन कायदे केले व परदेशांत वकील पाठविले. याचे कारकीर्दीचे अखेरीस तातर लोकांनीं पुन: स्वाऱ्या करून सन १५७१ सालीं मास्को शहर जाळिलें. याचे मागें फ्युडर नांवाचा झार झाला. याचा मेव्हणा बोरिस गाडूनाफ म्हणून होता. त्यानें झाराचे मुलास मारेकरी घालून मारविलें असें ह्मणतात. याचे राज्यांत सन १६०१ सालीं मोठा दुष्काळ पडला व पुष्कळ बंडें झालीं. पुढें १६१३ मध्यें रूरिकचे घराण्यांतील शेवटचे पुरुषाची आई ज्या घराण्यांतील होती त्याच घराण्यांतील फ्युडरविच नांवाचे मनुष्यास लोकांनीं गादीवर बसविलें. हा सध्याचे झारचा खरा मूळपुरुष होय. यानें पुष्कळ देशांशीं व्यापारसंबंधी तह केले. याचा मुलगा अलक्सीस गादीवर बसल्यावर पोलस लोकांबरोबर लढाया झाल्या. झोपोलोविन कोसाक लोकांनीं मदत केल्यामुळें आझोपचा समुद्र त्यास व्यापार करण्यास मोकळा करून दिला. आलेक्सीस झाराला दोन बायका होत्या. पहिले बायकोस दोन मुलें व दुसरीस पीटर नांवाचा एक मुलगा होता. दोन्ही भाऊ मेल्यावर सन १६९६ त पीटर हा राजा झाला. यानें शहाणे लोकांचे मदतीनें सैन्यांत सुधारणा केल्या. आपल्या जवळ आरमार असल्या शिवाय आपल्या देशाचा व्यापार वाढून आपला देश भरभराटीस येणार नाहीं असें पीटरला वाटलें. जहाजें ठेवण्यासारखा जरी समुद्र त्याचे ताब्यांत नव्हता तरी आरमार तयार करण्याची त्याची इच्छा कांहीं कमी झाली नाहीं. तो स्वत: हालंड, इंग्लंड वगैरे देशांत जाऊन जहाजें करण्याचें काम शिकला. परदेशांतून कारागीर बोलावून त्यांनीं आपले लोकांसही तें काम शिकविलें. नंतर बाल्टिक समुद्राचे कांठीं आपली राजधानी करण्याचा बेत करून फिन्लंडचे अखाताजवळ नेवानदीचे कांठीं सेंटपिटर्सबर्ग नांवाचें शहर सन १७०३ सालीं वसविलें कान्स्टांटिनोपल शहर ताब्यांत घेण्याचा फार मान-

स होता. यानें सन १७११ मध्यें तुर्क लोकांबरोबर लढाई करून तो स्वतःच पराभव पावला.

यानें बरेंच देश जिंकून आपले नांवास 'दी ग्रेट' पदवी लावून घेतली. यानें आपले देशांत पुष्कळ सुधारणा केली व जागोजाग कालवे खणले. हा झार सन १७२५ मध्यें मरण पावला. कान्स्टांटिनोपल आपली राजधानी करण्याची त्याची इच्छा तशीच राहिली. याचे मागें काथराईन नांवाची याची बायको राज्य करूं लागली. हिच्या मागें पहिल्या पीटरचा नातू दुसरा पीटर या नांवानें राज्य करूं लागला. यास लोकांनीं पदभ्रष्ट केलें. नंतर पीटर दी ग्रेटचे थोरल्या भावाची आन नांवाची मुलगी गादीवर बसली. हिनें पोल्स, तुर्क व तारतर लोकांबरोबर लढाया करून क्रिमिया देशावर स्वारी केली. हिचे मागें पीटर धी ग्रेटचा नातु साहावा इवान गादीवर बसला. याला पीटर दी ग्रेटची मुलगी इलीझाबेथ हिनें कैद केलें आणि आपण राज्य करूं लागली. यावेळेस आस्त्रिया देशचे गादीबद्दल तंटा लागला होता. त्यांत मेरियाथेरिसास हिनें ३६ हजार रशियन सैन्याची मदत दिली. या दिवसापासून रशियाचें राज्य युरोप खंडांत गणलें जाऊं लागलें. हिचे मागें तिसरा पीटर गादीवर बसला. यास याचे बायकोनें पदभ्रष्ट केलें आणि ती दुसरी काथराईन या नांवानें १७६२ त राज्य करूं लागली. हिनें पीटर धी ग्रेटचे धरतीवर राज्य करून रशिया देश बराच उदयास आणिला. पोलंड देशांत ग्रीक व रोमन धर्माचे लोकांचे भांडण लागलें होतें. त्यांत हिनें ग्रीक धर्माचे लोकांचा पक्ष धरून पोलंड देशावर स्वारी केली. रोमन धर्माचे कांहीं सरदारांनीं बंड करून तुर्क सरकारचा आश्रय केला. या कारणामुळें तुर्क व रशियन लोकांची सन १७६९ मध्यें लढाई झाली. या लढाईंत पोलंड देशाचा नाश होऊन पुष्कळ मुलुख परराज्यांत सामील केला गेला. पुढें सन १७७२ व सन १७९३ व शेवटीं सन १७९५ मध्यें रशिया, प्रशिया व आस्त्रिया या तीन सरकारांनीं पोलंडचें राज्य अगदीं बुडवून तो मुलुख वाटून घेतला. काथराईनचे मनांत कान्स्टांटिनोपल शहर राजधानी करावयाचें होतें यामुळें ती तुर्क लोकांस

बुडविण्याची संधी पहात असतां सन १७९६ मध्यें मरण पावली. हिचे मागें हिचा मुलगा पाल गादीवर बसला. हा जुलमी होता यामुळें यास लोकांनीं गादीवरून काढिलें. आणि याचा मुलगा पहिला आलेक्झांदर यास सन १८०१ मध्यें गादीवर बसविलें. याचेच राज्यांत रशिया देश युरोपखंडांतील पहिले प्रतीचे राष्ट्रांत गणिला गेला. हा राजा मेल्यावर सन १८२५ सालीं निकोलास नांवाचा याचा भाऊ झार झाला. यानें तुर्कीचे सुलताना बरोबर लढाई करून त्यास बरेच जेरीस आणलें. सन १८५४ सालीं तुर्कीस अगदीं बुडविण्याचा यानें बेत केला होता; परंतु सुलतानास इंग्लिश व फ्रेंच अनुकूळ झाल्यामुळें त्याचा बेत फसला. हा झार सन १८५५ मध्यें मरण पावला. याचे मागें दुसरा आलेक्झांदर गादीवर बसला तो अद्याप राज्य करीत आहे. हल्लीं जेवढें रशियन लोकांचें राज्य आहे याचा सतरावा हिस्सा आरंभीं रशियन लोकांचे राज्य होतें. पीटर दी ग्रेट झारचे वेळेस रशियाचें राज्य २,८०,००० चौरस मैल होतें व हल्लीं पांच लक्ष चौरस मैल राज्य झालें आहे.

तुर्क आणि रशियन हे एकाच कुळांत उत्पन्न झालेले लोक आहेत. तुर्कलोक प्रथम काकेशस पर्वता जवळ राहात होते. अरब व इराणी लोकांच्या सहवासानें हे लोक मुसलमानी धर्माचे झाले. यांतील कांहीं लोकांनीं बारावे शतकामध्यें इजिप्त येथें राज्याची स्थापना केली. यांच्यांत सुलीमान ह्मणून मोठा शूर राजा झाला. त्यानें एशिया मायनर ज्याला रूमशाम ह्मणत तो मुलूख आपले तब्यांत घेतला. जंगीजखान नांवाचे तारतार राजानें याचे मोठेपणांत कमीपणा आणिला. सुलीमानचे मागें आलादीन मोठा राजा झाला. याचें राज्यांत अर्टोग्रल ह्मणून एक सरदार मोठा उदयास आला. या सरदाराकडे अलादीनानें आंगोरा जवळचा मुलूख संभाळण्याचें काम दिलें. हा मुलूख कान्स्टांटिनोपल येथील बादशाहाचे मुलखास लागून होता. अर्टोग्रल सन १२८८ मध्यें मरण पावला. याचे मागें ओथमन नांवाचा याचा मुलगा तें काम करूं लागला. यानें स्वतंत्र राज्यांची स्थापना केली. याचे नांवावरून तुर्कीचे राज्यास ओटोमनचें राज्य असें नांव पडलें असावें. हा मोठा शहाणा व शूर होता. यानें

आपलें राज्य बरेच वाढवून ब्रौसा आपलें राजधानीचें शहर केलें. याचे मागें अर्कन नांवाचा याचा मुलगा गादीवर बसला. यानें आपलें राज्य वाढवीत युरोपखंडाचे मर्यादेपर्यंत आणिलें, व मोठें अरमार तयार केलें. हा राजा इतका शक्तीमान झाला कीं कान्स्टांटिनोपल येथील बादशाहा देखील याशीं स्पर्धा करण्यास भिऊं लागला, आणि याशीं स्नेह करण्याची इच्छा त्यानें धरली.

आपआपसांत भांडणें लागून व लोक दुराचारी झाले कारणानें कान्स्टांटिनोपलचें राज्य मोडकळीस आलें होतें. सन १३२६ सालीं येथील बादशहाचे मुलानें बंड केलें आणि त्यानें तुर्क लोकांस मदतीस बोलाविलें. उमरबे नांवाचा सरदार २८००० सैन्य घेऊन राजपुत्राचे मदतीस गेला. या लोकांनीं युरोपखंडांतील संपत्ती सुंदर व भव्य शहरें पाहिलीं आणि तीं जिंकण्याची त्यांस इच्छा झाली. पुढें कान्स्टांटिनोपलचे बादशहांस जेव्हां मदतीची गरज लागे तेव्हां ते तुर्क लोकांस बोलावूं लागले. प्रत्येक मदतीचे वेळेस थोडा प्रांत मिळवावा, अशा रीतीनें सर्व रूमशाम देश तुर्क लोकांनीं मिळविला. सन १३५६ मध्यें अर्कनचे मुलानें युरोप खंडांतील गालिपोली बंदर प्रथम मिळविलें. पुढें सन १३५९ त मुराथ राजानें थ्रेस प्रांत मिळविला, आणि सन १३६१ मध्यें आद्रियानोपल शहर आपली राजधानी केली. सन १३८९ मध्यें सर्वियन लोकांबरोबर कासोवाची मोठी लढाई झाली त्यांत तुर्क लोकांचा जय होऊन सार्विया, बोसनिया, बलगेरिया आणि अल्बेनिया प्रांत जिंकले गेले. नंतर वालाशिया प्रांत ताब्यांत आला. तुर्क लोकांची चाल अशी असे कीं जो प्रांत जिंकावा त्या प्रांतांतील लोकांची शिपायांत भरती करावी. असल्या सैन्यास 'झानीझेरीज' ह्मणत. पुढें काळेंकरून हें सुलतानाचें हुजुरचें सैन्य झालें, व यापासून त्यांस फार त्रास भोगावा लागला.

आमुराथच्या पाठीमागें बयाझिद राजा झाला. त्यानें आपला अंमल युफ्रेतीस नदीपासून डान्यूब नदीपर्यंत वाढविला. नायकापोलीस येथें सन १३९६ त त्यानें हंगारीचे राजाचा पराभव करून कान्स्टांटिनोपलच्या बादशहापासून खंडणी घेतली.

अशा प्रकारें युरोप खंडांत राज्य वाढत चाललें असतां एशिया खंडांत मात्र टामरलेन बादशहानें अंगोरा येथें सन १४०२ मध्यें बयाझीद याचा पराभव केला व यास कैद करून नेलें. यावेळेस याचें सगळें राज्य टामरलेनचे हातीं गेलें असतें परंतु त्यास चीन देशाकडे जाण्याची त्वरा असल्यामुळें तो तिकडे गेला. बयाझीदचे मागें त्याच्या चार मुलांमध्यें राज्या बद्दल भांडण लागलें. शेवटीं सन १४१३ मध्यें महमद नांवाच्या धाकट्या मुलानें बाकीच्या तिघांस जिंकून आपण राजा झाला. एशियामानर मधील सर्व प्रांत जिंकून यानें परत घेतला. सन १४१६ मध्यें याचे अरमाराचा गालीपोली जवळ वेनिशियन लोकांनीं पराभव केला.

सन १४२१ मध्यें दुसरा अमुराथ राज्य चालवूं लागला. यावेळेस मुस्ताफा या नांवाचे मनुष्यानें राज्याचे वारसदार आपण आहोंत असें ढोंग केलें. अमुराथनें याचा पराभव केल्यावर हा कान्स्टांटिनोपल येथील बादशहाचे आश्रयास गेला. या तोतयानें कान्स्टांटिनोपल येथून सैन्याची मदत घेऊन गालीपोली व आद्रियानोपल हीं शहरें तुर्क लोकांपासून परत घेतलीं. पुष्कळ तुर्क लोक यास अनुकूळ झाले होते. सन १४२२ मध्यें अमुराथनें गालीपोली जवळ या तोतयाचा पराभव करून कान्स्टांटिनोपल शहरास वेढा घातला आणि आपलीं शहरें परत घेतलीं. यानें वेनिशियन लोकांशीं लढाई करून क्रीट बेट घेतलें. आणि ट्रानसिलवानिया प्रांतांतून ७०,००० लोक कैद करून नेले. नंतर हंगारियन लोकांशीं सन १४४४ सालीं वार्ना येथें व पुन्हा १४४८ सालीं कासोवा येथें लढाई करून त्यानें हंगारियन लोकांचा पराभव केला, व डान्यूब नदीपर्यंत आपलें राज्य वाढविलें.

तुर्क लोकांची राज्य करण्याची रीत अशी होती कीं, जिंकलेले प्रांतांतून कांहीं भाग राजानें आपलेकडे ठेवून बाकीचा मुलूख आपले प्रजेस वाटून द्यावा. त्या जमिनदारांनीं गरज पडेल तेव्हां जमिनीचे मानाप्रमाणें राजास सैन्याची मदत करावी. या रीतीनें रयतेवर फार जुलूम होत असे. राज्याचा कारभार चालविण्यास एक मनुष्य सुलतान नेमी. त्यास वझीर ह्मणत; याचे हाताखालीं युरोपखंडांतील

राज्याचा कारभार चालविण्यास एक व एशियाखंडातील राज्य कारभार चालविण्यास एक अशीं दोन मनुष्यें असत. त्यांस काडीअस्कर ह्मणत. यांचे हाताखालीं राजपुत्रांस शिकविण्यासाठीं खोज्या आणि शास्त्रार्थ सांगण्यासाठीं मुफतिया असत. हे सर्व एकत्र बसलेले कचेरीस दिवाण ह्मणत, व या कचेरीचे कारकुनास रीसएफंडी म्हणत असत. दुसरा महमद राज्य करूं लागला तेवेळेस तुर्की राज्य शिखरास जाऊन पोहोंचलें होतें. यानें बासफरसची सामुद्रधुनी आपले ताब्यांत घेऊन तेथें एक किल्ला बांधिला; आणि त्या सामुद्रधुनींतून जाणाऱ्या येणाऱ्या जहाजापासून जकात घेऊं लागला.

कान्स्टांटिनोपल शहराला पूर्वीं बायझानशियम ह्मणत असत. या प्रांतीं ज्या ज्या राजांचें प्राबल्य झालें त्या त्या राजांचे ताब्यांत हें शहर जाऊन शेवटीं कान्स्टाईन राजानें घेऊन तेथें नवीन शहर बसवून आपली राजधानी केलें आणि कान्स्टांटिनोपल असें नांव ठेविलें. या दिवसापासून रोमी राज्याचे दोन भाग होऊन इस्टर्नएम्पायर या नांवानें हें राज्य चाललें होतें. सन १४५३ मध्यें महमदानें दोन महिने वेढा घालून मोठी लढाई करून तें शहर घेतलें आणि इस्टर्नएम्पायर नांवाचें राज्य बुडविलें. या लढाईंत ४०,००० ख्रिस्ती मेले व ६०,००० कैदी झाले. मंतर कान्स्टांटिनोपल तुर्क लोकांची राजधानी झाली. या वेळेस ग्रीस, वालाशिया, सर्विया, बोसनिया, अलबेनिया, इपायरस, क्रिमिया व कारामेनिया इतके प्रांत व युरोपखंडांतील कांहीं बेटें तुर्कीचे ताब्यांत होतीं. या महमदानें आपणास बादशहा किंवा सुलतान ही पदवी लावून घेतली. सन १५१२ त सेलीम सुलतान गादीवर बसला व यानें इराणचे शहापासून मेसापोटेमिया व कुर्दीस्थान हे दोन प्रांत घेतले. सन १५१६ त सिरिया देश याचे ताब्यांत आला, व आफ्रिकाखंडाचे उत्तरेकडील बरेच देश यानें आपले ताब्यांत आणिले. सेलीमचे मागें सुलीमान सुलतान झाला. यानें हंगारी देश जिंकून भूमध्य समुद्रावर मोठा दरारा बसविला. यानंतर दुसरा सेलीम गादीवर बसला. यानें सन १५७१ मध्यें वेनिशियन लोकांपासून सायप्रस बेट घेतलें. इटालियन, स्पानियर्ड व वेनिशियन

या तिघांनीं लिपांटोजवळ तुर्कांचे जहाजांचा मोठा पराभव केला. हा सेलीम सुलतान सन १५७४ मध्यें मरण पावला. या सुलतानापर्यंतचे तुर्कांचे सर्व सुलतान मोठे शूर व शहाणे होते. तेथून पुढें निराळीच तऱ्हा लागली. तुर्क लोकांचे पहिले गुण नाहींसे होऊन ते ऐषआरामी व चैनी निघाले. राज्याची व्यवस्था नीट चालेनाशीं झाली व रयतेवर फार जुलूम होऊं लागला. यामुळें दुसरे लोकांस हात घालण्यास सवड झाली.

दुसरा सेलीम राजा मेल्यावर तुर्क लोकांची देश जिंकण्याची इच्छा कमी झाली. स्वस्थपणानें जिंकलेले देशाचा उपभोग घ्यावा असें त्यांस वाटूं लागलें. तिसऱ्या अमुराथ राजानें सन १५७४ पासून सन १५९५ पर्यंत राज्य केलें. हा युरोपखंडांतील राजाशीं स्नेहभावानें वागूं लागला. स्वस्थ बसल्यानें सुलतान विषयासक्त झाले व त्यांचे सरदार आळशी व क्रियाभ्रष्ट झाले. रूमी बादशहाचे गादीवर आल्यापासून ऐषआराम, चैनबाजी व निरुद्योगीपणा त्यांचे आंगांत भरला. तिसरा अमुराथ गादीवर बसला तेव्हांपासूनच हें राज्य बुडणार असें लोक कल्पना करूं लागले.

तिसरा अमुराथ मेल्यावर पहिला आलमथ गादीवर बसला. नंतर त्याचे पाठीमागें चवथा अमुराथ झाला. याचे राज्याचे वेळेस एशियाखंडांतील प्रांतांत बंड झालें. इराणी लोकांनीं बगदाद शहर घेतलें. आणि सन १६२४ मध्यें क्रिमिया देशांतील तारतर लोकांनीं तुर्कांचे सैन्याचा पराभव केला. याच सालीं कोसाक लोकांनीं येऊन कान्स्टांटिनोपल शहरच्या जवळचा प्रदेश लुटला. सन १६३५ सालीं सुलतान एशियाखंडांतील प्रांतावर स्वारी करण्यास निघाला आणि सन १६३८ पर्यंत त्यानें सर्व प्रांत परत घेऊन इराणचे शाहाशीं तह करून तो परत आपले शहरीं आला. यावेळेस इरीवान शहर सुलतानानें शाहास दिलें. हा सुलतान सन १६४० मध्यें मरण पावला. सन १६४८ पासून सन १६८७ पर्यंत चवथ्या महमद सुलतानानें राज्य केलें. याचे राज्यांत दोन वेळ वेनिशियन लोकांनीं तुर्क आरमाराचा पराभव केला. जानीझेरीज सैन्यानें पुष्कळ वेळ बंडें केलीं. या सैनिकांचे

इतकें प्राबल्य वाढलें कीं, ते पाहिजे त्यास सुलतान करून गादीवर बसवीत व पाहिजे त्यास पदभ्रष्ट करीत. आठ वर्षांत त्यांनीं पंधरा मुख्य वजीर अधिकारावरून काढले व पंधरा नवे मुख्य वजीर केले. सन १६८७ त या जानीझेरीज सैनिकांनीं महमदास पदच्युत केलें.

सन १६९५ मध्यें दुसरा मुस्ताफा सुलतान गादीवर बसला. सन १६९६ पासून रशियन लोकांची व तुर्क लोकांची घासाघाशीं सुरू झाली. या वर्षी रशियनचा राजा पीटर दी ग्रेट यानें आस्त्रियन लोकांचे मदतीनें सुलतानापासून अझोप शहर घेतलें, व आस्त्रियन लोकांनीं तमेस्वर येथें सुलतानाचा पराभव केला. सन १६९७ सालीं सुलतानानें पुन: आस्त्रियन लोकांबरोबर लढाई करून आपणच पराभव पावला. पुढें सन १६९९ मध्यें कारलोविझ येथें तहनामा झाला. या तहनाम्याचे योगानें हंगारी देशाचा बराच भाग, ट्रानसिलवानिया आणि स्लावोनिया, इतके देश आस्त्रियाचे राजाकडे गेले, आझोप शहर रशियन सरकाराकडे राहावें असें ठरलें; पोडोलिया, अक्रेन आणि कामीनीक पोलंडचे राज्यांत सामील केले; आणि मोरिया व दालमेशिया विनिशियन लोकांस दिले. या तहनाम्यामुळें तुर्कीमध्यें बंड झालें आणि सन १७०३ मध्यें मुस्तोफा सुलतानास लोकांनीं पदच्युत केलें. तिसऱ्या अक्मेनसुलतानाचे वेळेस रशियन बादशहा पीटर दी ग्रेट यानें तुर्की राज्यावर स्वारी केली परंतु त्याचा असा पराभव झाला कीं त्यास आपले जिवाचे रक्षणार्थ मुख्य वजीरास लाच द्यावा लागला. ही लढाई सन १७११ मध्यें झाली, आणि आझोप शहर सुलतानानें परत घेतलें. याच वेळेस विनिशियन लोकांपासून मोरिया प्रांत घेतला. आस्त्रियन राजाची आणि सुलतानाची पुन: लढाई झाली आणि सन १७१८ मध्यें पासारोविच येथें तहनामा होऊन बेलग्रेड शहर, वालाशिया व सर्विया यांचा पश्चिम भाग आस्त्रियन सरकारास दिला. यास जानीझेरीज सैनिकांनीं पदच्युत केलें. याच वेळेस इराणचे शाहानें सुलतानानें घेतलेला मुलुख परत घेतला.

सन १७३७ सालीं तुर्क व आस्त्रियन लोकांची पुन: लढाई चालू होऊन सन १७३९ मध्यें समाप्त झाली. या लढाईंत तुर्क लोकांनीं

आपला सगळा मुलुख परत घेतला. ही लढाई रशियन लोकांनीं सुरू केली व त्यास आस्त्रियन लोकांनीं मदत केली. पीटर दी ग्रेटचे मनांत कानस्टांटिनोपल शहर घेण्याचे होतें; परंतु तुर्की बरोबर लढाई करण्याचें सामर्थ्य त्याचे एकट्याचें आंगांत नव्हतें. हें सामर्थ्य रशियन सरकारचे आंगीं आणण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न चालविला होता. पुढें सन १७६८ मध्यें पोलंड देशाचे संबंधानें तुर्कांचा सुलतान तिसरा मुस्ताफा व रशियाची राणी दुसरी काथराईन यांमध्यें लढाई झाली. ही लढाई सन १७७४ मध्यें संपली. डान्यूब व नीपर नद्यांचे मधला मुलूख रशियनचे हातीं लागला, तसाच त्यांनीं क्रिमिया देश घेतला व सन १७७० साली तुर्कांचे आरमाराचा पराभव केला. सन १७७४ त बलगेरिया देशांतील कौटचौंक केनारजी येथें तहनामा झाला. तो पहिला अब्दूल हमीद सुलतान गादीवर बसल्यावर त्यानें केला. या तहनाम्या प्रमाणें मोठा व धाकटा काबाडी प्रांत; आझोपचा किल्ला; किबोर्न, केर्च आणि येनीकेल हीं शहरें; बॅग आणि नीपर नद्यांचें मधला मुलूख रशियनांचे ताब्यांत गेला. तसेंच काळे समूद्रांतून बासफरस व डार्डनेल्सचे सामुद्रधुन्यांतून जहाजें नेण्याची रशियन लोकांस मोकळीक झाली. वालासिया व मोलडाविया प्रांतांत सुलतानानें व रशियाचे राजानें मिळून देखरेख ठेवावी; व तुर्कांचे राज्यांतील ग्रीक धार्मानुयायी लोकांचे हक्काचें रक्षण रशियन बादशहानें करावें असें ठरलें.

याशिवाय या तहनाम्यानें रशियन लोकांस जकात दिल्याशिवाय यरूसालेम व पालेस्टाईन येथें यात्रेस जाण्याची परवानगी मिळाली.

या दिवसा पासून तुर्कांचे राज्यांत ढवळाढवळ करण्याची संधी रशियन सरकारास मिळाली होती ती सन १८५६ सालीं नाहींशी झाली.

हा तहनामा फार दिवस चालला नाहीं. क्रिमिया देशांत तारतर लोकांचें राज्य होतें. हे लोक सुलतानाचे ताब्यांत होतें. तो देश तेथील अधिकाऱ्यांस काढून टाकून आपले ताब्यात घ्यावा असा दुसऱ्या कथराईन राणीनें बेत करून सन १७८३ चे एप्रील

महिन्याचे १० वे तारखेस देशताब्यांत घेण्याचा हुकूम दिला. हा हुकूम सुलतानानें आपले अंगीं रशियन लोकांबरोबर लढण्याची शक्ति नाहीं हें पाहून मान्य. केला. त्या राणीनें सवास्तपोल येथें मोठा मजबूत किल्ला बांधिला. हें पाहून सुलतानास संशय आला. त्यानें लढाईची तयारी चालविली व परराजांची मदत मिळविण्याची खटपट केली. काळ्या समुद्रांत रशियन लोकांचें वरचस्व बसलेलें पाहून इंग्रज सरकारास वाईट वाटलें म्हणून त्यांनीं तुर्कीचे सरकारास पैशाची मदत देण्याचें कबूल केलें. नंतर सन १७८७ मध्यें सुलतानानें रशियन सरकाराबरोबर लढाई करण्याचा ठराव केला. रशियनांस आस्त्रियन लोक मिळाले. आस्त्रियन लोकांचा तुर्क लोकांनीं पराभव केला यामुळें सन १७९१ मध्यें आस्त्रियन लोकांनीं आपलें अंग लढाईंतून काढून घेतलें. पुढें रशियन सरकारानें एकट्यानेंच लढाई चालविली; इस्मेल वगैरे किल्ले घेतांना ३३००० तुर्क शिपाई मारिले व जखमी केले. नंतर जासी येथें तहनामा १७९२ सालीं झाला. त्यांतील ठराव:—

१. नीस्टर नदी दोन्ही राज्याची सरहद्द समजावी.

२. क्रिमिया देश, टामन बेट व क्युबनचा कांहीं भाग तुर्कीनें रशियास द्यावा.

३. दाहा लक्ष ऐंशी हजार पौंड लढाईचे खर्चाबद्दल तुर्कीनें रशियास द्यावेत.

४. बाकीचा जिंकलेला मुलूख रशियनानें तुर्कीस परत द्यावा.

५ बासफरसचें सामुद्रधुनींतून रशियनांचीं जहाजें जाण्यास कांहीं हरकत नसावी.

हा तहनामा झाल्यावर नीस्टर नदीचे मुखाजवळ रशियाचे राणीनें ओडेसा नांवाचे बंदर वसविलें.

रशियन लोकांशीं दोन लढाया झाल्या त्यांत आपला पराभव झाला हें पाहून तिसरे सेलीम सुलतानास वाटलें कीं, आपण आपले राज्याची सुधारणा केल्याशिवाय आपले राज्याचा निभाव लागणार नाहीं. त्यानें सैन्यांत सुधारणा करण्यास आरंभ केला तो सिरिया व इजिप्त

येथील अधिकाऱ्यांनीं बंड केलें. याचप्रमाणें विडन व जेनिना येथील पाशा सुलतानाबरोबर लढाई करण्यास तयार झाले. इतक्यांत तुर्क व रशियन लोकांचे जहाजांनीं आयओनियन बेटें घेतलीं. रशियाचे राजानें हीं बेटें तुर्कीस देऊन त्यांचे बदला गाजिया प्रांत तुर्कीं पासून आपण घेतला. इजिप्त देशांत गडबड झालेली पाहून फ्रेंच लोकांनीं त्यावर स्वारी केली परंतु त्यांचा इंग्लिशांनीं पराभव केला. या वेळेस फ्रान्स देशाचा राजा व सुलतान यांमध्यें तहनामा होऊन फ्रेंच लोकांचे जहाजांस काळेसमुद्रांत जाण्याची परवानगी मिळाली. नंतर लवकरच इंग्रज सरकारास व युरोपखंडांतील इतर राष्ट्रांसही परवानगी मिळाली. फ्रेंच वकिलाचे सांगण्याप्रमाणें सुलतान वागूं लागला यामुळें इंग्रजसरकार व रशियन सरकार यांस वाईट वाटून त्यांनीं तुर्कांबरोबर लढाई सन १८०६ त सुरू केली. जानीझेरीज सैनिकांनीं बंड करून सुलतानास पदच्युत केलें व चवथा मुस्ताफा सुलतान यास सन १८०७ मध्यें गादीवर बसविलें. सन १८०८ मध्यें रश्चकचे-पाशानें या सुलतानास राज्यावरून काढून पुन्हा महमदास गादीवर बसविलें व आपण मुख्य वजीर झाला. या दोघांनीं सैन्यांत सुधारणा करण्याचें चालविलें. हें पाहून जानीझेरीज सैनिकांस राग आला व त्यांनीं वजीराचे वाड्यास आग लावून त्यास जाळून टाकिलें व सुलतानाचे वाड्यास वेढा घातला. सुलतानाचें पक्षाचें जें सैन्य होतें त्यांची व यांची तीन दिवस लढाई होऊन मोठी कत्तल उडाली. या गर्दींत सुलतान शिवाय करून राजघराण्यांतील सर्व माणसें मारलीं गेलीं. सुलतानाशिवाय राज्यास कोणी वारस राहिला नाहीं हें पाहून जानीझेरीज लोकांनीं हत्यार खालीं ठेवलें.

इंग्लिशांचीं दोन जहाजें तुर्क लोकांनीं डारडेनलचे सामुद्रधुनींत फोडलीं यामुळें इंग्रज सरकारांनीं लढाईंतून आपलें अंग काढून घेतलें. सन १८०९ मध्यें रशियन लोकांचें सैन्य डान्युब नदीपर्यंत येऊन पोहोंचलें. सन १८१२ मध्यें बुखारेस्ट येथें तह होऊन प्रूथ नदी रशियाचे राज्याची सरहद्द झाली. डान्युब नदींत रशियनांचीं जहाजें जावींत असें ठरलें. सर्विया देशांत तेथील लोकांनीं निवडलेला राजा असावा, व त्यानें तुर्कीस खंडणी मात्र देत जावी.

प्रूथ नदीपर्यंत रशियाची हद्द आल्यानें सगळा बसारेबिया प्रांत रशियन सरकारचे ताब्यांत गेला.

रशियन लोकांचा तंटा मिटविला तथापि तुर्क राज्यांत कांहीं स्वस्थता झाली नव्हती. कित्येक सरदारांनीं बंडें केलीं होतीं. हीं बंडें मोडून फार दिवस झाले नाहींत तों ग्रीस देशाचें प्रकरण उद्भवलें. यावेळेस येथें आलीपाशा मुख्य असून तो सुलतानाचा ताबेदार होता. यानें हळू हळू सगळा ग्रीस देश, अलबेनिया, इपायरस आणि थेसॅलीस इतके प्रांत आपले ताब्यांत घेतले. अलीपाशाची स्वतंत्र होण्याची इच्छा आहे हे सुलतानास समजलें होतें परंतु त्यावर चाल करून जाण्याचें धैर्य सुलतानास होईना. कारण तो मोठा शहाणा व क्रूर होता. पुढें सन १८२२ सालीं सुलतानानें त्यावर स्वारी करून त्यास मारून टाकिलें. परंतु स्वतंत्र होण्याची ग्रीक लोकांची इच्छा तशीच राहिली. रशियन लोकांनीं आपले एजंट ग्रीक लोकांत असंतोष उत्पन्न करण्यासाठीं पाठविलेच होते. सन १८२१ सालीं ग्रीक लोकांनीं बंडकेलें. या बंडवाल्यांनीं तुर्क लोकांची कत्तल उडविली. हें बंड मोडण्यास सुलतानाजवळ सैन्य शिल्लक नसल्यामुळें बरेंच वाढलें; व यास पुष्कळ लोक अनकूलही झाले. यानीं स्वतंत्र राज्याची स्थापना केली. एक सभा जमवून तिचे हातीं त्यांनीं राजकारभार दिला.

अशा प्रकारें बंड वाढत चाललें हें पाहून तुर्कीचे सुलतानानें इजिप्तचे पाशास असें सांगितलें कीं, हे बंड मोडून तो मुलूख तुम्ही घ्यावा आणि आपलें ही कांहीं सैन्य ग्रीस देशावर पाठविलें. सन १८२७ सालांत हें बंड अगदीं मोडत आलें तथापि ग्रीक लोकांनीं आपले हत्यार खालीं ठेविलें नाहीं. ग्रीक लोकांची फार त्रेधा उडाली हें पाहून इंग्लिश, फ्रेंच व रशियन एकत्र होऊन त्यांनीं मध्यस्ती चालविली. ग्रीक लोकांस स्वतंत्र करावें असें या तीन सरकारचे ह्मणणें होतें. तें तुर्कीचे सुलतानानें नाकबूल केले, यामुळें लढाईवर प्रकरण आलें. तुर्क आणि इजिपशियन लोकांचें अरमार नावारीनोचे उपसागरांत होतें त्यावर इंग्लंड, फ्रान्स व रशिया या तीन देशांचे अरमारानें येऊन हल्ला केला. यांत सुलतानाचे अरमाराचा पराभव होऊन तीस जहाजें फोडली गेलीं.

ईकडे ही लढाई चालली असतां सुलतान व त्याचें खासगी सैन्य यांमध्यें वाकडे येऊन कान्स्टांटिनोपल शहरांत मोठी गडबड झाली. यांत सुलतानानें जानीझरीज नांवाचें सैन्य अगदीं मोडून देशोधडीस लाविलें. अशा अडचणीचे वेळेस रशियन सरकारानें पुनः नवीन तह करण्याचें नेट तुर्क सरकाराचे मागें लाविलें. शेवटीं सन १८२६ चे आक्टोबर महिन्याचे ६ वे तारखेस बसारेबिया प्रांतांतील अकेरमान येथें तह झाला. त्या तहांत सन १८१२ मधील तहनामा कायम करून दुसरीं त्यास अधिक कलमें जोडलीं. तेणेंकरून तुर्क सरकारचें स्वातंत्र्य गत झाल्यासारखें झालें. या तहानें रशियन व्यापाऱ्यांचीं जहाजें डान्यूब नदी व डार्डेनेलची सामुद्रधुनी यांतून जाऊं येऊं लागलीं. काळ्या समुद्राचे पूर्व किनाऱ्यावरचा कोणचा ही किल्ला घेण्याचा अधिकार सुलतानास राहिला नाहीं. सर्विया व डान्यूब नदीचे कांठचीं संस्थानें स्वतंत्र झालीं. रशियन व्यापाऱ्यांचें झालेलें नुकसान सुलतानानें भरून दिलें.

नावारीनोचे लढाई पासून ग्रीस देश स्वतंत्र झाला, परंतु त्याचें स्वातंत्र्य सुलतानानें कबूल केलें नाहीं. पुनः लढाईची तयारी केली, आणि आपले राज्यांत जाहिरनामा प्रसिद्ध केला तोः—

आज साठ वर्षें झालीं रशियन लोक आपणांशीं वारंवार लढत आहेत. त्यांनींच ग्रीस देशांत बंड उत्पन्न करविलें. तुर्क लोक संकटांत आहेत असें पाहून अकेरमान येथें तहनामा करून घेतला. रशियन सरकारचा बेत मुसलमानी राज्य बुडविण्याचा आहे. आतां तो तहनामा आपण नामंजूर करूं. आपण देश जिंकण्यासाठीं किंवा सरहद्द वाढविण्यासाठीं लढाईस जात नाहीं. केवळ आपले धर्माचें रक्षण करण्यासाठीं आपणास लढाई करणें जरूर आहे. जो खरा मुसलमान असेल त्यानें लढाईस तयार व्हावें. मुसलमान धर्माचें रक्षण करण्यांत आपला जीव आपली मालमत्ता व आपलें शरीर आर्पण करा."

या समयास तुर्कीनें लढाईची तयारी करणें गैर होतें; कारण थोडेच दिवसापूर्वीं त्यांचे आरमाराचा नाश झाला होता, त्यांनीं जानीझेरीज नांवाचें

सैन्य मोडून टाकिलें होतें, व त्यांस पैशांची मोठी अडचण होती. राज्यामध्यें चोहोंकडे गडबड चालली होती. यावेळेस सुलतानाजवळ ८००० पायदळ व एक लाख स्वार होते; परंतु हे स्वार कांहीं उपयोगी नव्हते. ८०००० शिपायांपैकीं ३०००० शिपाई कान्स्टांटिनोपल शहराचें रक्षणार्थ ठेविले. २५००० शिपाई डान्युबनदीवरचे किल्ले संभाळण्यास ठेविले व सुमारें ३००००शिपाई रणभूमीवर पाठविले. या सैन्याचीं हत्यारें चांगलीं नव्हतीं व तोफखानाही चांगला नव्हता. रशियन सरकारानें प्रथम एक लाख सैन्य रणभूमीवर आणिलें. तुर्क लोकांचें जरी थोडें सैन्य होतें तथापि त्यांनीं फार चांगली लढाई केली. सन १८२९ पर्यंत त्यांनीं रशियन सैन्यास आपले राज्यांत येऊं दिलें नाहीं. शत्रूचें अतिशय सैन्य असल्यामुळें तुर्क सैन्याचा पराभव होऊन त्याच वर्षाचे सेप्टेंबर महिन्याचे १४ वे तारखेस आद्रियानोपल येथें तह झाला. या वेळेस एशियाखंडांतील बराच मुलूख तुर्क लोकांनीं रशियनास दिला. ग्रीस देश स्वतंत्र आहे असें सुलतानास कबूल करावें लागलें. वालाडिया व मोलडेविया हे प्रांत तुर्कीचे ताब्यांतून गेले. सर्विया संस्थान तुर्कीचे आश्रयाखालीं राहिलें. एक कोट (डुकट) लढाईचे खर्चाबद्दल तुर्कीस द्यावे लागले. हा पैसा फिटेपर्यंत सिलीस्ट्रिया शहर व डान्यूब नदीचे कांठचीं संस्थानें रशियनाचे ताब्यांत राहावीं असें ठरलें.

हा तहनामा झाल्यावर सुलतान महमद सैन्याची तयारी करण्यास लागला. याचवेळेस इजिप्तचा पाशा स्वतंत्र झाला. सन १८३३ त इब्राहिमपाशानें बंड करून सिरिया देश घेतला. या पाशाचें बंड रशियनांनीं मोडिलें. पुढें अंकीयारस्केलेसी येथें तुर्क व रशियन लोकांचा पुन्हा तह झाला. या तहांत लागेल तेव्हां तुर्क लोकांस रशियन लोकांनीं मदत करावी व रशियन सरकारचे हुकुमाशिवाय कोणत्याच राष्ट्राचे लढाऊ जहाजास तुर्क सरकारानें डार्डनेलचे सामुद्रधुनींतून काळे समुद्रांत येऊं देऊं नये असें ठरलें.

इजिप्तचे महमदअलीशीं लढाई करावी असा सुलतानानें निश्चय केला;

परंतु इंग्लंड, फ्रान्स व रशिया येथील सरकार मध्यें पडून त्यांनीं लढाई लांबणीवर पाडली. महमदअल्लीनें आरबस्थान देश जिंकण्याचा निश्चय केला. यामुळें सन १८३९ सालीं ही लढाई सुरू झाली. निसाबिस येथें तुर्क सैन्याचा मोठा पराभव झाला. ही बातमी कान्स्टांटिनोपल येथें येण्याचे अगोदरच सुलतान महमद मरण पावला. याचे मागें अबदुल मजीद गादीवर बसला. अकमेतपाशा तुर्कांचे आरमार घेऊन इजिप्तचे पाशास जाऊन मिळाला. सन १८४० चे जुलै महिन्याचे १५ वे तारखेस इंग्लंड, रशिया, आस्ट्रिया व प्रशिया इतके सरकारांनीं ठराव करून लंडन शहरीं एक याद काढिली. त्या यादीमध्यें इजिप्तचे पाशानें वंशपरंपरा इजिप्त देशाचें राज्य करावें; व तहहयात एकरशहर त्याकडे रहावें असें त्यांनीं ठरविलें होतें. जर हा करार पाशानें नाकबूल केला तर एकरशहर न देतां चाऱ्ही राष्ट्रांनीं इजिप्तवर स्वारीकरून हा ठराव त्याकडून कबूल करवावा असें ठरविलें होतें. नेमलेले वेळांत तह न झाल्यामुळें सुलतानानें इजिप्तचे पाशास पदभ्रष्ट केल्याचा जाहिरनामा काढिला. पुढें इंग्लंड, आस्त्रिया व तुर्की येथील अरमारानें बियारूट बंदर घेऊन ७००० इजिप्शियन शिपाई मारिले व जखमी केले. त्यांनीं सेप्टेंबरमध्यें सायडन व नोवेंबरमध्यें एकर घेतलें, व पुष्कळ सैन्य कैद केलें. सन १८४१ मध्यें तह झाला. सर्व तुर्कांचे अरमार परत मिळालें. महमदअल्ली वंशपरंपरा इजिप्तचा राजा झाला. नंतर तो सन १८४९ मध्यें मरण पावला. याचेमागें इब्राहीम व त्याचे मागें अबसपाशा गादीवर बसला. नंतर इस्मेल सन १८६३ चे जानेवारीचे १८ वे तारखेस गादीवर बसला. त्याला सन १८६७ मध्यें तुर्कांचे सुलतानानें खेडीव अशी पदवी दिली होती.

सिरीया देशांत शांतता झाल्यावर अबदुल मजीद सुलतानाचे राज्यांत कांहीं गडबड झाली नाहीं. यानें सन १८३९ सालीं आपले राज्यांत सुधारणा केली. या सुधारणुकीबद्दलचा जो कायदा त्याला हत्तीशेरीफ किंवा तान्झीमान असें ह्मणतात. या कायद्यानें सर्व जातींचे लोकांच्या मालमत्तेचें, धर्माचें, जीवांचें रक्षण करण्याची जबाबदारी सुलतानानें आपले शिरावर घेतली, सर्वांवर सारखा कर बसविण्याचे कबूल केलें,

व सर्वांस उघड रीतीनें न्याय मिळूं लागला. सन १८४९ सालापासून खिस्ती लोकांस मोठमोठ्या जागा मिळूं लागल्या.

या जाहिरनाम्याप्रमाणें सुलतान व मोठमोठे अधिकारी वागत असत. परंतु धाकटे धाकटे अंमलदार मात्र आपले पहिले वहिवाटी-प्रमाणें चालत. यांत सुधारणा करण्याचें काम मात्र हळू हळू चाललें होतें.

नंतर लवकरच क्रिमियाची लढाई सुरू झाली. या लढाईचें कारण असें झालें कीं, आस्त्रियाचे राज्यांतील हंगारियन लोकांनीं बंड केलें होतें. तें बंड मोडण्यास आस्त्रियाचे राजास रशियाचे राजाची मदत घ्यावी लागली. बंड मोडिल्यावर बंडांतले मुख्य मुख्य लोक तुर्कीचे राज्यांत पळून गेले. सन १८४९ सालीं हे बंडवाले धरून आमचे स्वाधीन करा असें रशियन बादशहानें मागणें केलें; परंतु तुर्कीचे सुलतानानें ते बंडवाले कांहीं रशियनाचे स्वाधीन केले नाहींत. रशियाचा बादशहा निकोलास याचे मनांत कान्स्टांटिनोपल शहर आपली राजधानी करावी असें होतें. आणि लढाई करण्यास वर सांगितलेलें कारण पुरें नाहीं असें पाहून त्यानें दुसरी कुरापत काढली ती अशी:—

पालेस्टाईन प्रांतांत कांहीं ठिकाणीं पुण्य क्षेत्रें आहेत असें खिस्ती लोक मानितात. त्या क्षेत्रांचें रक्षण करणें ग्रीक धर्मानुयायी लोक म्हणतात कीं आमचें आहे, व रोमन धर्मानुयायी लोक ह्मणतात कीं आमचें आहे. फ्रान्स देशचा फ्रान्सीस राजा यानें ती जागा आपले ताब्यांत घेऊन रोमी धर्मानुयायी लोकांचे स्वाधीन केली होती. सन १७५७ मध्यें ग्रीक धर्माचे लोकांनीं रोमी धर्माचे लोकांस तेथून हकून देऊन ती जागा त्यांनीं आपले ताब्यांत घेतली. हें फ्रेंच लोकांस आवडलें नाहीं. त्यांनीं याबद्दलचें भांडण पुनः सन १८५० सालीं काढलें. ह्या पवित्र जागा सुलतानाचे राज्यांत असल्यामुळें हा खटला सुलतानाकडे गेला. रशियन लोक ग्रीक धर्माचे आहेत व फ्रेंच लोक रोमी धर्माचे आहेत. ग्रीक धर्माचे लोकांच्या ताब्यांत ह्या जागा रहाव्या असा सुलतानानें निकाल केला. ह्या निकालानें फ्रेंच व इतालियन सरकारांस वाईट वाटेल म्हणून बेथलेहेम वगैरे ठिकाणच्या देवळाच्या किल्ल्या रोमी लोकांजवळ रहा-

ण्या असा सुलतानानें हुकूम दिला. येणें करून फ्रेंच लोकांचा राग कमी झाला व रशियन लोकांस राग आला. ग्रीक धर्माचे लोकांचें रक्षण करणें आमचें काम आहे. हा सबब काढून रशियन सरकारानें तुर्की बरोबर भांडण काढिलें. कान्स्टांटिनोपल शहरीं ग्रीक धर्माचा अधिकारी होता. त्यास कामावर ठेवण्याचें किंवा काढण्याचें सुलतानाचे हातीं होतें. तो अधिकार आपणांस असावा व पवित्र जाग्यावर ग्रीक धर्माचे लोकांचा अधिकार असावा व कान्स्टांटिनोपल येथील धर्माधिकारी पाद्री यास सुलतानानें रशियाचे संमती शिवाय काढूं नये, अशीं मागणी रशियन सरकारानें तुर्की जवळ केली. ही मागणी सन १८५३ चे मेचे १३ वे तारखेस सुलतानानें नाकबूल केली. जुलै महिन्याचे दुसरे तारखेस रशियन सैन्य प्रुथ नदी ओलांडून तुर्कांचे राज्यांत शिरलें. तुर्क सरकारानें मदतीस्तव सर्व युरोपांतील सरकारांजवळ मागणी केली. या वेळेस फ्रान्स देशांत तिसरा नेपोलियन बादशहा होता. यास फ्रेंच लोकांमध्यें वाहवा मिळविण्यासाठीं कोठें तरी लढाई करावयाचीच होती. यामुळें त्यानें तावडतोब सुलतानाचा पक्ष स्विकारिला. सन १८५३ सालीं सर्व गोष्टी अळसमवाली गेल्या. तथापि रशियनांनीं मोलडाविया प्रांत घेऊन तेथील राजास आपला हस्तक करून ठेविला. पुढें वियना येथें कान्फरन्स भरून इंग्लंड, फ्रान्स, आस्त्रिया व प्रशिया यांचे वकिलांनीं विचार करून एक याद काढिली. त्यांत तुर्क सरकारानें आपले ताब्यांतील प्रजेशीं कसें वागावें व रशियन सरकारचें कसें समाधान करावें हें ठरविलें होतें. या यादींतील सर्व अटी तुर्क सरकारानें कबूल केल्या; परंतु लिहिण्याचें रीतींत रशियन सरकाराकडे कांहीं मऊपणा आणिला होता ह्मणून रशियन सरकारानें ती यादी नाकबूल केली. यामुळें लढाईस आरंभ झाला. आरंभीच तुर्कांचे ११ जहाजांचा नाश होऊन ४००० मनुष्यें मेलीं गेलीं. हा अपशकून झालेला पाहून तुर्क सरकारानें इंग्लिश व फ्रेंच यांचे मार्फतीनें तहाचें बोलणें लाविलें. तें रशियन सरकारानें नाकबूल केलें व इंग्रज व फ्रेंच सरकारांचे जबाबास उत्तर दिलें नाहीं.

सन १८५४ चे मार्च महिन्याचे १२ वे तारखेस इंग्लंड, फ्रान्स व

टर्की यांमध्यें तहनामा झाला, आणि २८वे तारखेस त्यांनीं लढाईचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. लढाई सुरू झाल्यावर इतालियन सरकारानें आपलें सैन्य सुलतानाचे मदतीस पाठविलें. अल्मा, सिवास्टपोल, इन्करमान वगैरे ठिकाणीं लढाया होऊन रशियनांचा अगदीं पराभव झाला. पुढें सन १८५६ सालीं मार्च महिन्याचे ३० वे तारखेस पारिस शहरीं तहनामा झाला त्यांतील सध्याचे प्रकरणास लागू असणाऱ्या कलमांचा सारांश:–

" मित्रत्वाचे नात्यानें तुर्क सरकारचे राज्यकारभारांतील गुणदोष काढण्याचा अधिकार इंग्रज सरकारा खेरिज दुसऱ्यास नसावा.

काळ्या समुद्राचे कांठच्या सर्व बंदरीं सर्व देशांतील लोकांस व्यापार करण्यास मोकळीक असावी.

रशियन व तुर्क सरकारचीं लहान व थोडीं मोठीं जहाजें या समुद्रांत असावीत. दुसऱ्या कोणत्याही देशाचीं लढाऊ जहाजें या समुद्रांत नसावीत.

तुर्क राज्याची समग्रता व स्वातंत्र्य संभाळण्याची हमी इंग्रज, फ्रेंच, आस्ट्रियन, जर्मन व इतालियन या सरकारांकडे असावी. या राज्यांतील खिस्ती प्रजेचें रक्षण करण्याची कामगिरी हमीदार सरकारांकडे असावी."

अबदुल मजीद सन १८६१ त मरण पावल्यावर त्याचा भाऊ अबदुल अझीझ गादीवर बसला. याची व यानंतर झालेल्या सुल्तानांची हकीकत पुढें आलीच आहे.

रशियन सरकारानें आपले सैन्याचे तयार सैन्य (स्टयांडिंग आर्मी) अमानत सैन्य (रिझर्व) आणि शिबंदी (मिलिशिया) असे तीन भाग केले आहेत. सर्व लोकांनीं सैन्यांत चाकरी करण्याचा नवीन कायदा सन १८७४ सालीं अमलांत आला. हा कायदा होण्याचेपूर्वी बहुतेक शिपाई सर्फबंदी शेतकरी लोकांपैकीं असत; व जमीनदार लोक बादशाह हुकूम करील तितकीं माणसें शिपाई होण्याकरितां पाठवीत. या कारणांमुळें योग्य माणसांची निवड होत नसे. न कथतां मोठी मजल करण्याचें आंगांत सामर्थ्य असलें, आपल्या वरिष्ट अधिकाऱ्याचा हुकूम विश्वासूपणानें मानिला, आणि धैर्य धरून शत्रूपुढें उभा राहिला ह्मणजे

तो मनुष्य शिपाईगिरीची चाकरी करण्यालायक होतो असें रशियन सरकार मानीत असे. यामुळें सैन्यांत अळशी, दारूबाज, गुन्हेगार व उनाड लोकांची भरती होत असे. सन १८७०।७१ सालीं फ्रेंच आणि जर्मन लोकांची लढाई झाली; त्यांत जर्मन शिपायांचे शहाणपणानें फ्रेंच लोक जिंकले गेले; हें पाहून रशियन सरकारास आपलें सैन्य त्या धरतीवर तयार करण्याची इच्छा होऊन त्यांनीं हा नवा कायदा अमलांत आणिला. २१ वर्षांचे वयापासून ३० वर्षांचे वयाचे मनुष्यांस जुन्या कायद्याप्रमाणें चाकरींत घेत असत. शिपायांस पुष्कळ दिवस चाकरी करावी लागे. रशियन सरकार सैन्यास एका ठिकाणीं ठेवीत नसल्यामुळें युरोपांतील सैन्य एशियांत नेलें किंवा एशियांतील युरोपांत आणलें तर त्या शिपायाचे आप्तवर्गास आपला मनुष्य काळेपाण्यावर गेला असें वाटे. यामुळें चांगले लोक चाकरीस राहत नसत. सन १८७४ सालचे नव्या कायद्यानें सातलक्ष साठ हजार सैन्य तयार ठेवण्याचा ठराव झाला आहे. शिपायांस युरोपखंडांतला असल्यास ६ वर्षें आणि एशियाखंडांतील असल्यास ७ वर्षें चाकरी करावी लागते. दरसाल सात लक्ष मनुष्यें चाकरीचे वयांत येतात असा अजमास आहे. यांतील चवथा किंवा पांचवा हिस्सा माणसें तयार सैन्यांत घेऊन बाकींचास शिबंदी सैन्यांत घालितात. एकंदर २० वर्षें चाकरी करावी लागते. तयार सैन्यांत चाकरी केल्यावर त्या शिपायास अमानत सैन्यांत घालितात. तेथें त्या शिपायास अर्धवट रीतीची ९ वर्षें चाकरी करावी लागते. या सैन्यांत असतांना शिपायांस पाहिजे तो धंदा करण्याची मोकळीक असते; परंतु विशेष प्रसंगी हुकूम झाला असतां तयार सैन्यांत चाकरी करावी लागते. तुर्क लोकांबरोबर लढाई करण्याचा प्रसंग आला तेवेळेस नवा कायदा अमलांत येऊन पुरतीं तीन वर्षें देखील झालीं नव्हतीं, यामुळें अमानत सैन्य मुळींच तयार झालें नव्हतें. तयार सैन्यांत जुने शिपाई फार होते.

सर्वांनीं सैन्यांत चाकरी करण्याचे कायद्यांतही कांहीं लोकांस नौकरी न करण्याची मोकळीक मिळते; ते लोकः—पाद्री, वैद्य, पंतोजी व व्यापाऱ्याचे वतीनें जहाजांवर काम करणारा इतक्या लोकांस

अगदीं किंवा कांहीं दिवस सैन्यांत नौकरी न करण्याची परवानगी मिळते. ५५ वर्षांचे आई बापांचा एकुलता एक मुलगा असल्यास त्यास चाकरी न करण्याची परवानगी मिळते. ज्या कोणास लिहितां वाचतां येत असेल त्यास दोन वर्षे चाकरीची मुदत कमी करितात.

रशियन शिपाई दृढ निश्चयी, मेहनती, शूर व अशांकित आहेत; परंतु त्यांचे अंगीं थोडा रानटीपणा असून ते मोठे दारूबाज आहेत. त्यांस पगार फार थोडा ह्मणजे दररोज अर्धाआणा मिळतो. या शिवाय भाकरी, थोडें मांस व थोडा भात असा खुराक मिळतो. शिपायांचे संख्येस अनुलक्षून सरदारांची संख्या नाहीं. हा मोठा उणेपणा त्यांच्या सैन्यांत आहे. कोणी लिहिण्या वाचण्याची परीक्षा दिल्यास त्यास थोडे दिवस कवाईत शिकवून लागलीच गैरसनदी अमलदाराची जागा देतात. सरदार लोकांस पगारही कमीच असतो. जनरलचा पगार सालीना ३०० पौंड असतो. रशियन लोकांत विद्या कमी असल्यामुळें अडाणी लोकांस मोठमोठ्या जागा द्याव्या लागतात. पगार कमी असल्यामुळें लबाड्या फार होतात.

यांचे सैन्यांत कोसाक नांवाचें निराळेंच सैन्य आहे. हे लोक स्वभावतः शूर असून लुटारू आहेत. यांचे एकंदर १,२९,००० सैन्य आहे. हे सर्व स्वार आहेत. यांतील निमें सैन्य तयार सैन्या बरोबर असतें आणि निमें अमानत सैन्याबरोबर असतें. घोडा, हत्यार वगैरे सामान यांचे पदरचें असतें. आपला देश सोडून लढाईस गेले म्हणजे या शिपायांस खुराक व पगार मिळूं लागतो. हे लोक जेथें राहतात तेथील जमिनीचा सारा बादशहास देत नाहींत. या सैन्याबरोबर जो तोफखाना व सामानाच्या गाड्या असतात त्या मात्र सरकारी असतात. यांवर जे सरदार असतात ते यांनींच निवडलेले असतात. मोटे सरदार मात्र सरकारानें नेमिलेले असतात.

रशियन सरकारानें युरोपखंडांतील आपल्या सैन्याच्या १६ आर्मीकोर केल्या आहेत. १ गार्डकोर, १ ग्रनाडियर कोर आणि १४ लाईनकोर अशीं नांवें आहेत. सैन्याचे भाग:—

| | |
|---|---|
| १२० शिपाई=१ कंपनी. | प्रत्येक बटालियन मधील ५ वे |
| ५ कंपनी=१ बटालियन. | कंपनीला रायफल कंपनी ह्मणतात. |
| ३ बटालियन=१ रेजिमेंट (पलटन.) | याशिवाय प्रत्येक आर्मीकोर मध्यें १ इंजनेरची बटालीयन १ पांटूनियर बटालियन असते. |
| ३ रेजिमेंट=१ ब्रिगेड. | |
| २ ब्रिगेड=१ डिविजन. | १ बटालियन=५ कंपनीं |
| ३ डिविजन=१ आर्मीकोर. | १ कंपनी=१०० लोक. |

स्वारांमध्यें ड्रूगून, ह्युलन, हुजार, आणि कोसाक इतके प्रकार आहेत. ड्रूगुन आणि हुजार यास लाइट कावलरी आणि बाकीचांस हेवी कावलरी असें ह्मणतात. अशीं नांवें ठेवण्याचें कारण लाइट कावलरीचे लोकांस घोड्यावरून उतरून पायदळांप्रमाणें लढतां येते, तसें हेवी कावलरीचे लोकांस करितां येत नाहीं. रशियन सैन्यांत एकंदर सोळा डिविजन स्वार आहेत. या शिवाय कोसाकचे २० रिसाले आहेत.

१ डिविजन स्वार=१ ड्रूगूनचा रिसाला १ रिसाला=५ स्काड्रन.
१ हुजारचा ,, १ स्काड्रन=२०० स्वार.
१ ह्युलनचा ,,
१ कोसाकचा ,,

प्रत्येक कोर पायदळा बरोबर १ डिविजन स्वार असतात.

यांच्या सर्व तोफा क्रूप कारागिरानें केलेल्या आहेत. सीज अर्टिलरी, (वेढा घालण्याच्या तोफा) फील्ड अर्टिलरी (पायदळाबरोबरच्या तोफा) आणि हार्स आर्टिलरी (घोड दौडीच्या तोफा) असें तोफेमध्यें प्रकार आहेत. फील्ड अर्टिलरी तोफा पायदळांबरोबर आणि हार्स अर्टिलरी तोफा स्वारांबरोबर असतात. सीज अर्टिलरीचे तोफांचा किल्ले संभाळण्यांत व वेढा घालण्यांत उपयोग करितात. तोफामध्यें बातरी आणि ब्रिगेड असे दोन भाग आहेत. दोन चार बातरी एकत्र केल्यास त्यास ब्रिगेड म्हणतात. बातरी या शब्दाचे तीन अर्थ आहेत. १ बातरी म्हणजे ६ तोफा, त्यांबरोबर असणाऱ्या दारू गोळ्यांच्या गाड्या, त्यावरचीं माणसें, घोडे वगैरे सर्व. २ लढाईचे

वेळेस ओळीनें तोफा मोर्च्यावर लाविल्या म्हणजे, मग त्या कितीहि असोत त्यांस बातरी ह्मणतात. ३ तोफ नीट मारतां यावी ह्मणून जो मोर्चा करतात त्यास बातरी ह्मणतात.

रशियन सैन्यांतील सर्व तोफा ब्रिच लोडिंग आहेत. प्रत्येक तोफेला ६ घोडे असतात. पायदळाबरोबरचे बातरींत ८ तोफा असतात. यांतील ४ तोफा ४ पौंडरच्या व ४ तोफा ९ पौंडरच्या असतात. स्वारांबरोबरच्या तोफा ४ पौंडरच्या असून प्रत्येक बातरींत ६ असतात. प्रत्येक पायदळ डिविजन बरोबर ६ बातरी तोफा आणि प्रत्येक स्वाराचे डिविजन बरोबर २ बातरी तोफा असतात. ४ पौंडर तोफे बरोबर १८ कार्तुसें असून शिवाय दारू गोळयाच्या २ गाड्या असतात. ९पौंडर तोफेबरोबर १२ कार्तुसें असून ६दारूगोळया-च्या गड्या असतात.

४ पौंडर ९ पौंडर हीं जीं तोफेचीं नांवें आहेत यांत कांहीं अर्थ नाहीं. पूर्वीं जितक्या वजनाचा गोळा तोफेंतून जात असे तितक्या पौंडरची तोफ असें ह्मणत असत. हल्लीं तीं नांवें मात्र राहिलीं आहेत. दुप्पट वजनाचा गोळा त्या तोफेंतून जातो ह्मणजे ४ पौंडर तोफेंतून ८ पौंड वजनाचा देखील गोळा जातो.

लढाई खास होणार असें रशियन सरकारास वाटल्यावर एशिया आणि युरोप या दोन्ही खंडांत लढाई चालवावी असा बेत करून दोन सैन्यें तयार केलीं. एका सैन्यास दक्षिणेकडचें सैन्य आणि दुसऱ्यास काकेशसचें सैन्य अशीं नांवें दिलीं. दुसऱ्या सैन्यावर ग्रयांड ड्यूक मायकेल यांस सेनापती नेमिलें. दक्षिणेकडील सैन्यांत. ४ थी, ८ वी, ९ वी, ११ वी, १२ वी, १३ वी आणि १४ वी कोर सैन्य होतें. या शिवाय ७ वी व १० वी कोर ओडेसा येथें तयार करून ठेवल्या होत्या.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ कोर= | ३ डिविजन पायदळ= | ३२४०० शिपाई | ×७ कोर= | २२६८०० |
| १ ,, | स्वार= | ४००० स्वार | ×७ ,, = | २८००० |
| २० | बातरी तोफा= | १२० तोफा | ×७ ,, = | ८४० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ बटालियन इंजनि.= | ५०० लोक | ×७ ,, = | ३५०० |
| १ ,, पान्टूनियर= | ५०० ,, | ×७ ,, = | ३५०० |
| | | शिपाई | २५१८०० |
| | | तोफा | ८४० |

या शिवाय या सैन्या बरोबर डान कोसाक स्वारांचे १० रिसाले होते ओडेसा जवळील सैन्य दोन कोर मिळून ६४८०० पायदळ, ८००० स्वार २४० तोफा आणि २००० इंजनेर व पान्टूनियर होते.

काकेशसचे सैन्यांत ३ आर्मी कोर सैन्य होते. त्यांची संख्या.

९७२०० पायदळ — या शिवाय कोसाकचे
१२००० स्वार — १० रिसाले होते
३६० तोफा
३००० इंजनेर व पान्टूनियर

तुर्कीमध्यें यूरोप खंडांतील राजांप्रमाणें सैन्य तयार करण्याची चाल दुसऱ्या महमद सुलतानानें पाडिली. चालू शतकाचे आरंभीं तिसऱ्या सेलीम सुलतानानें त्यांत पुष्कळ सुधारणा केली. तुर्क लोक स्वभावतःच शिपाई आहेत. आपले सुलतानाचें राज्य वाढवावें आणि आपल्या धर्माचा फैलाव करावा हें आपलें काम आहे असें प्रत्येक मनुष्य समजतो. पुष्कळ दिवसपर्यंत तुर्कींचे सैन्यांत फक्त मुसलमानच असत. १८५६ सालीं ख्रिस्ती लोकांनाही चाकरी करण्याची परवानगी दिली; परंतु त्याप्रमाणें अमल झाला नाहीं. चाकरी ऐवजीं माणसीं कर घेण्याची वहिवाट पडली. यांचे सैन्यांत नायझाम (तयार सैन्य ) इखतियांत ( पहिले नंबरचें अमानत सैन्य, ) रेडीफ ( दुसरे नंबरचें अमानत सैन्य, ) मुस्ताफीज ( शिबंदी ) आणि आवझलरीज ( पगार न घेतां लढणारे लोक, आश्रयाखालचे संस्थानिकांकडून मदतीस आलेलें सैन्य, खुशीनें लढाईस आलेले लोक व बाशीबुझूक )असे पांच प्रकार आहेत. एकंदर २० वर्षं शिपायांस लष्करांत चाकरी करावी लागते. ४ वर्षं नायझाम, २वर्षं इखतियात, ६ वर्षं रेडीफ आणि ८ वर्षं मुस्ताफीजमध्यें चाकरी करावी लागते. नायझाम सैन्याच्या ७ कोर केल्या आहेत. एकंदर ७ लाख फौज कागदावर असते

परंतु यापैकीं निझामी फौज एक लाख शांततेच्या वेळीं व एक लक्ष सत्तर हजार लढाईच्या वेळीं एवढीच कायती तयार असते. एकंदर तुर्की-च्या मुलखांतील सर्व प्रजा पावणे दोन कोटी आहे व त्यापैकीं दीड कोटी मुसलमान आहेत. शहरचे लोक खेरीज करून प्रांतांतील लोकांवर चाकरीचा बोजा पडतो. सैन्याचे रशियन लोकांप्रमाणेच भाग केले आहेत.

१०० शिपाई=१ कंपनी
८ कंपनी=१ बटालियन
४ बटालियन=१ रेजिमेंट
२ रेजिमेंट=१ब्रिगेड
२ ब्रिगेड=१ डिविजन
२ डिविजन=१ कोर=२५६०० लोक×७ कोर=१७९२०० शिपाई

यांतील पहिली कोर कान्टांटिनोपल येथें. दुसरी शुम्ला, तिसरी मोनास्टिर, चवथी एर्झरूम पाचवी डमास्कस, सहावा बगदाद आणि सातवी येमन येथें असते. आवशलरीज सोडून बाकीचें सैन्य एकत्र केलें असतां सात लक्ष भरतें. पैशाचे अडचणीमुळें पहिले नंबरचे आमानत सैन्य कमी केले होतें; आणि शिबंदी सैन्यास कवाईत वगैरे कांहीं शिकविली नव्हती. बाशीबुझूक नावाचें जें सैन्य आहे तें कांहीं शिपाई नव्हत, लुटारू बाजारबुणगे आहेत. २१ पासून २४ वर्षांचे वयाचे लोकांस सैन्यांत चाकरीस ठेवितात. नायझाम सैन्यांत चाकरी न करतां अमानत सैन्यांत नांव दाखल करण्याची परवानगी मिळतें. यामुळें अमानत सैन्यांत कवाईत शिकलेले व न शिकलेले असे दोन प्रकारचे लोक असतात. म्हातारे आई बापाचा एकुलता एक मुलगा असल्यास त्यास किंवा दुर्बळ मनुष्यास, किंवा शास्त्रार्थ सांगणारास किंवा आलेम असल्यास, किंवा न्यायाधिशास किंवा मौलवी असल्यास चाकरी न करण्याची परवानगी मिळतें. आपल्या ऐपती सारखे ३६ पासून ४५ पौंडा पर्यंत पैसा सरकारांत भरल्यास चाकरी न करण्याची मोकळीक मिळतें. दरसाल

३७५०० नवीन शिपायांची भरती व्हावी असा लोक संखेवरून अदमास काढिला आहे, परंतु २५००० पेक्षां अधिक नवीन शिपाई मिळत नाहींत.

तुर्क सरकारास पैशाची नेहमीची अडचण आहे यामुळें शिपायांस लवकर पगार मिळत नाहीं, तथापि तुर्क शिपाई कधीं बंड करण्यास प्रवर्त होत नाहींत. ते आपले हत्यारांचा फार चांगला उपयोग करितात. ते मोठे थंडे व विचारी आहेत. तुर्क सरकारानें पायदळाची कांहीं थोडीफार व्यवस्था केली आहे तशी स्वारां विषयीं व्यवस्था केली नाहीं. यांचे सैन्यांत स्वारांची संख्या फारच थोडी आहे; रेजिमेंट आणि बातरी असे तोफखान्याचे दोन भाग आहेत. ४ बातरी म्हणजे १ रेजिमेंट. या ४ बातरींत १ हार्स बातरी आणि ३ फील्ड बातरी असतात. प्रत्येक तोफेला ६ घोडे असतात. प्रत्येक बातरी बरोबर १ दारू गोळ्याची गाडी असते. बाकीचा दारूगोळा गावठी गाड्यावर, घोड्यावर व खेचरावर घालून नेतात. प्रत्येक बातरींत अमलदार व शिपाई १६४ असतात. लढाईचे वेळेस प्रत्येक शिपाया जवळ १९० कार्तुसें देतात. त्यांच्या पायांत वाहना असतात. त्यांजवळ हेन्री मार्टिनी म्हणून जी बंदूक आहे तिची गोळी सरासरी २१०० यार्ड लांब जाते या बंदुकी त्यांनीं अमेरिकेंतून आणविल्या आहेत. सर्वच शिपायां जवळ हेन्री मार्टिनी बंदुकी नाहींत. रेमिंगटन रायफल व स्नायडर ह्याही बंदुकी आहेत. तोफखान्यांत सर्व जातीच्या व सर्व प्रकारच्या तोफा आहेस. तुर्क सरकार इतकें गरीब आहे तथापि त्या जवळ ६००००० हेन्री मार्टिनी व तितक्याच स्नायडर बंदुकी शिलक होत्या.

लढाईचे वेळेस सैन्याची फारच गरज लागल्यास शिबंदी सैन्य भरतीस घेतात. हें सैन्य एकंदर ३५००० होतें व यावर लढाईचे आरंभी बेकरपाशा मुख्य होता. त्या सैन्यांत कंपनी, बटालियन व रेजिमेंट असे भाग आहेत. प्रत्येक बटालियन मध्यें एक घोडेस्वारांची कंपनी असतें.

जेव्हां लढाई होते तेव्हां मुसलमान लोक आपले धर्माची बाब मध्ये घालितात. तेणें करून शिपायांस अधिक उत्तेजन येतें. ही लढाई सुरू होण्याचे पूर्वी कान्स्टान्टिनोपल येथील वर्तमान पत्रांत सैन्यांस उत्तेजन यावें ह्मणून कांहीं मजकूर प्रसिद्ध झाला होता, त्यावरून हा धर्मसंबंधाचा आवेश कसा असतो याची कल्पना होईल.

बांधवानो:—आपण शूर आहोत व आपण शूरांचीं मुलें आहोत. परमेश्वरानें आपणांस असेंच निर्माण केलें आहे व असेंच आपण निरंतर राहूं. कंबरेस तरवार बांधून व खांद्यावर बंदूक घेऊन, पादशहाचें लढाईस बोलावणें आलें कीं, धांवत चला. मग त्या लढाईंत एक मनुष्य मरो किंवा हजारों मरोत. भित्र्यांचा बदलौकीक होतो, व त्यास नरकवास भोगावा लागतो. शूर आपली तरवार शत्रूचे रक्तांत पाजाळितो. ज्यास अल्लाची भक्ती करणे असेल त्यानें तरवार हातांत घेऊन नेहमी लढाईस तयार असावें. लढाईस निघा असा इशारा झाल्याबरोबर आपला देश व आपला धर्म या शिवाय दुसरे कशाचेंच भान राहूं देऊं नका. ७ पासून ७० वर्षांपर्यंतचे लोकांनीं सरहद्दीवर धांवत जाऊन जंगली जनावरांप्रमाणें शत्रूशीं लढावें. एक इंच जमीन शत्रूचे स्वाधीन करण्याचे अगोदर ती जमीन आपले प्रेतांनीं व रक्तांनीं भरून जाऊं द्या. आपले पूर्वजांचें रक्तानें भिजली नाहीं अशी एक इंच जमीन देखील आपल्या देशांत सांपडणार नाहीं. आपले पूर्वजांचे वतनांस अपाय करणाऱ्या शत्रूचा नाश करा यांत लौकिक आहे व यांतच परमेश्वर राजी आहे. आपण लहानपणीं पाळण्यांत निजतों तेव्हां आपली आई पाळण्याजवळ येते आणि परमेश्वराची प्रार्थना करते कीं हे परमेश्वरा, आह्माजवळ आमचे देशाची व आमचे धर्माची चाकरी करण्याकरितां या मुलांशिवाय आम्हांजवळ दुसरें कांहीं नाहीं. यांनीं वाचावें, आणि आपले देशाचें व लोकांचे संरक्षण करण्यांत प्राण द्यावेत अशी बुद्धी त्यांस दें व अशाचकरितां त्यांस अयुष्य दे. अशा रीतीनें प्रार्थना केल्यावर आह्मी निजावें म्हणून ती गाणें म्हणते तें:—लेकरा, तूं शूर व्हावेस म्हणून मी तुझ्या गर्भाचा भार वाहिला. तूं वाढ,

मोठाहो. मजबूतहो आणि आपले देशाचें व धर्माचें रक्षण करण्यासाठीं तर-वार हातांत घे. तुझ्या अगोदर तुझा बाप देशाचें रक्षण करण्यांतच मरण पावला. तो रक्तानें भरलेलीं वस्त्रें आंगावर घेऊन थडग्यांत तुझी वाट पाहात आहे. तर त्याचा सूड उगविल्याशिवाय राहूं नको. ज्या बायका अशीं गाणीं गातात त्यांची आपण लेंकरें आहों हें विसरूं नका.

तुर्क सरकाराजवळ १२९ लढाऊ जहाजें आहेत. त्यावर २८४६२ खलाशी व ३६०० दर्यावर्दी आहेत. आडमिरल होबर्ट-पाशा ह्या आरमारावर मुख्य आहे.

रशियन सरकाराजवळ २४ लढाऊ जहाजें होतीं त्यांत पीटरदी ग्रेट, नोवगोरद आणि पोपाफ हीं फारच मोठीं आहेत. यांनीं शत्रूची जहाजें फोडण्यास्तव टारपेडो ह्मणून एक नवीन व चमत्कारिक यंत्र काढिलें होतें.

रशियन लोकांनीं दक्षिणेकडील सैन्याचे तीन भाग केले. पहिले भागांत दोन कोर सैन्य घालून त्यावर जनरल झेमरमन यांस मुख्य नेमिलें. या सैन्यानें बीलावकस्तनजी घेऊन बसारेबिया प्रांतांतून समुद्र कांठानें जाऊन वार्ना बंदरास वेढा घालावा, आणि चतुर्दुर्गा मधील म्हणजे रश्चक, सिलिस्त्रिया वार्ना व शुम्ला यांमधील शत्रू सैन्याचे मागले बाजूवर हल्ला करून त्यांच्यानें पुढले बाजूवरचे सैन्यास फार उपद्रव न देववेल असें करावें. दुसऱ्या भागांत ४ कोर सैन्य घालून त्यावर झारउईच यास मुख्य नेमिलें होतें. या सैन्यानें रश्चकला वेढा घालून चतुर्दुर्गांमधील सैन्यास अडवून धरून शिपका घाटांतून आद्रियानोपल शहरावर जावें. तिसऱ्या भागांत १ कोर होती. त्या सैन्यानें निकोपोलिस घेऊन विडनजवळचे सैन्यास आडवावें. असा रशियन लोकांनीं बेत केला. याचप्रमाणें काकेशस सैन्याचे तीन भाग करून एका भागानें बाटूम बंदराकडे, दुसऱ्या भागानें अर्देहान घेऊन कार्स करून एर्झरूमकडे आणि तिसऱ्या भागानें बियाझिदवर जाऊन मग दुसऱ्या भागास मिळावें असा बेत होता. पहिले भागावर जनरल अक्लोवजा व दुसऱ्यावर मेलीकोफ मुख्य अधिकारी होते.

तुर्क शिपाई चढाव करण्यापेक्षां बचाव उत्तम करितात हें समजून तुर्क

सरकाराने आपले राज्याचा बचाव करण्याचा सैन्यास हुकूम दिला होता. एशिया मायनरमध्यें अर्दहान कार्स, एर्झरूम वगैरे जे किल्ले रशियन लोकांचे रस्त्यावर आहेत त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं मोठमोठ्या तोफा कान्स्टांटिनोपल शहराहून पाठविण्याचा त्यांनीं हुकूम दिला होता; परंतु कामदार लोक इतके अळशी व सुस्त होते कीं, लढाई सुरू झाली तथापि त्या तोफा जाऊन नेमलेले जागीं पोहोंचल्या नाहींत.

एशियामायनर मध्यें तुर्क लोकांचे ४ कोर सैन्य होते पैकीं दोन कोर टर्कीमध्यें नेऊन बाकी राहिलेले दोन कोर मध्यें पुष्कळ अमानत सैन्य मिळविलें आणि तें जागोजाग ठेविलें तें येणेंप्रमाणें:—

| नांव | पायदळ बटालियन | तोफा | वेढ्याच्या तो० |
|---|---|---|---|
| बाटूम …. …. | ३० …. | ,, …. | ,, |
| अर्दहान …. …. | १२ …. | १८ …. | ८६ |
| कार्स …. …. | ३८ …. | ४८ …. | २१७ |
| बायझिद …. …. | ३ …. | १२ …. | ० |
| वांन …. …. | ६ …. | १२ …. | ० |
| एर्झरूम …. …. | १३ …. | ३६ …. | १५० |
| अल्टी …. …. | ६ …. | ६ … | ० |
| अर्झरूम आणि कार्स यांचे दर्म्यान | ४ …. | ६ | ० |
| डेलीबाबा …. | १२ …. | १८ | ० |
| | १२४ | १५६ | ४५३ |

एकंदर ९९२०० शिपाई १५६ तोफा व स्वारांचे ३ रिसाले मिळून ३००० स्वार होते. यावर अहमद मुख्त्यार पाशा मुख्य होता.

तुर्कीमध्यें एकंदर ५ कोर मिळून १२८००० सैन्य होतें. त्यांत शिबंदीचे ३५००० सैन्य मिळविलें. आणि अमानत वगैरे सैन्य जमा करण्याचा कारखाना जागोजाग चाललाच होता. वर सांगितलेले सैन्य जागोजाग वाटून ठेविलें होतें तें येणेंप्रमाणे:—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| विडन | .... | .... | .... | ५०००० |
| रश्चक | ... | .... | ... | १०००० |
| सिलिस्त्रिया | | .... | .... | १५००० |
| डाब्रूशा प्रांत | | ... | .... | १७००० |
| शुम्ला | ... | ... | .... | १८००० |
| वार्ना | .... | ... | .... | १३००० |
| सोफाया | ... | .... | .... | ३०००० |
| कान्स्टांटिनोपल | .... | | .... | ५००० |
| | | | | १५८००० |

रशियाचे सैन्यास पहिला अडथळा डान्यूब नदीचा आहे. तुर्कीचे बाजूला या नदीवर विडन राहोवा, निकोपोलिस, सिस्टोवा; रश्चक, टर्टूकोई, सिलिस्त्रिया, हिरसोवा, माचिन, इसक्चा आणि तुलचा इतकीं मजबूद व तटबंदी गांवें आहेत.

डान्यूबनदी ओलांडल्यावर पुढें बालकन पर्वताचा अडथळा आहे. या पर्वतावरून दक्षिणेकडे जाण्यास सहा रस्ते आहेत ते:—

१ टिरनोवापासून ग्याब्रोवावरून किझनलिंक गांवाला जाण्यचा,
२ टिरनोवापासून स्लिवनोस जाण्याचा,
३ टिरनोवापासून उस्मानबझारा वरून कासन गांवाला जाण्याचा,
४ शुम्लापासून कार्नाबादेला जाण्याचा,
५ कोस्लूशापासून प्रवाडी व कार्प्रीकोईकडून जाण्याचा,
६ वार्नापासून बुर्गासला जाण्याचा,

एशियामायनर देशांत रशियन सैन्याला अडथळा करण्याला ट्रेबीझांड आणि बाटूम हीं दोन बंदरें व एर्झरूम आणि कार्स हीं दोन तटबंदी शहरें आहेत.

लढाईचा जाहिरनामा लागण्याचे अगोदरच रशियन बादशहानें आपले सैन्यास तुर्कीवर चाल करून जाण्याचा हुकूम दिला. तुर्कीचें सुलतानास जाहिरनाम्याची बातमी लागण्याचे अगोदरच रशियन सैन्य आपले देशांत शिरल्याची बातमी लागली. एप्रिलचे २४ वे तारखेस

मुख्य वजीरानें रुमानियाचा राजा प्रिन्स चार्लस यास रशियन सैन्य तिकडून आपले मुलखांत नाशिरेल असा सरहद्दीचा बंदोबस्त ठेवावा आणि गरज लागल्यास सैन्याची कुमक द्यावी असा तारेंतून निरोप पाठविला. याचें अगोदर ह्मणजे १६ एप्रिल रोजीं रुमानियाचा राजा व रशियाचा बादशहा यांमध्यें तह झाला तो येणेंप्रमाणें:—

रुमानियांतील अगगाडीचे रस्ते,पायरस्ते,नद्या,टपाल व तारायंत्रें यांचा रशियन सरकारांनीं वाटेल तसा उपयोग करावा. लढाईचें सामान, दारू गोळा वगैरे नेण्याचे कामांत रुमानियन सरकारानें मदत करावी. रशियन सरकारास वाटेल तेथें त्यांनीं त्या देशांत अगगाडीचे रस्ते बांधावेत.

या तहनाम्यानें रुमानियन लोक रशियन सरकारचे ताबेदार झाले. डान्यूब नदीचें पलीकडचे कांठीं कालाफाट ह्मणून शहर आहे. तें घेण्यास तुर्क सैन्य गेलें असतां त्यांवर रुमानियन लोकांनीं गोळा चालविला. रुमानियन लोक रशियनास मिळाले असें कान्स्टांटिनोपल शहरीं समजतां-च त्याचे वकिलास तुर्क सरकारानें आपले देशास निघून जाण्यास सांगितलें. आणि युरोप खंडांतील राष्ट्रांस कळविण्यासाठीं एक सरकुलर काढिलें कीं, शत्रूस आपले देशांत न येऊं देण्याविषयीं सुलतान रुमानियाचे राजास सांगत असतां सुलतानास न कळवितां व कांहीं कारण नसतां रुमानियन सरकारानें रशियन सरकाराबरोबर तह करून ते सर्व प्रकारें शत्रूस अनकूळ झाले आहेत. अशा प्रकारें या लोकांनीं सुलतानास फसवून आयते वेळीं दगा दिला. यासाठीं त्यांनीं केलेला हुकूम आतां कोणी मानूनये. याच प्रमाणें मे महिन्याचे २२ वे तारखेस रुमा-नियाचे राजानें आपण तुर्कांचे अधिकारापासून मुक्त होऊन स्वतंत्र झालों असा अपल्या देशांत जाहीरनामा प्रसिद्ध केला ; व त्याच दि-वशीं तुर्कांबरोबर लढाई करण्याचा ही ठराव केला.

रुमानिया देशांतून कांहीं अगगाडीनें व कांहीं पाय रस्त्यानें रशि-यन सैन्य डान्युब नदीवर येऊं लागलें. सेरेथ नदीवरचा बारबोश येथील पूल तुर्क लोकांनीं मोडिला असतां तर रशियन सैन्यास ती नदी उतरण्यास बरीच अडचण पडली असती. सरेथ नदी ज्या ठिकाणीं डान्यूब नदीला मिळाली आहे तेथें तुर्क सरकारचीं लढाऊ जहाजें

होती. पण त्यांनीं पूल कां मोडिला नाहीं याचें कारण कोणासच ठाऊक नाहीं. २९ वे तारखेस रशियन सैन्य इब्रेला येथें येऊन दाखल झालें. येथें ग्रयांड डयुक निकोलास रशियन सैन्यावरचे मुख्य सेनापती यांनीं आपले सैन्यांत हुकूम फिरविला तो:—आपण देश जिंकावा ह्मणून स्वारी करीत नाहीं; परंतु आपले गांजलेले भावांस सोडविण्यासाठीं आपण ख्रिस्ताचे नांवानें जात आहोंत. तर त्याचे नांवास बट्टा न लागेल अशा रीतीनें वागून यश संपादन करा ह्मणजे तुम्ही आपलें कर्तव्य केलें असे होईल.

रशियन सैन्य डान्यूब नदीवर येऊन पोहोंचलें परंतु त्या नदीस फार पाणी आलें होतें यामुळें ते पलीकडचे कांठींच अडकून राहिले. तेथें बसल्या बसल्या डान्युब नदीमध्यें त्यांनीं टारपेडो ह्मणून जहाजें फोडण्याचीं यंत्रे आहेत तीं घालून ठेवलीं. तुर्की-चे अरमारावरचा मुख्य अधिकारी होबर्टपाशा रक्षक ये-थें होता. रशियन लोक डान्यूब नदीवर आले हें ऐकून तो काळे समुद्रांत जाण्यास निघाला. आगगाडींतून कान्स्टांटिनोपल शहरास जा असें त्यास पुष्कळ लोकांनीं सांगितलें परंतु त्यानें तें ऐकिलें नाहीं. रशियन लोकांनीं नदींत टारपेडो घातलीं आहेत व मोर्चेही लाविले आहेत त्याची बातमी त्यास अगोदर लागली होती. तथापि न भीतां त्यानें आपलें जहाज काळे समुद्राकडे चालविलें. हें जहाज आल्याची बातमी रशियन सैन्यांत कळली. व ते तयारी करीत होते इतक्यांत होबर्ट पाशानें संध्याकाळची वेळ गांठून नदीचेकडेनेच आपलें जहाज शत्रूच्या छावणी पुढून नेले आणि आपण गेल्याची बातमी शत्रूस कळविण्यासाठीं त्याचे छावणींवर तोफेचे गोळे मारिले.

रशियाचा बादशहा मास्को शहरीं परत गेल्यावर त्यानें तेथें भाषण केलें तें:—सहा महिन्यापूर्वीं मी तुम्हांस सांगितलें होतें कीं लढाई न करतां तुर्कीचें प्रकरण मिटविण्याची खटपट करतों. आपले रयतेचा उगीच रक्तपात न व्हावा ह्मणून मी पुष्कळ खटपट केली. परंतु कांहीं सार्थक झालें नाहीं. आतां खास लढाई होणार हें तुह्मांस कळलेंच असेल. माझ्या ह्मणण्यास रुकार देऊन तुह्मी लढा-

ईस तयार झाला याबद्दल मी तुमचा आभारी आहे. तुम्ही आपले देशाचा अभिमान राखिला हें फार उत्तम केलें. तुम्ही नुसता देशाभिमान धरला एवढेंच नाहीं परंतु आपले भावांसाठीं प्राण देण्यास देखील तयार झाला आहा हे पाहून मला मोठा आनंद झाला आहे. तुह्मी लढाईस नव्हे आपले देशाचे, आपले धर्माचे व आपले बादशहाचे अब्रूचे रक्षण करण्यास निघाला आहात. यांत तुह्मांस ईश्वर यश देवो.

होईल तितका रशियन सैन्यास अडथळा करावा असा तुर्क सरकारचा निश्चय झाला होता. त्यास पुष्कळ ख्रिस्ती प्रजाही अनुकूल होती, त्यांचें ह्मणणें होतें कीं, रशियन सरकारानें ख्रिस्ती लोकांचा संभाळ करण्यासाठीं लढाई करण्याचें ठरविलें आहे हें केवळ निमित्त आहे. आम्ही त्याच्या आश्रयाखालीं राहण्यास खुषी नाहीं. आह्मी आपल्या सुलतानासाठीं लढून प्राण देऊं. या बोलण्याप्रमाणें पुष्कळ ख्रिस्ती लोक सैन्यांत सामील झाले होते.

रशियन सरकारास युरोपखंडांतील सर्व राष्ट्रें अनुकूल असल्यासारखीं होतीं. तुर्क सरकारास मात्र कोणाचीच मदत नव्हती. काबूलचे अमीर जातीचे मुसलमान असून त्यांनीं ही मदत केली नाहीं. तसेंच टर्युनिस येथील अधिकाऱ्यानें सांगितलें कीं सध्या पैशाची अडचण असल्यामुळें सैन्य पाठवितां येत नाहीं. याचप्रमाणें इराण देशाचा शहा मदत करील असें वाटलें होतें, परंतु तो रशियन सरकारचा आश्रित राजा असल्यासारखा आहे. याशिवाय तुर्क व इराणी लोक निराळ्या पंथाचे आहेत. तुर्क लोक सूनी पंथाचे व इराणी लोक शिया पंथाचे आहेत. या दोन पंथांचे लोकांचें मोठें वैमनस्य आहे. यामुळें एकमेकांस मदत होण्याची मुळींच आशा नाहीं; उलटें नुकसान होण्याचें मोठें भय होतें.

मे महिन्याचे १५ वे तारखेपर्यंत बहुतकरून सगळें रशियन सैन्य डान्यूब नदीचे कांठावर जमा झालें. या नदीमध्यें तुर्क लोकांचीं जीं कांहीं लढाऊ जहाजें होतीं तीं कांहीं तोफा मारून व कांहीं तारपेडो लावून फोडिलीं. यांतील एक जहाज फोडल्याची हकीकत मोठीच चमत्कारिक आहे ती येणेंप्रमाणें:—पेस्त येथें तयार केलेलें

हें नवीनच जहाज होतें. त्यांत लढाईचें सामान भरण्यासाठीं तुर्कलोक ह्यास रश्चक येथें नेत होतें. १२ मे रोजीं हें जहाज कालाफात गांवाजवळ मध्य रात्रीचे सुमारास आलें. रशियन लोकांनीं तें जहाज पाहिल्यावर त्यावर तोफा मारणें सुरू केले. आलीकडचेकांठीं विडन जवळ जें तुर्क सैन्य होतें त्यांस तें शत्रूचें जहाज आहे असें वाटून त्यांनीं ही त्यावर गोळा चालू केला. या दोन्ही माऱ्यांतून तें जहाज वांचलें. २६ तारखेस तें जहाज इब्रेला गांवाजवळ जाऊन पोहोंचलें. येथें रशियन शिपायांची एक टोळी घेऊन लेफ्टनंट डुब्राशीफ व मेजर मुरगेशू हे दोन सरदार लहान होड्यांत बसून रात्रीस निघाले. या लोकांनीं तुर्क लोकांप्रमाणेंच पोशाख केला होता. ह्या होड्या जेव्हां जहाजाच्या जवळ गेल्या तेव्हां तुर्क पहारेकऱ्यांनीं त्यांस कोण आहे, असें विचारिलें- मेजर मुरगेशु यानें मित्र आहों असें तुर्क भाषेंत उत्तर दिलें आणि सांगितलें कीं ह्या होड्या आतांच रश्चक येथून आल्या आहेत. एवढ्यानें तुर्कशिपायांचें समाधान झालें नाहीं. ते माचिन गांवाकडे तोफा व बंदुका मारूं लागले. तुर्क लोक गोळ्या मारीत आहेत इतक्यांत कांहीं शिपाई घेऊन लेफ्टनेंट डुब्राशीफ होडी खालीं उतरला. ते लोक जहाजाकडे पोहत गेले आणि त्यांनीं त्या खालीं टारपेडो लाविलें. ते लोक परत किनाऱ्यावर आल्यावर रात्रीचे तीन वाजण्याचे सुमारास तें जहाज त्यांनीं उडवून फोडिलें.

काळ्या समुद्राचे पूर्व कांठावर अभासित्रा नांवाचा देश आहे. तेथील लोक रशियन सरकारास फार कंटाळले होते. या लोकांस तुर्क लोकांनीं उत्तेजन देऊन बंड करण्यास लावलें, आणि त्यांचे मदतीस १०,००० शिपाई, २५ तोफा व ५०,००० बंदुकी पाठविल्या. ही मदत मिळाल्यानें अभासियन लोकांस बरेंच उत्तेजन आलें आणि त्यांचे बंडाचा बराच फैलाव झाला. यांवर रशियन सरकारास एका निराळ्याच सैन्याची योजना करावी लागली. या लोकांचे मदतीस तुर्क सरकारानें जें सैन्य पाठविलें त्यास सुलतानानें उपदेश केला तो:—

शिपायांनो, तुम्ही गांजलेले लोकांस सोडविण्यासाठीं व न्यायानें

राज्य स्थापन करण्यासाठीं जात आहां. या नाशिवंत जगामध्यें कीर्ति व मुक्ति मिळविण्यास असा प्रसंग दुसरा येणार नाहीं. सुलतानाचे राज्याचा संभाळ करण्यास तुम्ही जात नाहीं; परंतु तुम्ही आपले धर्माचा संभाळ करण्यास जात आहां. जय मिळवून स्वर्ग साध्य करून घ्या. आपले गांजलेले भावास सोडविण्यांत प्राण गेला किंवा यश मिळालें तरी दोन्ही गोष्टी ईश्वरास कबूल आहेत; व पैगंबरास तुम्ही करतां हें पाहून समाधान होईल. जय मिळाला तरी तुमचे श्रमाचें सार्थक आहे व मेला तरी तुमचे श्रमाचें सार्थक आहे.

मुसलमान लोक ख्रिस्ती लोकांचा द्वेष करितात व ख्रिस्ती लोक मुसलमानांचा द्वेष करितात हें मोठें आश्चर्य आहे. कारण ख्रिस्त परधर्मी लोकांचा द्वेष करा असें सांगत नाहीं व मुसलमानांचा पैगंबर महमद हाही ख्रिस्ती लोकांचा द्वेष करा असें सांगत नाहीं. हिजरीशकाचे चवथे वर्षी महंमदानें मुसलमानांस उपदेश केला कीं, ख्रिस्ती लोकांचा संभाळ करा, त्यांचीं देवळें संभाळा, त्यांचे योग्याचे मठांचें संरक्षण करा. सर्वोपरी त्यांचें रक्षण करा. त्यांवर अयोग्य कर बसवूं नका. त्यांस आपला धर्म सोडण्यास लावूं नका. यात्रेकऱ्यांस अडथळा करूं नका. मसूदी बांधण्यासाठीं ख्रिस्ति लोकांचीं देवळें पाडूं नका. ख्रिस्तीबाईनें मुसलमानाशीं लग्न केल्यास तिला आपले धर्माप्रमाणें वागूं द्या. ख्रिस्ती लोकांस मदत लागल्यास त्यांस मदत करा. लढाईचा प्रसंग आला आणि शत्रूचे बाजूस जरी ख्रिस्ती लोक असले तरी देखील त्यांचा द्वेष करूं नका. हा हुकूम जो मोडील तो अन्यायी आहे असें समजलें जाईल व त्यावर ईश्वराचा कोप होईल.

रशियन लोकांनीं आपले सैन्याची मुख्य जागा रुमेनिया प्रांतांत प्लोएस्टी येथें केली. तेथें रशियन बादशहा जून महिन्याचे ६ वे तारखेस आला. त्याची व रुमानियाचे राजाची ७वे तारखेस भेट झाली. रुमानियाचा राजा रशियनांस मिळाला हें पाहून सर्वियाचे राजासही रशियनांस मिळावें असें वाटून तो जूनचे १४ वे तारखेस प्लोएस्टी येथें रशियन बादशहास भेटण्यास गेला.

मान्टानिग्रो लोकांशीं एप्रिलमध्यें पुनः लढाई सुरू झाली. तुर्क

सैन्यावर सुलीमानपाशा मुख्य अधिकारी होता. यानें डंगापासजवळ दोन वेळ मान्टनिग्रो सैन्याचा पराभव केला. त्या लोकांनीं निकसिक येथील किल्ल्यास वेढा घातला होता तो उठविण्याचा सुलीमानपाशानें पुष्कळ प्रयत्न केला परंतु अखेरपर्यंत सिद्धीस गेला नाहीं.

इंग्रज सरकारांनीं रशियन सरकारास कळविलें कीं, युरोपखंडांतून सुएजचे कालव्यामधून एशियाखंडांत जाण्याचा रस्ता बंद पडूं नये. इजिप्त देशाला कोणत्याही प्रकारचा धक्का लागूं नये. बासफरस व डार्डनेल्स येथील रस्त्याबद्दलची जी व्यवस्था झालेली आहे त्या व्यवस्थेस कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येऊं नये. इराणचे आखाताचें रक्षण करणें इंग्रज सरकाराकडे आहे यास्तव लढाईचा प्रादुर्भाव तिकडे जाऊं नये. अशा प्रकारें लढाई चालविल्यास सध्याचे लढाईंत इंग्रज सरकार अगदीं तिऱ्हाईतपणानें वागेल,

यास रशियन सरकारानें उत्तर दिलें तें:—सुएज कालवा बंद पडेल अशी गोष्ट आम्ही होऊं देणार नाहीं. इजिप्शन लोकांनीं तुर्क सरकारास सैन्याची मदत केली आहे यास्तव तेथील राजा आमचा शत्रु आहे. तथापि इजिप्त देशांत लढाई करण्यास आम्ही जाणार नाहीं. कान्स्टांटिनोपल शहर घेण्याचा आमचा बेत नाहीं. त्याबद्दलची व्यवस्था सर्वानुमतें केली जाईल. आम्हीं ज्या हेतूनें लढाईस आरंभ केला आहे तो हेतु साध्य होईपर्यंतच लढाई चालेल. 'अधिक लढाई चालविण्याचा आमचा विचार नाहीं. जो पर्यंत इंग्रज सरकार तिऱ्हाईत राहील तो पर्यंत त्यांचे हितास धक्का लागूं देणार नाहीं. ज्याप्रमाणें आम्ही त्यांचे हिताकडें लक्ष देतों त्याच प्रमाणें इंग्रज सरकारानें ही आमचे हिताकडे लक्ष दिलें पाहिजे. आपलें नुकसान सोसून जर आम्ही आपला हेतु तडीस नेणार नाहीं तर लढाईस तयार होण्याचा उपयोग काय. आपला हेतु तडीस नेल्या शिवाय आम्ही हत्यार खालीं ठेविणार नाहीं.

दोन्हीं सैन्यें लढाईस तयार झालीं होतीं परंतु डान्युब नदीस अतिशय पाणी आल्यामुळें त्यांस स्वस्थ बसावें लागलें तो पर्यंत लढाई म्हणजे काय व ती करितात कशी याचा विचार करूं:—

बचाव आणि चढाई अशी दोन प्रकारची लढाई आहे. पायदळ, स्वार आणि तोफखाना असें तीन प्रकारचें सैन्य आहे. आपला संभाळ करून शत्रूस कांहीं नियमितकाळपर्यंत अडवून धरणें, आणि शत्रूचा हल्ला झाला कीं लागलाच उलट आपण त्यावर हल्ला करणें असे दोन प्रकार बचावामध्यें आहेत. शत्रूवर चाल करून जाणें ह्मणजे चढाई होय. पायदळ दोन्ही लढाईंत उपयोगी पडतें. स्वार चढाईच्या उपयोगी आहेत. तोफा बचावाच्या उपयोगी आहेत. लढाईस आरंभ करणें हें पायदळाचें काम आहे. जोंपर्यंत पायदळ ठीक व्यवस्थेनें असतें तोंपर्यंत पराभव होण्याचें भय नसतें. हातघाईवर लढाई आली तरी पायदळच लढत असतें. दिवसास, रात्रीस, मैदानांत, डोंगरावर, झाडींत, गांवांत पाहिजे तेथें व पाहिजे तें वेळेस लढाई होवो पायदळास लढण्याची सोय असते. पायदळावर एकाएकी हल्ला होऊं नये ह्मणून स्वार त्यांचें रक्षण करितात. तोफा त्यास लढण्याची सोय करून देतात. एकंदरींत सर्व प्रकारचें दुसरें सैन्य पायदळास मदत करण्यासाठीं असतें.

शत्रूची पळापळ झाल्यावर त्याच्या मागें लागणें, आपल्या सैन्यावर अकस्मात् हल्ला न होईल अशी तजवीज ठेवणें, लढाईचे अगोदर व नंतर आपले बेत शत्रूस न कळतील असा बंदोबस्त ठेवणें, शत्रु कोणीकडे जात आहे व त्याचा बेत काय आहे याची बातमी काढणें, त्यास कोंडणें, त्याच्यामागें लागणें, त्यास वरचेवर त्रास देणें, त्याच्या मुलखांत चोहोंकडे फिरून आपल्या सैन्यासाठीं चंदी चारा मिळविणें, शत्रूस सामानादिकांचा कोणीकडून पुरवठा होत आहे याची बातमी काढून तो न होईल अशी तजवीज करणें, त्याच्या पळून जाण्याच्या वाटा अडवून धरणें हीं सगळीं स्वारांचीं कामें आहेत.

शत्रु लांब आहे तों त्यावर मारा करून त्याची हल्ला करण्याची धडाडी मोडणें, त्याच्या तोफा बंद पाडणें, आपले पायदळास लढण्याची सोय करून देणें हीं तोफांचीं कामें आहेत. यांचें रक्षण दुसऱ्यांनीं करावें लागतें एवढाच यांचे आंगीं उणेपणा आहे.

बचावाचीं कामें करण्याची जेथें सोय असते ती जागा किंवा किल्ला

अशी दोन प्रकारची जागा बचावाची लढाई करण्यास निवडितात. किल्ला ह्मणजे आपल्या देशांत ज्याप्रमाणें जसा नुसता किल्लाच असतो तसा प्रकार तिकडे नाहीं. एखाद्या शहरालाही किल्ला ह्मणतात. तो प्रकार असा कीं ज्या जाग्याला किल्ला हें नांव असतें त्याचे भोंवतालीं तट असतो. त्या तटाला बुरूज व कोन असतात. त्यांच्या आंतल्या बाजूला सपील असते. त्यावर शिपाई उभे राहतात. बुरजावर तोफा असतात. तटाला कोन असले ह्मणजे तीन बाजूस मारा करितां येतो. हा तट उंच असून याचे माऱ्यांत बराच लांबवर प्रदेश असतो. याचेपुढें कोरडा किंवा पाण्यानें भरलेला खंदक असतो. खंदकाचे पुढें व बुरजांचे समोर मोटेच्या धावेप्रमाणें मातीचे ओटे असतात. हे इतके उंच असतात कीं, तटाचे बुरजावर शत्रूस मारा करितां येत नाहीं. यांच्यापुढें व बुरजावरल्या तोफांचे माऱ्यांत मातीचे चबूते असतात. यावर तोफा असतात. यांचेपुढें उंच जाग्यावर लहान लहान किल्ले असतात. यांत मातीचीं जेवढीं कामें सांगितलीं आहेत तेवढीं आयते वेळेस करितात. इतकीं कामें करून ठेवण्याचा हेतु असा असतो कीं, किल्ल्यांतील सैन्य जी जागा ठरवील त्याच जागीं शत्रूस लढावें लागतें; आणि तेणेंकरून त्याचा फार नाश होतो.

ज्या ठिकाणीं खंदक, तट वगैरे नसेल त्या ठिकाणीं पुष्कळ लोक मावण्यासारखा व बचावाची जागा मजबूत करण्यासाठीं रिडाउट करितात. याचा आकार अर्ध चंद्रकार असतो; व हा बहुतकरून सपाट किंवा उतरत्या जाग्यावर बांधितात. यांत प्रथम छातीइतका खोल खंदक असतो. त्याचेपुढें अर्धा किंवा पाऊण हात जागा सोडून उतरता ओटा असतो. या ओट्यास पारापेट व सोडलेल्या जाग्यास ह्मणजे सपील्चेस बर्म ह्मणतात. पारापेट ओटा शिपायांचे छातीबरोबर किंवा गळ्याबरोबर उंच असतो. हा खंदकांत निघालेले मातीचा करितात. याचेपुढें दुसरा एक चर असतो. हा खंदकापेक्षां खोल असतो. यांतले मातीचा याचेपुढें एक ओटा करितात. हा पारापेटसारखाच असतो परंतु यास ग्लासिस ह्मणतात. या सर्वांचे पुढें सुरुंग व फुगास असतात. सुरुंग सर्वांस माहित आहेतच. फुगास ह्मणून एक मांड्या

इतकी खोल गार असते. हिचे तोंड शत्रूचे बाजूस असते. याचें तळाशीं दारूची पेटी ठेवून वर दगड कपरे वगैरे मारक पदार्थ ठेवितात. याला सरबत्ती दिली ह्मणजे वरच्या पदार्थांचा शत्रूचे बाजूस मारा होतो.

असल्या किल्ल्यावर जो अधिकारी असतो तो आपले सैन्याचें दोन भाग करितो. एका भागाला सर्व किल्ल्यांवर वाटून ठेवितो आणि दुसऱ्या भागाला हल्ला करणारें सैन्य ह्मणतात, त्यास शत्रूचा हल्ला आल्यास तो निर्फळ करण्यासाठीं योजितो. या हल्ला करणाऱ्या सैन्याचे तीन तुकडे करितात. एकाला लढणारें, दुसऱ्यास मदतनीस आणि तिसऱ्याला आमानत सैन्य असें ह्मणतात. याशिवाय सैन्य रक्षक निराळेच असतात. हें लहान किल्ल्यांचेही पुढें असतात.

सैन्य रक्षकाला लपण्यास शेल्टर ट्रेंच, रायफलपिट इत्यादि करितात. रायफलपिट एकाच मनुष्यासाठीं असतो. हा गोमुखीचे आकारासारखा गुडघ्याइतका खोल खळगा असून याचेपुढें यांतली निघालेली माती असते. शेल्टर ट्रेंच म्हणून लांबचे लांब चर असतो. यांत निजून किंवा गुडघे टेकून किंवा उभें राहून गोळी मारितां येते. यांत पुष्कळ शिपायांचा समावेश होतो. तोफेसाठीं जी गार करितात तीस गनपिट म्हणतात.

शत्रूच्या सैन्य रक्षकाला आपल्या विनीवाल्यांनीं हाकून देणें येथपासून चढाईचे लढाईस आरंभ होतो. आपला तळ सोडिल्यावर जेणें करून शत्रूचा पराभव होईल अशा प्रकारें सैन्य त्यावर नेतात; आणि त्यास भलत्याच ठिकाणीं लढाई करावयास लावितात येणेंकरून त्याच्या बचावाच्या जाग्यांचा त्यास कांहींच उपयोग होत नाहीं. शत्रूची सरहद्द फार मोठी असली आणि तो ती धरून असला तर जागोजाग आंत शिरण्याचें भय घालितात. तेणें करून त्याच्या सैन्याचे तुकडे होतात, आणि मग जी जागा आंत घुसण्यास निवडली असेल तेथून आंत शिरतात. फार मोठें सैन्य असल्यास निरनिराळ्या रस्त्यांनीं त्यास रणभूमीवर नेतात. उदहारण:—जर एक लक्ष सैन्य एकाच वाटेनें नेलें तर ४० मैल जागा व्यापिली जाते; आणि अशा एकाच रस्त्यानें सैन्य नेलें असतां पुढल्या सैन्यास मद-

तें होण्याचे अगोदरच शत्रु त्याचा पराभव करितो. या करितां मोठ्या सैन्याचे तुकडे करून निरनिराळ्या रस्त्यांनीं नेतात, हे रस्ते जवळ जवळ असतात तसे नसल्यास शत्रु, मध्यें शिरून सैन्याचें तुकड्यांची एकमेकांस मदत होऊं न देतां पराभव करितो. शत्रूच्या देशांतले पुष्कळ रस्तें जेथें मिळत असतील ती जागा आपल्या ताब्यांत घेतात. असें केल्यानें निरनिराळे रस्ते संभाळण्याकरितां शत्रूस आपल्या सैन्याचे पुष्कळ तुकडे करावे लागतात.

हल्ला करण्या करितां सैन्याचा कूच करण्याचे वेळेस सर्वांचे पुढें पायदळ, त्याचें मागें तोफखाना, त्याच्या मागें समानाच्या गाड्या व सर्वांचे मागें स्वार असतात या सगळ्या सैन्याचे पुढें बिनीवाले ( अडवान्स गार्ड ) आणि सर्वांचे मागें सिनीवाले (रियर गार्ड) असतात. शत्रूच्या जवळ सैन्य गेलें म्हणजे स्वार सामानाच्या गाड्यांच्या पुढें होतात. पायदळांत अमानत, मदतनीस व लढणारें सैन्य असें भाग करितात. लढणारे सैन्यास लागेल ती मदत करणें मदतनीस सैन्याचें काम आहे. आणि अमानत सैन्य आंयतेवेळेस दमलेले व थकलेले शत्रूच्या तोंडावर नेण्यासाठीं असतें. सैन्य चाल करून जात असतें म्हणजे त्याची व्यवस्था राहत नाहीं; यास्तव त्यावर शत्रूचा एकाएकी हल्ला न व्हावा म्हणून बंदोबस्तासाठीं पुढें सैन्य असतें त्यास बिनीवाले असें म्हणतात. शत्रू पासून पराङमुख होण्याचे वेळेस मुख्य सैन्यास मागें हटण्यास अडथळा होऊनये ह्मणून सिनीवाले नांवाचें सैन्य सर्वांचे मागें असतें. एखादें ठिकाणीं तळ दिला असतां त्यावर एकाएकी शत्रूचा हल्ला न व्हावा म्हणून तजविजी सांठीं ज्या सैन्याची योजना करितात त्यास सैन्य रक्षक असें ह्मणतात.

बिनीवाले सैन्य सगळ्या सैन्याचा चवथा हिस्सा असतें. हें सैन्य मुख्य सैन्याचे बरेंच पुढें असतें. थोडें सैन्य असलें तर सरासरी अर्धा कोस हें सैन्य पुढें असतें; आणि मोठें सैन्य असलें तर एक दिवसाचे वाटेवर पुढें असते. यांत तिन्ही प्रकारचें सैन्य असतें. याचे तीन भाग करितात. एकाला पुढचा भाग (फ्रंटट्रूप ) दुसऱ्याला थोरला

भाग ( मेनट्रूप ) आणि तिसऱ्याला मुख्य भाग ( मेनबाडी ) असें ह्मणतात. पुढच्या भागाच्या तीन टोळ्या करतात. एक उजव्या कोपऱ्यावर, दुसरी डाव्या कोपऱ्यावर आणि तिसरी टोळी समोर चालत असते. याशिवाय चार चार स्वारांच्या टोळ्या करून त्यांस यांच्याही पुढें पाठवितात. तसेंच चार चार शिपायांच्या टोळ्या करून आजूबाजूला पाठवितात. स्वारांचे टोळीस स्कौट आणि पायदळाचे टोळीला पाट्रोल असें ह्मणतात.

सिनीवाले सैन्यांत तिन्ही प्रकारचें सैन्य असतें; परंतु जर मैदानाची जागा असेल तर यांत स्वार आणि तोफा मात्र असतात. जेथें चांगली जागा सांपडेल तेथें त्यांनीं उभें राहून पाठीस लागलेले शत्रूवर मारा करावा आणि त्यास अडवून धरावें हें यांचें काम आहे. मोठी लढाई करण्याचा त्यांचा हेतु नसतो. फक्त थोडा वेळ शत्रूस अडवून धरण्याचें त्यांचें काम आहे. हें काम झालें कीं लागलेंच ते लढाई सोडून पळतात, आणि पुन्हा चांगली जागा धरून शत्रूवर उलटतात. अशा प्रकारें मुख्य सैन्यास अडथळा न होतां त्यास पळून जाण्यास वेळ मिळवून देतात. यांतही तीन टोळ्या असतात. सर्वांचे मागें व शत्रूच्याजवळ जी टोळी असते तिला अफटर ट्रूप असें ह्मणतात. ती टोळी वरचेवर जी जागा धरते त्या जाग्याला रियर गार्ड पोझिशन म्हणतात.

सैन्याचा तळ एखादे ठिकाणीं पडला असतां त्यास निवांत विसावा मिळण्यासाठीं ज्या सैन्याची योजना करितात त्यास सैन्य रक्षक ह्मणतात. यांत पायदळ व स्वार दोन्ही प्रकारचे लोक असतात. तळावर एकाएकी हल्ला होऊंनये, आणि जर हल्ला आलाचतर तेथील सैन्यास तयार होई पर्यंत आवकाश मिळवून देणें हें सैन्य रक्षकांचें काम आहे. तळाचे पुढें यांच्या तीन ओळी असतात ; त्या:— १ पिकेट ( पहारेवाले ) २ सपोर्ट (मदतनीस) ३ रिझर्व ( अमानत ) पहिल्या दोन ओळींतील लोक शत्रूस मोठासा अडथळा करीत नाहींत. यास्तव त्यांत फारच थोडे लोक असतात. पिकेटचे पुढें एका हकेवर पाहारेवाले संत्री असतात. ह्या तिन्ही ओळी मिळून सुमारें तीन मैल जागा व्यापितात.

लढाईचे वेळेस थोडा वेळ अगोदर फौजेस विश्रांती मिळावी म्हणून तळ देतात. ज्या ठिकाणीं तळ देतात त्याचेजवळ पास कोठें तरी पाणी असावें लागतें. ज्या जाग्यावर लढाई होण्याचा संभव असतो त्या जाग्यावर तळ देत नाहींत; परंतु अशा जाग्यावर तळ देतात कीं लढाईस पसंत केलेली जागा झटदिशीं धरितां येते. तळाचे एका बाजूस नदी किंवा गांव असतो. सैन्याचे प्रत्येक तुकडीला किती जागा देतात त्याचा तपशील:——

१००० पायदळ शिपायांस २०० पावलें रुंद व ३६० पावलें लांब जागा देतात.

१४० स्वारांला २०० पावलें रुंद व २६० पावलें लांब जागा देतात.

१ बातरी तोफेला १०० पावलें रुंद व २७० पावलें लांब जागा देतात.

पुढें पायदळांचा मागें स्वारांचा व त्यांच्यामागें तोफखान्याचा तळ असतो. हल्ल्याचे वेळेस प्रथम पायदळ तयार होऊन पुढें जातें. त्याच्यामागें स्वार आणि सर्वांचे मागून तोफा तयार होऊन जातात.

**टेहळणी**——शत्रूचे मुलखांत जाण्याचे अगोदर त्या देशाची पहाणी करण्यासाठीं एका सरदारास पाठवितात. त्याचेबरोबर स्वार व वाटाडे असतात. ज्या प्रांताची पहाणी करावयाची असेल त्या प्रांताचा त्याजवळ नकाशा असतो, किंवा तो नवीन तयार करितो. शत्रूचे जाग्याचा शोध करावयाचा असल्यास पहाटेस अडवाटेनें शत्रूचे तोंडावर जातात, आणि एका बाजूला उगीच आरडाओरड करितात. तिकडे शत्रूचें लक्ष लागलें कीं, दुसऱ्या बाजूनें टेहळणी करितात. लढाईचे जाग्यावर झाडी कोठें आहे, गांवें कोठें आहेत, आजूबाजूला अडचणी कोणच्या आहेत, मोठे रस्ते किती आहेत, वाटा किती आहेत, नद्या व ओढे कोठें आहेत, त्यांचे उतार कोठें आहेत, पूल कोठें आहेत वगैरे सगळे पाहून आपल्या नकाशावर खुणा करून घेतात.

**वैद्यक्रिया**:—शस्त्रघात होऊन दोन प्रकारची जखम होते. शीर तुटतें किंवा धमनी तुटते. शीर तुटली असतां काळ्या रंगाचे रक्त

हळूंहळूं वाहूं लागतें. धमनी तुटली असतां तांबड्या रंगाचें पुष्कळ रक्त वाहतें. शीर तुटलेले जखमेस चिमटीनें दाबून कशानें तरी बांधितात. धमनी तुटलेले जखमेस चिमटीनें दाबून धरून त्याच्या भोंवताली फडक्याची घडी गुंडाळितात आणि त्यावर चिंधी बांधतात. रक्त बंद करण्यासाठीं जखमेला काडीचा टांचा देतात.

हात दुखावला असल्यास त्यास रुमाल बांधून गळ्यांत अडकावितात.

पाय दुखावला असल्यास तो पाय दुसऱ्या पायावर बांधतात. कोठें पोळलें असल्यास तेल चुना समभाग एकत्र करून जखमेवर लावितात, आणि त्यावर कापूस चिकटावितात. किंवा तेल, कणिक व बटाट्याचा कीस एकत्र करून लावतात.

पुष्कळ चालल्यानें पायास फोड आले असल्यास किंवा पाय सुजला असल्यास फोड फोडून उष्ण पाण्यांत मीठ मिसळून त्यानें धुतात. किंवा दिव्यावर धरून चरबीचे थेंब दारूंत पाडून त्या दारूनें पाय चोळितात, आणि वर मोजे घातले ह्मणजे दुसरे दिवशीं पाय साफ होतो.

युरोप खंडांत व एशिया खंडांत दोहीं कडून तुर्क लोकांबरोबर लढाई चालविण्याचा रशियन बादशाहाचा मानस होता आणि त्या प्रमाणें त्यानें दोन सैन्यें ही तयार केलीं होतीं. एशिया मायनरमध्यें जाणाऱ्या सैन्यावर ग्रयांड डयूक मायकेल हे मुख्य सेनानायक होते. यांनीं आपल्या सैन्याच्या ३टोळ्या ३बाजूनें तुर्कांचे राज्यांत पाठविल्या. त्या प्रांतीं तुर्क लोकांचें जें सैन्य होतें त्यावर अहमदमुखत्यार पाशा मुख्य होता. यानें ही आपले सैन्याचे डावे बाजूवर ह्मणजे अर्दहान शहरा जवळचे सैन्यावर हसनसाब्रीपाशास व उजवीकडे बायझिद येथील सैन्यावर महमद पाशास नेमिलें होतें. रशियनाचे तिसरे भागानें कारवानसराईचे रस्त्यानें येऊन मे महिन्याचे १ ले तारखेस बायझिद शहर घेतलें. तेथील लोक लढाई न करतां शहर शत्रूचे स्वाधीन करून पळून गेले, दुसरा भाग आर्पाचाई नदी उतरून २७ एप्रिल रोजी कार्स नदीचे कांठीं माझारा म्हणून गांव आहे तेथें आला. मुखत्यार पाशानें पाहिलें कीं, जर आपण कार्स श-

हरींच आणखीं कांहीं दिवस राहिलों तर कोंडलेंजाऊं ह्मणून तो ९ बटालीयन पायदल ३ बातरीतोफा व ५०० स्वार घेऊन मे महिन्याचे ५ वे तारखेस कार्स सोडून निघाला. यानें कार्स येथील किल्ल्याचा चांगला बंदोबस्त करून ठेविला होता. अहमद मुख-त्यार कार्स सोडून निघाला हें ऐकून त्याचें मागें रशियन सैन्याचे दुसरे भागांतील एक टोळी लागली. या टोळीची गांठ न घेतां तो साघानलीडाग डोंगरावर निघून गेला. हा कदाचित सैन्य घेऊन पुन्हा माघारी येईल असें समजून रशियन लोकांनीं एक ब्रिगेड स्वार त्याचे वाटेवर ठेवून बाकीचें सैन्य परत कार्स किल्ल्याकडे नेलें. नंतर कार्स-जवळ १०००० सैन्य ठेवून जनरल मेलीकाफ अर्दहान शहरावर गेला. त्या शहरीं साब्रीपाशा होता. त्यानें विश्वासघात करून १६ मे रोजीं तें शहर रशियन लोकांचे स्वाधीन केलें. तथापि त्या शहराजवळ अमीर अंग्लो नांवाची टेकडी आहे. त्या टेकडीवर ४०० शिपाई घेऊन महमदबे नांवाचा सरदार उभा होता. त्यानें अशी लढाई केली कीं, त्याचे लोकांपैकीं १६ शिपाई मात्र जिवंत परत आले. त्या शहरीं २००० तुर्क शिपाई कैद झाले. अर्दहान शहरीं एक ब्रिगेड सैन्य ठेवून जनरल मेलीकाफ परत कार्स शहराकडे गेला.

तिसऱ्या भागानें बायझिद घेतल्यावर पुढें चाल केली. ते जों जों पुढें जात तों तों तुर्क लोक मागें सरत असें सरत सरत तुर्क सैन्य डे-लिबाबापर्यंत आलें. तेथें १२ बटालियन पायदळ आणि ४ बातरी तोफा महमदपाशानें तयार करून ठेविल्या होत्या. हीं दोन्हीं सैन्यें एकत्र झाल्यावर तुर्क लोक शत्रूवर उलटले. त्यांची व शत्रूची टाघीर येथें गांठ पडून १६ वे तारखेस लढाई झाली. यांत महमदपाशाचे कपा-ळांत गोळी लागून तो मरण पावला. नंतर तुर्क सैन्याची पळापळ झाली. त्यांत १४२६ शिपाई मेले, ९६५ जखमी झाले आणि ११ तोफा शत्रूचे हातीं लागल्या. रशियन लोकांचे मेले व जखमी मिळून ३०० शिपाई जाया झाले. ही बातमी मुखत्यारपाशास लागल्यावर त्यानें अर्झ-रुम येथून सैन्य मदतीस आणवून ५ बटालियन पायदळ १ बातरी तोफा व १००० स्वार बरोबर घेऊन तो उजव्या भागाचे मदतीस गेला; आणि

२१वे तारखेस त्यानें एशेखखालियास येथें शत्रूवर हल्ला केला; परंतु म्हणण्यासारखा जय कांहीं मिळाला नाहीं. शत्रूचें सैन्य पुष्कळ जमलें हें पाहून रशियन लोक झेडीखानकडे मागें सरले. या ठिकाणीं तुर्कीचे सुमारें १४०० लोक जाया झाले.

अर्दहान जवळ ठेवलेले रशियन सैन्याचे एका टोळीनें पुढें चाल करून मे महिन्याचे अखेरीस अल्टी गांव घेतलें; तेथें त्यांस ३००० बंदुकी, २९० तंबु व पुष्कळ सामान सांपडलें. अल्टीचे वाटेनें रशियन सैन्य अर्झेरूमवर येत आहे हें ऐकून मुखत्यारपाशानें हजीरशीदपाशाबरोबर ८ बटालियन पायदळ, दोन रिसाले स्वार व ६ तोफा देऊन त्यास अर्दहानकडून आलेले सैन्यावर पाठविलें. आणि उजव्या भागास मदत करण्यासाठीं आपण झेविन गांवीं गेला. आपण कोणीकडे गेलों याची बातमी शत्रूस न लागावी ह्मणून ३००० शिपाई देऊन मुसापाशास बेक्री अहमेद गांवाकडे ह्मणजे कार्सकडून येणाऱ्या शत्रूचे तोंडावर पाठविलें. त्यावर शत्रूनें एकाएकीं हल्ला करून ८३ लोक मारले, १२८ जखमी केले, ३०० कैद केले, आणि सर्व तोफा घेतल्या. १९ बटालियन पायदळ व १२ तोफा देऊन फैजीपाशास झेविन येथें ठेवून अहमद मुखत्यारपाशा मागें सैन्य जमा करण्यास गेला. झेविन येथें फैजीपाशा आपली तयारी करीत आहे तों २६ वे तारखेस शत्रूचें सैन्य तेथें येऊन दाखल झालें. दुसरे दिवशीं लढाई झाली त्यांत रशियन सैन्याचा पराभव होऊन तें परत कार्स शहराकडे गेलें. येथें तुर्कीचे ४५० व रशियनाचे १००० शिपाई जखमी झाले. ही जयाची बातमी मुखत्यारपाशास कळल्यावर त्यानें आपले तिन्ही भागचे सैन्यास मदत पाठवून सर्वांस पुढें चाल करून जाण्याचा हुकूम दिला.

दुसऱ्या भागाचा पराभव झाला हें पाहून रशियन लोकांचे तिसरे भागचें सैन्य मागें हटत हटत इडगीरपर्यंत गेलें. व्हान येथें जें तुर्क सैन्य होतें तें बायाझिदवर गेलें. तेथें शत्रूचें २ बटालियन पायदळ व, एक रिसाला स्वार होते त्यावर त्यानें हल्ला करून त्यांस किल्ल्यांत हाकून लाविलें आणि किल्ल्यास तुर्क लोकांनीं वेढा घातला. पाणी बंद के-

त्यामुळें किल्ल्यांतील रशियन लोक शरण आले. हत्यारें ठेवून ते लोक किल्ल्याबाहेर येत असतांना त्यांवर खुर्द जातीचे मुसलमान लोकांनीं गर्दी उडविली. या सैन्यावर फेकपाशा मुख्य होता. इतक्यांत किल्ल्यांत राहिलेले लोकांनीं दरवाजे बंद केले. पुढें त्या सैन्याचे मदतीस इडगीर येथील सैन्य येऊन त्यांनीं फेकपाशाचा पराभव केला.

तुर्क सैन्यानें पुढें चाल केली तेव्हां रशियन लोकांच्या दुसऱ्या भागचें सैन्य मागें सरत कार्सपर्यंत आलें. शेवटीं कार्स किल्ल्याचा वेढा उठवून तें आपले सरहद्दीकडे परत गेलें. नंतर या सैन्यास रशिया देशांतून मोठी मदत आली. २५ आगष्ट रोजीं किझीलटेपचे टेकडीजवळ मोठी लढाई झाली त्यांत रशियन लोकांचा पराभव होऊन १२ सरदार व २३७ शिपाई मेले; आणि ३ जनरल व ६६७ शिपाई जखमी झाले. तुर्कांचे ३४० शिपाई मेले व ९०० जखमी झाले. नंतर सगळा सप्तेंबर महिना जाईपर्यंत दोन्ही सैन्यें उगीच पडून राहिलीं होतीं. रशियन लोकांस वरचेवर कुमक येऊं लागल्यामुळें आपल्या उजव्या भागाचा संबंध तुटूंनये ह्मणून मुखत्यारपाशानें नाचेवान येथें ५ बटालियन पायदळ व १ बातरी तोफा ठेवल्या होत्या. याचा उजवा भाग कुल्पी येथें होता.

रशियन लोकांस सुमारें ५०००० सैन्य मदत आल्यावर त्यांनीं तारीख २ आक्टोबर रोजीं पुढें चाल केली. ग्रेटयाग्नी टेकडीवर तुर्क लोकांचें एक बटालियन पायदळ होतें त्यावर हल्ला केला. जरी तुर्क सैन्याचे दुप्पट रशियन सैन्य होतें तथापि त्या दिवशीं त्या टेकडीशिवाय दुसरें कांहीं रशियन लोकांचे हातीं लागलें नाहीं. शत्रूस वरचेवर मदत येत आहे हें पाहून मुखत्यारपाशानें किझीलटेपची टेकडी सोडून दिली आणि अलजाडागजवळ आपलें सैन्य मागें घेतलें, नंतर नाखरजी, ओलिया, लिटलयाग्नी आणि विझनकोई येथें एक एक टोळी ठेवून बाकीचें सैन्य खारखाना येथें ठेविलें. रशियन लोकांनीं आपलें सैन्य किझिलपेट, सबातन, हाजीवेली आणि ग्रेटयाग्नी येथें आणिलें आणि १३ वे तारखेस पुढें चाल केली. आपले मागें शत्रूचें सैन्य येईल हें मुखत्यारपाशाचे ध्यानांत आलें नाहीं. तो समोरचेंच सैन्याबरोबर लढत

होता. १४ वे तारखेस जेव्हां शत्रूचें सैन्य मागें आल्याची खबर त्यास लागली तेव्हां १२ बटालियन पायदळ ३ बातरी तोफा आणि २००० स्वार देऊन हजीरशीदपाशास त्या सैन्यावर पाठविलें. याचे व मुखत्यारपाशाचे सैन्याचे मध्येंच शत्रूची एक टोळी शिरली आणि त्या टोळीनें या दोन्ही सैन्याची तुटातुट केली. सैन्याची तुटातूट करून शत्रूनें आपणास चोहोंकडून घेरलें हें पाहून तुर्क लोक घाबरले आणि सर्वच कार्स शहराकडे पळाले. या गडबडींत ३४ बटालियन पायदळ ४२ तोफा, ७ पाशा आणि ३००० ओझ्याचीं जनावरें रशियन लोकांनीं धरलीं. मेले व जखमी मिळून ५००० तुर्क शिपाई जाया झाले. मुखत्यारपाशा व महमदबेपाशा अगोदर पळाल्यामुळें वाचले.

कार्स शहराचा सरासरी बंदोबस्त करून व उजवी कडील सैन्यास कुप्रीकुईकडे मागें येण्याचा हुकूम देऊन मुखत्यार पाशा अर्झरूम कडे गेला. उजवी कडील सैन्य मागें सरत सरत २८ वे तारखेस आरास गावीं गेलें तेथें त्यांची व मुखत्यार पाशाची गांठ पडली. या दोघांचे मिळून १०००० सैन्य जमलें. या सैन्यानें मागें सरून हासनकाले येथें तळ दिला. शत्रूचें सैन्य आपले मागें येत आहे हें ठाऊक असून सैन्या भोंवती रक्षणार्थ पहारे ठेवावयाचे ते न ठेवितां स्वस्थ बसले. यांवर शत्रूनें एकाएकी हल्ला करून त्यांची पळापळ केली. शत्रूनें हें सगळेंच सैन्य धरिलें असतें परंतु खुरूडजूक येथें एक ब्रिगेड सैन्य होतें त्यानें मध्यें येऊन पळालेल्यांचा बचाव केला. तथापि ५०० शिपाई शत्रूस शरण गेले. डेवीबोयन येथें मुखत्यार पाशानें आपलें पळालेलें सैन्य जमा केलें आणि अर्झरूम येथून ३००० शिपाई व ६० तोफा मदतीस आणविल्या. ४८ बटालियन पायदळ, ७ रिसाले स्वार आणि ९६ तोफा इतकें रशियन सैन्य डेवीबोयन येथें हल्ला करण्यास आलें. अक्टोबरचे ४थे तारखेस लढाई होऊन पुन्हा तुर्क सैन्याची पळापळ झाली. त्यांत ४२ तोफा व सगळें सामान रशियनांचे हातीं लागलें. अर्झरूमवर पुन्हा मुखत्यार पाशानें सैन्याची जमवाजमव केली. एकंदर १२००० सैन्य जमलें व त्या गावांतील ८८०० लोक लढाईस तयार झाले होते. १५-

तोफा गांवांभोंवताली ठेवल्या होत्या. प्रथम दिवशीं रशियन लोकांनीं अंधेरांत हल्ला केला यामुळें सर्व सैन्याची चुकामूक होऊन आपापसांतच लढण्याची वेळ आली होती. असा घोटाळा झाल्यामुळें बरेंच नुकसान होऊन त्यांस परत माघारी जावें लागलें.

अद्याप पर्यंत कार्स किल्ल्याला शत्रूचा वेढा होताच. अलेजाडाग येथील लढाई झाल्यावर कार्स शहराला पूर्ण वेढा घालण्याचें काम चाललें होतें तोंच किल्ल्यांतील सैन्यानें बाहेर येऊन शत्रूवर हल्ला केला. ते लोक पराभव पावून परत किल्ल्यांत गेले, त्यांच्या पाठोपाठ रशियन सैन्यही किल्ल्यांत शिरलें आणि हाफिज पाशा नांवाचे गढींतील सर्व तोफा घेऊन गेले. पुढें १८ वे तारखेस रात्रीं रशियन सैन्यानें किल्ल्यावर हल्ला केला. या वेळेस तुर्क सैन्य अगदीं बेसावध होतें. त्यांतून तेथील अधिकाऱ्यांमध्यें भांडण लागलें होतें, गांवांत तापाची सांथ मोठे जारीनें सुरू होती. जागोजाग पराभव झाल्याची बातमी ऐकून शिपायांचें धैर्य अगदीं खचलें होतें. हल्ला झाला ती रात्र चांदणी होती परंतु धुकें आल्यामुळें थोडा अंधार पडला होता. त्या किल्ल्यांतील तोफखान्यावर हसनबे ह्मणून एक अधिकारी होता. तो फितुरी होऊन त्यानें तुर्क अधिकाऱ्यास सांगितलें होतें कीं, मी रशियन सैन्यांत जाऊन आलों त्यांजवळ वेढा घालण्या पुरत्या तोफा नाहींत व हल्ला करण्या पुरतें सैन्यही नाहीं. या बोलण्यावर विश्वास ठेऊन तुर्क सैन्य बेसावध राहिलें होतें. तथापि हल्ल्याचे वेळेस कांहीं कांहीं जागा तुर्क शिपायांनीं धरिल्या होत्या त्या सकाळच्या आठ वाजे पर्यंत सोडिल्या नाहींत. तेथील अधिकारी हुसेनहमीपाशा मात्र थोडे स्वार बरोबर घेऊन पळून गेला. बाकीचें सर्व सैन्य व ३१९ तोफा रशियन लोकांच्या हातीं लागल्या. या लढाईंत २५०० तुर्क व ३००० रशियन शिपाई निकामी झाले.

कार्स किल्ला घेतल्यावर ग्रयांडड्युकानें अर्झरूम जवळचे सैन्यास आपले जवळचे सैन्या पैकीं दोन डिविजन सैन्य मदतीस पाठविलें. इकडे मुखत्यारपाशाला ही ट्रेबीझांड येथून १७ बटालियन पायदळ व कान्स्टांटिनोपल येथून कांहीं तोफा मदतीस आल्या.

या वेळेस थंडी फार पडून बर्फ पडावयास लागलें होतें, या मुळें रशियन सैन्याच्यानें फारशी चळवळ करवली नाहीं.

रशियन सैन्याचा पहिला भाग बाटूम बंदरावर गेला होता, तेथील अधिकारी दरवीश पाशा मोठा शहाणा व शूर होता. त्यानें रशियन सैन्याचें कांहीं एक चालूं दिलें नाहीं. रशियन लोक वरचेवर हल्ला करीत आणि तो त्यांस वरचेवर माघारीं पिटावून लावी.

रशियन सैन्यानें तीन बाजूनें अर्जरूम शहरास वेढा घातला होता फक्त पश्चिमबाजू मोकळी राहिली होती, मुखत्यारपाशानें ही लढाईची बरीच तयारी केली होती. इतक्यांत त्यास सुलतानाचें बोलावणें झालें म्हणून इस्मेलहकी यास आपले जाग्यावर नेमून आपण कान्स्टांटिनोपल शहरास निघून गेला,

जून महिना अर्धा संपेपर्यंत डान्यूब नदीचे पाणी उतरलें नाहीं. एवढ्या वेळांत कोठें नदी उतरावयाची ती जागा त्यांनीं पसंत करून ठेवली होती. शेवटीं जून महिन्याचे २१वे तारखेस गालाझ शहरा जवळ रशियनचे एका टोळीनें नदी उतरून जाण्यास आरंभ केला. प्रथम १८०० लोक होड्यांत बसून नदी उतरून गेले. गिरगेवो जवळ नदी उतरण्याची रशियन लोक खटपट करतील असें समजून रश्चुक व निकोपोलिस यांचे दरम्यान तुर्क लोकांनीं आपलें सैन्य ठेविलें होतें. माचिन गांवाचे बाजूस ९ मैलावर रशियन सैन्यांतील ४००० शिपाई, ३०० स्वार व तोफा २२ वे तारखेस नदी उतरले या लोकांस सुमारें तीन मैल नदींतून जावें लागलें. यांस तुर्क लोकांनीं पाहिलें परंतु लपत छपत जाऊन त्यांनीं किनारा गांठला; तों दुसरी टोळी मागून मदतीस आली, नंतर झेझीला खेड्या जवळ हातघाईवर येई पर्यंत लढाई झाली. यांत तुर्क लोकांचा पराभव होऊन माचीन गांव रशियन लोकांचे हातीं लागलें. तिसरी टोळी हिरासोवा गांवा जवळ नदी उतरून २४ वे तारखेस तुर्कींचे मुलखांत शिरली. २४ व २५ तारखेस रशियन सैन्यानें रश्चुकवर तोफांचा मारा करून बराच नाश केला. इकडे रशियन बादशाहानें बल्गेरीयन लोकांत जाहिरनामा प्रसिद्ध केला तो.:—

सर्विया व रुमानिया येथील लोकांस स्वतंत्र करण्यासाठीं माझे पूर्वजांनीं किती खटपटी केल्या हे सर्वांस माहीत आहेच. या गोष्टीस पुष्कळ दिवस झाले ह्मणून आपले धर्माचे लोकांस सोडविण्याची रशियन बादशहाची इच्छा कमी झाली असें नाहीं. अजून पहिल्यासारखीच प्रीति रशियन लोकांचे मनांत आहे. बलगेरियांतील लोकांनो. रशियन लोक नाश करणारे नाहींत. तुमचें रक्षण करण्यासाठीं परमेश्वरानें त्यांस पाठविलें आहे. आजपासून रशियन लोक तुम्हावर जुलूम होऊं देणार नाहींत. अपराध्यास योग्य शिक्षा दिली जाईल. कोणत्याही पंथाचा ख्रिस्ती मनुष्य असो. त्याचा जीव, त्याचें स्वातंत्र्य, त्याची अब्रू आणि त्याची मालपत्ता संभाळली जाईल. आम्ही कोणाचा सूड घेणार नाहीं. सर्वांशीं सारख्या रीतीनें वागून सर्वांस सारखा कायदा लागू करूं. बलगेरिया देशांतील मुसलमान लोकांनो, तुह्मांपैकीं कित्येकांनीं केलेले अपराधाचें स्मरण होऊन मला फार वाईट वाटतें. परंतु या अपराधाबद्दल सर्वांस शिक्षा करावी असा माझा मानस नाहीं. न्यायानें जे अपराधी ठरतील त्यांसच मात्र शिक्षा होईल. तुम्हीं शांततेनें राहून आमचा हुकूम मानिल्यास तुह्मांस कोणत्याही प्रकारची इजा होणार नाहीं. आम्ही तुमचे मालमत्तेचें, तुमचे जीवाचे व तुमच्या बायकांचे अब्रूचें रक्षण करूं. अहो बलगेरियन लोकांनो, ख्रिस्ती लोक कसे ममताळू असतात हें आतां दाखवा. तुमचे मनांत राग आहे त्याचा सूड घेऊं नका. ज्या रशियन लोकांनीं तुह्मांस सोडविण्यासाठीं पुष्कळ वेळ डान्यूब नदी ओलांडली आहे त्यांस येऊन मिळा. रशियन अधिकाऱ्यांचा हुकूम माना. यांतच तुमचें कल्याण आहे."

जून महिना संपत आला तेंव्हां डान्यूब नदीचे दोहीं कांठावरून एकसारखा तोफांचा गडगडाट चालू होता. २६ वे तारखेस विडन व निकोपोलिस या दोन शहरांवर रुमानियाचें सैन्यानें मारा चालविला. कोणचे ठिकाणीं रशियन सैन्य डान्यूब नदी उतरणार हें तुर्क लोकांस समजूं नये ह्मणून चोहोंकडे रशियन सैन्यानें तोफांचा मारा चालविला होता. प्रथम ज्या दोन टोळ्या नदी उतरून गेल्या, त्या डाब्रूशा प्रांप्रांतांतल्या होत्या. हा प्रांत बलगेरियाचाच भाग आहे. या प्रांतांतून का-

न्स्टांटिनोपल शहरावर जाण्यास चांगला मार्ग नाहीं. याशिवाय वार्ना वगैरे किल्ल्यांचा मोठा अडथळा या रस्त्यावर होता. यामुळें दुसरीकडे नदी उतरणें रशियन सैन्यास जरूर होतें. सिस्टोवाजवळ नदी उतरण्याचा त्यांनीं बेत केला. येथें तुर्क सैन्याचा लहानसा तळ होता. २७ वे तारखेस रशियन लोक नदी उतरले. तुर्क सैन्याच्यानें त्यांस अडथळा करवला नाहीं, तथापि त्यांनीं पुष्कळ रशियन शिपाई मारिले. या ठिकाणीं सुमारें ३०० नावा रशियन लोकांनीं जमविल्या होत्या. इकडे तुर्क लोकांचें लक्ष लागूं नये ह्मणून त्या दिवशीं निकोपोलिस शहरावर रशियन लोकांनीं मोठा मारा करून नदी उतरण्याचा झोक दाखवून तेथें तुर्क सैन्यास जमा होऊं दिलें आणि सिस्टोवाजवळ ते नदी उतरले. जुलैचे १ ले तारखेस रशियन सैन्याचे सेनापती ग्रांड ड्यूक निकोलास डान्यूब नदी उतरून सिस्टोवा येथें गेले. या ठिकाणीं नावेचा पूल बांधून घोडे, तोफा व सामान आलीकडचे कांठीं आणिलें. अशा रीतीनें अडथळ्याची एक जागा ओलांडून रशियन सैन्य तुर्कीत शिरलें.

रशियन सैन्य डान्यूब नदी उतरून आलीकडे आलें तेव्हां अर्धा उन्हाळा संपला होता. शत्रूचें सैन्य डान्यूब नदी उतरून आलीकडे आल्याची बातमी कान्स्टांटिनोपल शहरीं पोहोंचल्यावर मोठी गडबड झाली; आणि एशियामायनर, आरबस्थान व इजिप्त येथून सैन्याची मदत मागवून, पुष्कळ सैन्य जमा केलें. त्यांत इजिप्त देशाहून ६००० शिपाई १००० गोलंदाज व दहालाख काडतुसें घेऊन खेडीवाचा मुलगा प्रिन्सहासन आला. यानें आपले बरोबर तीन लढाऊ जहाजें आणलीं होतीं. सैन्य पुष्कळ जमलें परंतु सरहद्दीवरची व्यवस्था नीट न ठेविल्यानें रशियन सैन्यास फारसा अडथळा झाला नाहीं व त्यांनीं सगळी डान्यूब नदी पाठीशीं घातली. जुलैचे दुसरे आठवड्यांत या नदीला त्यांनीं दुसरा पूल बांधिला. झेमीरमनचे ह्मणजे पहिल्या नंबरचे सैन्यानें जुलैचे ५ वे तारखेस जंट्रा नदीचे कांठचें बायला गांव घेतलें. दुसऱ्या भागांतील कांहीं सैन्य झारविचेंन रश्चकावर पाठविलें; बाकीचे सैन्यांतील स्वार वेगळे काढून

यावर जनरल गुर्कोस नेमिलें आणि त्याचे मदतीस ८ वी व ९ वी कोरसैन्य देऊन टिरनोवा व ग्याब्रोवाकडे त्यास पाठविलें. तिसरा भाग डान्यूब नदी उतरून आल्यावर त्याची व तुर्क लोकांची पहिली लढाई निकोपोलिस येथें १५ तारखेस झाली. येथें दोन्ही सैन्याचा फार नाश झाला. १६ वे तारखेस तो किल्ला स्वाधीन करून तुर्क लोक शरण गेले. या ठिकाणीं दोन पाशा, ६००० शिपाई व ४० तोफा रशियन लोकांच्या हातीं लागल्या. हें शहर घेतल्यावर तेथें या लोकांनीं तिसरा नावेचा पूल बांधिला.

जुलैचे ६ वे तारखेस जनरल गुर्को सिस्टोवा शहर सोडून निघाला तो १२ वे तारखेस टिरनोवा येथें आला. याचे मनांत एलिनाचे रस्त्यानें बालकन पर्वत उतरून केझनलिक येथें जावें आणि तंजाव्हयाली नांवाचा प्रांत आपले ताब्यांत घ्यावा असें होतें. याज बरोबर सहा बटालियन पायदळ व ४ पल्टणी घोडेस्वार होते. हें सर्व सैन्य एलिनावर धाडून गुर्को थोडे स्वार घेऊन आस्मान बाझार गांवावर गेला. तेथें तुर्कांचें ६००० सैन्य होतें. त्या सैन्याची व गुर्कोच्या स्वारांची थोडी लढाई झाली. त्यांत स्वारांचा पराभव झाला. हें पाहून त्या सैन्यावर नजर ठेवण्या साठीं गुर्कोनें तेथें थोडे स्वार ठेवून आपण आपल्या मुख्य सैन्यास एलिना येथें जाऊन मिळाला, आणि त्यानें बालकन पर्वताकडे सैन्य चालविलें. तंजाव्हयाली प्रांतांत जाण्यास बालकन पर्वतावर तीन रस्ते आहेत; यामुळें त्यानें आपल्या सैन्याच्या तीन टोळ्या केल्या. हेनकोईचे रस्त्यानें जी टोळी गेली त्या बरोबर जनरल गुर्को होता. हा रस्ता मोठा कठीण होता. या वरून पांखरास देखील जातां येत नाहीं असा तुर्क लोकांचा समज असल्यामुळें त्यांनीं त्या वाटेवर मुळींच कांहीं सैन्य ठेविलें नव्हतें. १४ वे तारखेस तुर्क सैन्याचे एका टोळीनें रशियन सैन्यास पाहिलें परंतु शत्रु बालकन पर्वत ओलांडून अलीकडे आला हें पाहून ते भ्याले आणि पळून गेले. ही बातमी चोहोंकडे पसरल्या बरोबर आक्रामी गांवाजवळ तुर्क अधिकाऱ्यानें आपलें सैन्य जमा केलें. १६ वे तारखेस याची

व रशियन सैन्याची लढाई झाली त्यांत तुर्क सैन्याचा पराभव होऊन ते पळून गेले. १७ वे तारखेस गुर्कोनें केझनलिक गांव घेतलें. हें गांव शिपका घाटाचे तोंडाजवळ आहे. तें गांव घेण्याचें कारण त्या वाटेनें एक टोळी यावयाची होती. या घाटांत बरेंच तुर्क सैन्य होतें. या ठिकाणीं दोन दिवस लढाई झाल्यावर तुर्क सैन्य मागें सरलें.

बालकन पर्वत ओलांडून रशियन सैन्य आल्याची बातमी कान्स्टांटिनोपल शहरीं गेल्यावर तेथें मोठी गडबड झाली. करीमपाशास सेनापतीचे जाग्यावरून काढून त्याचे जागीं महमद अलीपाशास नेमिलें. सुलीमानपाशा मान्टनिग्रोचे सैन्याबरोबर लढत होता त्यास माघारीं बोलावून बालकन पर्वताचे आलीकडे जें सैन्य जमा झालें होतें त्यावर त्यांस मुख्य अधिकारी नेमिलें. सुलीमानपाशा आद्रियानोपल येथें गेल्यावर त्यानें चोहोंकडचें सैन्य तेथें जमा केलें, आणि मग गुर्कोचे सैन्यावर चाल केली. हा सरदार मोठा साध्या स्वभावाचा आहे. हा शिपाई लोकांमध्यें नेहमीं मिळून राहतो यामुळें शिपायांची यावर मोठी भक्ति आहे.

जनरल गुर्कोनें आपल्या सैन्याच्या तीन टोळ्या केल्या होत्या. त्यांतील उजवे टोळींत २ पायदळ पल्टणी, ३ पलटणी स्वार आणि २ बातरी तोफा होत्या. ज्या टोळीवर स्वतः गुर्को अधिकारी होता त्यांत १ ब्रिगेड पायदळ, १ पलटण स्वार आणि ४ बातरी तोफा होत्या. डावे टोळींत ९ बटालियन पायदळ, २ बातरी तोफा आणि कांहीं स्वार होते. या तिन्ही टोळ्यांनीं तीन रस्त्यानीं येऊन एस्कीझाग्रावर जमावें असा बेत होता. २९ वे तारखेस जनरल गुर्को केझनलिक सोडून नेमलेले ठिकाणीं जावयास निघाला. ३० वे तारखेस एनीझाग्रा येथें त्याची व तुर्क सैन्याची गांठ पडली. तेथें तुर्क सैन्यास रशियनांनीं संगीनीनें भोसकून हाकून लाविलें. इतक्यांत उजवे टोळीस शत्रूनें गांठिलें आहे व ती टोळी मोठ्या संकटांत आहे अशी बातमी त्यास लागली. तो लागलीच त्या टोळीचे मदतीस निघाला. वाटेंत त्याला ३० हजार तुर्क सैन्य भेटलें. या सैन्यानें गुर्कोचे सैन्यास नाहींसेंच केलें असतें परंतु आयतेवेळेस उजव्या टोळींतील सैन्य त्यास येऊन मिळालें

यामुळें त्यास पळून जाण्याची सोय झाली. डाव्या भागाचा एस्कीशा- ग्रावर तुर्क सैन्यानें अगदीं पराभव केला. आपल्या तिन्ही टोळ्यास तुर्क सैन्यानें गांठिलें हें पाहून गुर्को हेनकोईचे घाटांतून निघून गेला. सुमारें पांच हजार शिपाई मरून याचे सैन्याची मोठी दशा उडाली.

डान्यूब नदीचे कांठीं विडन ह्मणून एक तटबंदी गांव आहे. तेथें ५०,००० तुर्क सैन्य होतें. त्यावर उस्मानपाशा मुख्य अधिकारी होता. निकोपोलिस शहरावर रशियन सैन्यानें हल्ला केल्याची बातमी ऐकून तेथील आपले सैन्यास मदत करण्यासाठीं कांहीं सैन्य घेऊन तो विडन सोडून निघाला. वाटेंत प्लेवनागांव रशियन लोकांनीं घेतल्याची बातमी ऐकून त्यानें आपले सैन्यापैकीं एका टोळीस तिकडे पाठवून तेथून शत्रूस हाकून दिलें. यावेळेस याबरोबर फक्त ८००० सैन्य होतें. निकोपोलिस येथील सैन्याचा रशियन सैन्यानें पाडाव केला हें ऐकून मुक्काम करण्यासाठीं तोहि प्लेवना गांवाकडे गेला. जुलैचे १९ वे तारखेस शत्रूचे एका टोळीनें येऊन त्यावर पुन्हा हल्ला केला; परंतु तिचाही उस्मानपाशानें पराभव केला. दुसरे दिवशीं ६००० रशियन शिपाई त्या टोळीचे मदतीस आले. उस्मानपाशानेंही विडन येथून १२००० शिपाई मदतीस आणिले. ही बातमी रशियन सरदारांस कळली नाहीं. २० वे तारखेचे लढाईंत उस्मानपाशानें शत्रूचा बराच नाश केला. याच रात्रीस रशियन अधिकाऱ्यानें पुनः ३०००सैन्याची कुमक आणली. २१वे तारखेचे लढाईत तर तुर्क सैन्यानें रशियन सैन्यास पळवून लाविलें. पुढें चाल करून जावयाचें सोडून उस्मानपाशा प्लेवना येथेंच ठाणें धरून बसला. या कारणानें रशियन लोकांस फुरसत सांपडून त्यांनीं प्लेवनाजवळ पुष्कळ सैन्य जमविण्याची तजवीज केली. याशिवाय रुमानियाचे राजानेंही आपलें सैन्य मदतीस पाठविलें. जुलैचे २६ वे तारखेस उस्मानपाशानें लोफचा नांवाचा गांव दोन दिवस लढाई करून घेतला. अशा प्रकारें हळू हळू प्लेवना भोंवतालीं जीं उंच ठिकाणें होतीं तीं सर्व त्यानें आपल्या तांब्यांत घेतलीं.

प्लेवनाकडील बाजूस रशियन लोकांच्या तिसऱ्या भागचें सैन्य होतेंच. त्यांच्या मदतीस दुसऱ्या भागांतील सैन्य आणविलें तें असें:—अरमान-

बाझारजवळ ११ वी कोर होती, त्यावर जनरल शाहोफस्कोय होता; त्यास दोन ब्रिगेड तेथें ठेवून बाकीचें सैन्य घेऊन प्लेवनावर जाण्याचा हुकूम झाला. सिमनिझा येथून १२ वी कोर आणविली.

इतक्या वेळांत सोफाया शहराकडून उस्मानपाशासही सैन्याची मदत आली. त्याजवळ एकंदर ३५००० सैन्य जमलें. त्याचे सैन्याचा तळ प्लेवनाचे पुढले बाजूस घोड्याचे खुराप्रमाणें होता. त्या खुराच्या दोन्ही बाजू विद नदीपर्यंत होत्या. ही नदी प्लेवनाचे पश्चिम बाजूस आहे. जनरल शाहोफस्कोय यानें जनरल स्कोबेलाफ याजबरोबर कांहीं स्वार देऊन त्यास लोफचा गांवावर जाण्याचा हुकूम दिला. तिकडेही तुर्क सैन्य असल्याची बातमी आल्यावर ३१ वे तारखेस सर्व सैन्यानें एकदम हल्ला करावा असा रशियन सरदारांनीं बेत केला. या ठिकाणीं रशियन लोकांचे ३२००० पायदळ, १६० तोफा व स्वारांच्या ३ ब्रिगेड होत्या. उजव्या बाजूवर क्रुडेनर व डाव्या बाजूवर शाहोफस्कोय अधिकारी होते. पहाटेस ४ वाजतां हल्ला करण्याचा विचार होता परंतु अघले रात्रीं पाऊस पडला होता यामुळें उजाडे पर्यंत हल्ला करितां आला नाहीं. सकाळीं ९ वाजतां डाव्या बाजूचे सैन्यानें ग्राविका खेड्याजवळ लढाईस आरंभ केला. या सैन्याचे डावे भागानें राडीसोवावर हल्ला केला. उजव्या भागानें पेलीस्याट गांवावर चाल केली आणि स्वारांनीं लोफचा कडील रस्ता अडवून धरिला. रशियन सैन्यानें राडीसोवा गांव घेऊन त्याचे पलीकडचे बाजुस तुर्क सैन्याचें ठाणें होतें त्यावर हल्ला केला. एक वाजे पर्यंत एकसारखा तोफांचा मारा करून नंतर रशियन सरदारानें आपलें पायदळ पुढें घातलें दोन्ही पक्षांकडील शिपाई अगदीं कसून लढले. रशियन सैन्यानें तुर्क सैन्याची पहिली व दुसरी बचावाची जागा घेतली, आणि तिसरी जागा घेण्याचे वेळेस तुर्क सैन्यास कुमक आली तेणेंकरून रशियन सैन्याची मोठी कत्तल उडाली. पेलीस्याटवर गेलेले सैन्यानें थेट प्लेवनाचा रस्ता रोखून चाल केली. ती टोळी प्लेवना गांवांत शिरलीच असती परंतु त्यावर तुर्कांनीं एकाएकी असा मारा केला कीं त्यांस पळून जाणें भाग पडलें. लोफचा कडील रस्ता अडविण्यास जे

स्वार पाठविले होते त्यांचीही हीच दशा झाली. उजव्या भागचें सैन्यानें एक दोन वेळ हल्ला करून पाहिला परंतु तुर्क लोकांचा जबरदस्त मारा बसूं लागल्यामुळें त्यांनीं हल्ला करण्याचें सोडून दिलें. संध्याकाळचे सुमारास सर्वच रशियन सैन्य माघारीं आपल्या तळावर आलें. त्यांच्या पाठोपाठ येऊन तुर्क सैन्यानें पुन: आपल्या पहिल्या जागा धरिल्या. एकट्या शाहोफस्कायचे सैन्यांतील पांच हजार शिपाई मारले गेले. एकंदर १०,००० शिपाई तुर्क लोकांनीं या ठिकाणीं एका दिवसांत जाया केले.

या लढाईंत रशियन सैन्याची इतकी दशा उडाली कीं राडीसोवा येथें पहाऱ्यावर १५० शिपाई ठेवावयाचे होते तर कित्येक पलटणी एकत्र केल्या तेव्हां १५०शिपायांची भरती झाली. रणभूमीवर पडलेलीं प्रेतें उचलण्यास भीतीमुळें कोणी जाईनात. जनरल शाहोफस्काय आणि त्या बरोबरचीं मंडळी एका शेतांत निजली होती तेथें एकाएकीं गडबड झाल्यामुळें ते तेथून पळून आपल्या तळांत गेले. दुसरे दिवशीं शोधा अंतीं असें कळून आलें कीं, राडीसोवा येथें जे जखमी शिपाई पडले होते त्यास बाशीबुझूक नांवाचे तुर्क सैन्यानें लुटून नेलें यामुळें गडबड झाली होती. बाशीबुझूक लोक जखमी झालेले शत्रूचे शिपायास मारून टाकीत हा मोठा अन्याय करीत असत.

लोफचा कडील पहाणी करण्यास जनरल स्कोबेलेफ ५ बटालियन पायदळ, एक ब्रिगेडस्वार आणि २ बातरी तोफा घेऊन आगष्टचे ३ रे तारखेस निघाला. त्याची व तुर्क सैन्याची थोडीशी लढाई झाली. त्यांतच त्याला समजून आलें कीं त्या ठिकाणीं तुर्क सैन्यावर हल्ला करण्यास जाणें ह्मणजे मृत्यूचे मुखांत उडी घालणें होय. दोनवेळ त्या सरदारासच गोळी लागून मरणाची वेळ आली होती; परंतु दैवयोगानें दोन्ही वेळेस त्याचा घोडा व बरोबरचे तीन स्वार मात्र मेले गेले. तेथून त्यानें आपलें सैन्य युक्तीनेंच परत आणिलें. हा एवढा मोठा पराभव झाल्यामुळें रशियन सैन्याची हल्ला करण्याची धडाडी मोडली आणि त्यांस आपला बचाव करीत बसावें लागलें.

रुमानियाचे राजास मोठेपणा देण्यासाठीं त्यास प्लेवना येथील सर्व सैन्यावर मुख्य अधिकारी नेमिलें व त्याचें सर्व सैन्य तेथें आणविलें. प्लेवनाचे अग्नये दिशेस पालीसेट म्हणून गांव आहे. तेथें रशियन लोकांनीं एक रिडाउट बांधिला होता त्यावर आगष्टचे ३१ वे तारखेस उस्मान पाशानें हल्ला केला. सकाळचे ६ वाजल्या पासून संध्याकाळचे ४ वाजे पर्यंत मोठी निकराची लढाई झाली. त्यांत एकवेळ तुर्क सैन्यानें तो रिडाउट घेतला व पुन्हा रशियन सैन्यानें तो परत घेतला.

लोफचा गांव प्लेवनाचे दक्षिणेस २० मैलावर उस्मानदीचे कांठीं आहे. येथून एक रस्ता प्लेवना वरून निकोपोलीसकडे जातो, दुसरा सेल्वी, गाब्रोवा व टिरनोवाकडे जातो. सप्टेंबर महिन्याचे २ रे तारखेस हें गांव घेण्याचा रशियन सरदारांनीं गुप्त रीतीनें बेत केला. हें गांव तुर्क लोकांचे हातीं असल्यानें त्यांस दक्षिणे कडून वरचेवर मदत होत असे. तेथें ७,००० तुर्क शिपाई होते. ३ रे तारखेस २२,००० रशियन सैन्यानें त्यावर हल्ला केला. एक-सारखी संध्याकळचे ४ वाजे पर्यंत मोठी निकराची लढाई झाली. शेवटीं तुर्क शिपायांस तें गांव सोडून पळून जावें लागलें. दुसरे दिवशीं तें गांव परत घेण्यासाठीं उस्मान पाशानें आपलें सैन्य पाठविलें, परंतु प्लेवनाचे पुढलें बाजूस शत्रूनें हल्ला केल्यामुळें त्यास तें सैन्य परत आणावें लागलें. प्लेवना भोंवताली रशियन लोकांचे ८८००० पायदळ, १०००० स्वार आणि २५० तोफा जमल्या होत्या. त्यांनीं आपल्या सैन्याची व्यवस्था केली तीः—पूर्वेस ५ मैलावर ग्रावीका म्हणून खेडें आहे. तेथें तुर्क लोकांनीं पुष्कळ रिडाउट बांधून ठेवले होते, त्याचेसमोर त्यांनीं आपल्या सैन्याचा मध्य आणिला. उजव्या भागांत रुमानियाचे सैन्य घालून त्यास ईशान्य दिशेस ठेविलें. डावा भाग लोफचा गांवाकडे ठेविला. अशा प्रकारें व्यवस्था करून चोहोंकडून एकदम हल्ला करण्याचा बेत केला. सप्टेंबरचे ७ वे तारखेस त्यांनीं हल्ला केला. ही लढाई पाहण्यास रशियाचा बादशहा रणभूमीवर आला होता. संध्याकाळपर्यंत दोन्हीं पक्षांकडून सारखा तोफांचा मारा चा-

लेला होता. दुसरे दिवशींही तोफांचाच मारा झाला. ज्या रीतीनें रशियन लोक लढतील त्या रीतीनें त्यांबरोबर लढण्यास तुर्क लोक नेहमी तयारच होते. तोफांचे योगानें रिडाउटचा जो कांहीं नाश होई तो तुर्क लोक रात्रींतून नीट करून घेईत. दुसरे दिवशीं शत्रूची एक टोळी पुढें चाल करून आली होती. तीस तुर्क लोकांनीं माघारी पळवून लाविलें. या टोळीस मागून मदत आली ह्मणून ती टोळी पुन्हा शत्रूवर उलटली; परंतु संध्याकाळ झाला व धुरामुळें फारच काळोख पडला यास्तव ते सर्वच लोक परत फिरले. या दिवशीं प्लेवनाचे दक्षिण बाजूचा एक रिडाउट रशियन लोकांचे हातीं लागला ह्मणून दुसरे दिवशीं हल्ला करण्याचे धैर्य त्यांस आलें. सर्व रात्र तेथून प्लेवनावर मारा चालला होता. ९ वे तारखेस उजवे व मधलें बाजूचें सैन्य प्लेवनाचे जवळ जवळ गेले. यांचे व तुर्क सैन्याचेमध्यें एक दरड मात्र राहिली होती. उस्मानपाशानें प्लेवनाचे भोंवताली चोहोंकडे रिडाउट बांधिले होते; तेणेंकरून प्लेवना गांव ह्मणजे एक उत्तम प्रकारचा किल्लाच झाला होता. फक्त राडीसोवोकडील बाजूस फारसा बचाव केलेला नव्हता. ९ वे तारखेस तुर्क लोकांचा एक लहानसा दारूखाना उडाला. याच वेळेस राडिसोवोजवळ एक उंच टेकडी होती ती रशियन लोकांनीं घेतली. ११ वे तारखेस मोठा हल्ला करावयाचा बेत करून १० वे तारखेस रशियन लोकांनीं मोठी तयारी करून ठेविली. ११ वे तारखेस सकाळीं पाऊस पडत होता यामुळें कांहींच दिसेनासें झालें. त्यांत तोफा दोहींकडून चालल्या होत्या त्यांच्या धुरानें तर फारच काळोख झाला. ११ वाजण्याचे सुमारास राडीसोवोचे डावीकडे बंदुकीचे बार होऊं लागले. हे बार ज्या बाजूस होत होते त्या बाजूस तुर्क लोकांनीं हळूं हळूं तोफा सोडण्यास आरंभ केला. क्रिशाईन व ग्रिवीका येथील रिडाउटवर हल्ला करण्याचा बेत होता. क्रिशाईनचे बाजूस रशियन व ग्रिवीकाचे बाजूस रुमानियाचे सैन्य होतें. संध्याकाळचे आंत प्लेवना गांव घेण्याचा रशियन लोकांनीं निश्चय केला. तीन वाजण्याचे सुमारास रशियन लोकांनीं पुढें चाल केली. यावर तुर्कांनीं मोठा जबरदस्त मारा जागचे जागीं उभे राहूनच

केला; व शेंकडों रशियन शिपाई जाया केले; तथापि रशियन लोक तुर्क लोक जेथें उभे होते तेथपर्यंत गेले, आणि संगिनीनें भोसकून सुमारें १०।१२ पावलें तुर्क लोकांस मागें सारिलें. हें पाहून तुर्क लोक फार चवताळले आणि त्यांनीं रशियन लोकांवर असा मारा केला कीं, त्यांस पळवात आपले गोटांत नेऊन पोहोंचविलें. आंधार पडल्यावर पुन्हा रशियन लोक पुढें चाल करून आले परंतु पाव तासाचे आंत पुन्हा त्यांस तुर्क लोकांनीं पळविलें. रात्रीचे नऊ वाजेपर्यंत रशियन बादशहा रणभूमीवर होता. प्लेवना गांवाचेजवळ राडिसोमाचे बाजूस एक रिडाउट होता. त्यावर रशियन सैन्याचे दुसऱ्या टोळीनें तीन वाजण्याचे सुमारास तोफांचा मारा सुरू केला. तो एकसारखा दोन तास चालला होता. पांच वाजतां थोडा वारा सुटला तेणेंकरून सर्व धुकें व धूर नाहींसा झाला नंतर एका शेतांत रशियन टोळी लपून बसली होती ती धावून रिडाउटवर गेली. या टोळीस तुर्क लोकांनीं रिडाउटचे जवळ येऊं दिलें. नंतर जसा एखादा पाण्याचा लोंढा येतो असा रिडाउट मधून तुर्कांनीं गोळ्यांचा लोंढा सोडिला. यांत पुष्कळ रशियन शिपाई पडले. तथापि ते रिडाउटचे पुढल्या ओल्यापर्यंत जाऊन पोहोंचले. आणखी एक वेळ ते पुढें धाऊन गेले असते तर खचीत त्यांच हातीं तो रिडाउट लागला असता; आणि त्यांस जय मिळाला असता, परंतु तसें कांहींच झालें नाहीं. यामुळें त्या शिपायांचें शौर्य व्यर्थ गेलें व शेंकडों शिपाई निरर्थक मेले ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. पुढें धावा करण्यास त्यांस सैन्याची मदत पाहिजे होती. जशी पाण्याची लाट मागें लाट येते आणि पुढचा पदार्थ साहजिक पुढें जातो त्याप्रमाणें झालें असतें. हें सैन्य परत माघारी फिरल्यावर फक्त दोन बटालियन पायदळ मदतीस आलें. त्या सर्वांनीं माघारी फिरून पुन्हा चाल केली, परंतु त्यांस एका क्षणांत तुर्कांनीं पळवून लाविलें.

ग्राविका जवळचे रिडाउटवर रुमानियन सैन्यानें अडीच वाजण्याचे सुमारास चाल केली. त्यांचे मदतीस थोडे रशियन सैन्यही आलें होतें. पुढें चाल करून जाण्याचे अगोदर रुमानियाचे राजानें आपले सैन्यास उपदेश केला तो:—"शूर शिपायांनो, स्वतंत्रता मिळविण्यासाठीं आप-

णास आतां लढावयाचें आहे. जर या लढाईंत तुर्क लोकांस जय मिळाला तर मग आपली व आपल्या देशाची काय दशा होईल हें मनांत आणा. ते आपल्या देशावर स्वारी करून सर्व देश उध्वस्त करतील. मग आपणास नेहमीं परतंत्र राहावें लागेल. परतंत्र होऊन जिवंत राहण्यापेक्षां लढून सर्वांनीं प्राण द्यावेत यांतच कीर्ति आहे. तुह्मी यश मिळविल्यास युरोप खंडांतील पराक्रमी राष्ट्रांमध्यें तुमची गणना होऊन तुह्मी चिरकाल स्वतंत्र रीतीनें राज्य कराल यांत संशय नाहीं. तुह्मी स्वतंत्र व्हावें अशीच रशियन बादशहाची इच्छा आहे. व ह्मणूनच त्यानें आपलें सैन्य माझ्या हाताखालीं तुमचे मदतीस्तव दिलें आहे. स्वतंत्र झालों आह्मीं असें समजून लढाईस चला आणि यश संपादन केल्याशिवाय माघारीं येऊं नका." यानें सैन्याच्या तीन ओळी केल्या होत्या. पहिले ओळींतील लोकांनीं बार न काढतां धांवत जाऊन रिडाउट पुढचा खंदक भरून काढावा आणि तटास शिड्या लावाव्या. दुसऱ्या दोन ओळींतील लोकांनीं एका मागून एकांनीं धावा करावा असा बेत होता. पहिला हल्ला तर लागलीच तुर्कांनीं परत फिरविला. दुसरा हल्ला साडेपांच वाजतां झाला त्यांत पहिला रिडाउट त्यांच्या हातीं लागला, परंतु तो लागलीच तुर्कांनीं परत घेतला. तिसऱ्या हल्ल्याचे वेळेस तो रिडाउट, ४ तोफा व एक निशाण त्या लोकांचे हातीं लागलें. एवढें यश संपादन करून घेण्यास मोठें नुकसान सोसावें लागलें. 'रणभूमीवर प्रेतांचे ढीगचेढीग पडले होते. त्यांत कित्येक जखमी झालेले जिवंत शिपाईही पडले होते. तुर्क लोकांचा सारखा मारा चालला होता यामुळें त्यांस उचलून नेण्याचें कोणास धैर्य झालें नाहीं. या रिडाउटचे उत्तरेस २५० यार्डावर दुसरा एक रिडाउट होता तेथून तुर्क लोकांनीं मारा चालविला होता. एकंदरींत तुर्क लोकांनीं प्लेवना भोंवतीं जे कांहीं रिडाउट बांधिले होते ते अशा खुबीनें तयार केले होते कीं पुढचा रिडाउट शत्रूचे हातीं लागल्यास त्यावर त्याच्या मागच्या रिडाउटचा मारा व्हावा ह्मणजे शत्रूस एक रिडाउट घेऊन कांहींच फायदा होऊं नये. अशा रिडाउटच्या एकामागें एक तीन ओळी करून ठेविल्या होत्या.

त्याच दिवशीं सोफायाचे रस्त्यावर एक रिडाउट उस्मानपाशानें केला होता त्यावर स्कोबेलेफच्या तुकडीनें हल्ला केला. त्यांवर तुर्कांनीं रक्तमांसाचे शरीरास कधीं सोसवला जाणार नाहीं असा मारा केला. पुढें जे शत्रूचे शिपाई आले होते त्यांच्या शरीरांच्या चाळण्या झाल्या. इतकें झालें तरी ‘ पुढें चला ’ असें स्कोबेलेफ आपल्या सैन्यांत ओरडतच होता. गोळी लागली नाहीं असा एक शिपाई त्याचे तुकडींत राहिला नव्हता. दोन वेळ तर त्या सरदाराचे घोड्याला गोळी लागून तो खालीं पडला होता तरी पायींच शिपायांस धीर देत पुढें धावत होता. तो रिडाउट केवळ धूर आणि ज्वाळरूप बनला होता. तेथून लांब तोंडांच्या तोफा व प्राणघातक बंदुकी यांच्या किंकाळ्या, विरांचा जयघोष आणि जखमी लोकांचा विलाप या सर्वांचा एकच कल्लोळ तेथें झाला होता. एखाद्या भयंकर वादळाप्रमाणें त्यांनीं धावून तुर्कांवर उड्या घातल्या आणि त्यांस मारून टाकिलें. अशा रीतीनें संध्याकाळचे सुमारास त्यानें तो रिडाउट घेतला. या हल्ल्यांत त्याचे २०००लोक मेले व जाया झाले. दुसरे दिवशीं या रिडाउटवर तुर्कांनीं सहावेळ हल्ला करून तीन हजार रशियन शिपाई मारून तो रिडाउट परत घेतला. या वेळेस स्कोबेलेफ रागानें अगदीं वेडा झाला होता. त्याची तरवार मोडली होती. ओरडून ओरडून त्याचा घसा बसला होता. त्याचे अंगावरचे कापडे धुरानें व दारूनें काळे झाले होते; व जागोजाग चिखलानें भरले होते. त्याचे डोळे रक्तासारखे लाल झाले होते. व त्याचे अंगावरची वीर भुषणें वाकडीं तीकडीं झालीं होतीं. एवढी चोहोंबाजूस लढाई करून व एकंदर प्लेवनाचे भोंवतीं २०००० शिपाई बळी देऊन एक ग्राविका जवळचा रिडाउट मात्र रशियन लोकांचे हातीं लागला.

याच वेळेस उस्मानपाशास सामानाचा पुरवठा आला. त्या सामानाचे गाड्यांवर शत्रूचे घोडेस्वारांनीं हल्ला केला; परंतु त्या सामानाबरोबर जें सैन्य होतें त्यांनीं पुढून व उस्मानपाशानें मागून हल्ला केल्यामुळें शत्रूस पळून जावें लागलें. २१ वे तारखेस

दुसरा पुरवठा आला. त्यास ही रशियनांच्यानें अडवलें नाहीं. असें रशियन सरदार अगदीं गोंधळून गेल्या सारखे झाले होते.

या वेळेस लंडन येथील पोलिश लोकांच्या मंडळीनें बलगेरियन लोकांस पत्र लिहिलें तें:—

"भावांनो; रशियन लोकांचे बोलण्यावर विश्वास ठेवालतर नाश पावाल. तुह्मांप्रमाणेंच पोलस लोकांस ही रशियनांनीं वचन दिलें होतें. त्यांस रशियनांचेस्नेहा पासून केवढा नफा झाला आहे तो पहा ! ! रशियनांचा स्नेह करण्याचे अगोदर पोलस लोक स्वतंत्र होते. आतां त्यांचें स्वातंत्र्य जाऊन त्यांस रशियन लोकांचे फायद्या सांठीं आपला देश, घरें व माणसें सोडून मध्य एशियामध्यें जाऊन रानटी लोकांचे हातून मरावें लागत आहे. पोलस भाषा उत्तम. असून ती रशियनांनीं बंद केली आहे. लहान मुलास रशियन भाषा शिकावी लागते ग्रीक धर्मी लोकांशिवाय दुसरे कोणतेही धर्माचे लोक रशिया देशांत निर्भय नाहींत. तुह्मांसाठीं तुर्कांशीं लढाई चालविली नाहीं, यांत रशियन लोकांचा हेतु कांहीं निराळा आहे. मोल्डावियाचे लोकांपासून जसा बसारेबिया प्रांत घेतला तसा तुह्मांपासून कांहीं प्रांत घेतल्याशिवाय रशियन लोक कधीं राहणार नाहींत. पुढें कांहीं दिवसांनीं तुह्मांस रशियाचे ताबेदार व्हावें लागेल. लष्करांत चाकरी करणें पडूं नये ह्मणून तुम्ही तुर्क सरकारास कर देत होतां तो कर रशियन सरकार तुह्मांस सध्यां माफ करील; परंतु पुढें तुह्मांला रशियनांचे सैन्यांत पंधरा पंधरा वर्षें चाकरी करावी लागेल. आणि ही चाकरी करण्यास सायबेरिया, चीन व मध्य एशियांत जावें लागेल. तुह्मांस रशियन भाषा शिकावी लागेल. तुमची मूळ भाषा बुडून जाईल. तुर्कांचे राज्यांत तुह्मांस कांहीं तरी स्वतंत्रता आहे पण रशियाचे अमलाखालीं गेल्यावर तुमचे स्वप्नांत देखील स्वतंत्रता येणार नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार करून वागा."

आद्रीयानोपल नवळचे सैन्यावर सुलीमानपाशास सेनापती नेमिल्यावर प्रथम त्यानें जनरल गुर्कोस माघारीं घालविलें. नंतर त्यानें एक टोळी हेनकोई घाटाकडे व दुसरी टोळी शिपका घाटाकडे पाठविली. पहि-

ची टोळी पराभव पावून माघारी आली. शिपका घाटाकडे तुर्क सैन्य आले हें पाहून तेथील रशियन अधिकाऱ्यानें तावडतोब मदत मागविली. १९ वे तारखेस शिपका नांवाचें खेडें तुर्कांनीं आपल्या ताब्यांत घेतलें. त्या घाटांत ३००० रशियन शिपाई व ४० तोफा होत्या. त्या सैन्यावर २१ वे तारखेस तुर्कांनीं हल्ला केला. पहिले दिवशीं सेंन्टनिकोलासचे टेकडी पर्यंत ते लोक जाऊन पोहोंचले. दुसरे दिवशीं सांगण्या सारखी जागा कांहीं याचे हातीं लागली नाहीं. तिसरे दिवशीं रशियन लोक अगदीं थकून जाऊन निराश झालें होते व त्यांस तुर्क लोकांनीं मारिलेच असते परंतु त्यांस आयते वेळेस मदत येऊन पोहोंचली यामुळे त्यांचा बचाव झाला. चवथे दिवशीं तुर्कांनीं त्यांवर व त्यांनीं तुर्कांवर असे एका मागून एक चार वेळ हल्ले झाले परंतु कोणासच ह्मणण्या सारखा जय मिळाला नाहीं. त्या घाटाचे उजवे बाजूस एक टेकडी आहे ती तुर्क सैन्याचे स्वाधीन असल्यानें घाटांत जाण्याचा रस्ता त्यांनीं अडविला होता. ती टेंकडी घेण्या साठीं ५ वे दिवशीं रशियन लोकांनीं ४ वेळ हल्ला केला. त्यांनीं ती टेंकडी अगदीं वेढिली होती परंतु प्राण गेला तरी टेंकडी सोडावयाची नाहीं असा तुर्क लोकांचा निश्चय पाहून रशियन सैन्यास परत जावें लागलें. या घाटांत एक सारखी ८ दिवस लढाई चालली होती. या आठ दिवसांत १०० वेळ तुर्क शिपायांनीं शत्रूवर हल्ला केला, आणि ५,००० शिपाई जाया करून घेतले, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं.

उस्मानपाशाप्रमाणें सुलीमानपाशा आपला लौकिक करून घेईल असें त्याच्या स्वभावावरून लोकांस वाटत होतें. आपला इष्ट हेतु सिद्धीस गेला नाहीं हें पाहून सुलीमानपाशास फार वाईट वाटलें. नंतर त्यानें शिपका घाटाजवळ थोडें सैन्य ठेवून बाकीचें सैन्य परत घेतलें; कारण त्यानें शत्रूला काढून देण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केला परंतु त्याचा कांहीं उपाय चालला नाहीं. या लढाईंत तुर्क लोकांपेक्षां रशियन लोकांचा अधिक नाश झाला असावा असा अदमास आहे. सुलीमानपाशानें आपलें सैन्य माघारी घेतलें हें पाहून

रशियन लोकांनीं कामापुरतें सैन्य तेथें ठेवून बाकीचें सैन्य परत पाठविलें.

सुलीमानपाशानें आपलें सैन्य मागें घेतल्यावर रशियन सैन्यानें शिपका घाटाच्या पुढील उंच टेंकड्या आपल्या ताब्यांत घेतल्या. या सैन्याचा मध्य सेंटनिकोलास टेंकडीवर होता. या टेंकडीचे मागें अर्ध्या मैलावर दुसरी टेंकडी होती तेथेंही कांहीं सैन्य ठेविलें होतें. पराभव पावून सैन्य मागें घेतलें होतें तरी सप्टेंबरचे १७ वे तारखेस बाकी राहिलेले सैन्याकडून सुलीमानपाशानें हल्ला करविला. दोन प्रहरपर्यंत जय मिळण्याचें चिन्ह होतें. सेंटनिकोलासचे टेंकडीपर्यंत तुर्क लोक जाऊन पोहोंचले, व ती टेंकडी घेतल्याबद्दल सुलीमानपाशानें आपले सुलतानास तार देखील केली. दोन प्रहरानंतर तीन बाजूकडून रशियन सैन्यानें असा मारा केला कीं तुर्क लोकांस ती टेंकडी सोडून पळून जाणें भाग पडलें. या लढाईंत सुमारें एक हजार तुर्क शिपाई जाया झाले. त्या रात्रीं वारा फार सुटला होता आणि तेणेंकरून रानांमध्यें झाडांचे वगैरे मोठमोठाले शब्द होत होते. ते ऐकून शत्रु आला असा भास होऊन तुर्क सैन्य पळून जाण्याचे बेतात होते इतक्यांत ताबडतोब बंदोबस्त केल्यामुळें एक तासानंतर शिपाई लोक स्वस्थ झाले.

शिपका घाटांत लढाई चालली होती तेव्हेळेस महमदअल्लीपाशा शत्रूचे मागें येऊन त्यावर हल्ला करील असें बहुत लोकांस वाटत होतें; परंतु तसें त्यांचे हातून घडून आलें नाहीं. त्याचे सैन्याचा मध्य शुमलाचे पश्चिमेस २० मैलावर एस्कीजुमा येथें होता. हें गांव रासग्रड आणि अस्मान बाझार यांचेमध्यें आहे. या सैन्यास अडविण्यास झारउईचच्या हाताखालचें नंबर दोनचें सैन्य तयारच होतें. महमदअल्लीचे सैन्याचे सैन्यरक्षकांवर २० आगष्ट रोजीं शत्रूचे सैन्यानें हल्ला करून त्यांस हाकून दिलें; नंतर हैदरकोई येथूनही त्यांस शत्रूनें हाकून दिलें. सकाळीं सहा वाजतां रशियनांनीं तोफांचा मारा सुरू केला. तो मारा लागलीच तुर्कांनीं बंद पाडून ती जागा घेतली. ती जागा परत घेण्यासाठीं २३ वे तारखेस संध्याकाळीं रशियनांनीं तोफा मारणें सुरू

केलें. नंतर रात्रीं आठ वाजण्याचे सुमारास त्यांनीं आपलें पायदळ पुढें घातलें. तुर्क शिपाई बंदुकीस संगिनी चढवून त्या पायदळाची वाट पाहातच होते. संगिनी भोसकून त्यांनीं शत्रूस माघारी फिरविलें. असें चार वेळ झालें. उजाडल्यावर रशियन लोकांनीं ती जागा घेतली. २४ वे तारखेस तुर्क सैन्यास कुमक आली. नंतर त्यांनीं शत्रूवर चाल करून ती जागा परत घेतली. ह्या वेळेस ६ तोफा व पुष्कळ सामान तुर्क लोकांचे हातीं लागलें. नंतर कांहीं दिवसपर्यंत दोन्हीं सैन्यें एकमेकास भिऊन चीप राहिलीं होतीं. काराहसनकोई येथें रशियन लोकांच्या ९०० स्वारांची टोळी होती. या टोळीचेजवळच रासग्रेडचे आसपास शत्रूचें सैन्य असल्यामुळे तिचे मदतीस ३००० पायदळ पाठविलें. या सैन्यावर हल्ला करण्यासाठीं महमदअलीनें नजीबपाशा बरोबर कांहीं सैन्य देऊन त्यास काराहसनकोईवर पाठविलें; व याचे मदतीस पाठोपाठ सालीपाशास पाठविलें. तुर्क लोकांचे स्वार प्रथम शत्रूचे नजरेस पडले. त्यावर शत्रु मारा करीत आहे इतक्यांत जमिनींतून निघाल्याप्रमाणें चोहोंकडे तुर्क शिपाईच दिसूं लागले. सुमारें ६ तास लढाई झाल्यावर संध्याकाळचे ४ वाजतां रशियन सैन्याची पळापळ झाली. शत्रूस कोणीकडून मदत येऊ नये ह्मणून हैदराकोई खेड्याजवळ जें सैन्य होतें त्यावरही तुर्क लोकांनीं हल्ला केला. १ तोफ, ४ दारूगोळ्यांच्या गाड्या, २००० बंदुका, २००० आंगराखे व पुष्कळ सामान तुर्क लोकांचे हातीं लागलें. या लढाईंत बेकरपाशानें मोठी बहार केली. सेप्टेंबरचे ५ वे तारखेस काझेलवो येथें पुन्हा तुर्कांनीं शत्रूचा पराभव केला. अशा प्रकारें रशियन सैन्यास लोम नदीचे मागें हटविलें. याच वेळेस रश्चक किल्ल्यांतील सैन्यानें बाहेर येऊन डाब्रूशा प्रांतांतील रशियन सैन्यावर काडीकोई येथें हल्ला करून त्यांस तेथून हाकून लाविलें. दुसरे दिवशीं डान्यूब नदीवरचा पिरगास येथील पूल अडवून धरिला.

झारउईचचें सैन्य मागें हटल्यावर त्यानें आपल्या सैन्याचा मधला भाग बायला व मोन्यास्टीर येथें ठेविला; डावा भाग सिस्टोवा व डान्यूब नदीकडे जाणाऱ्या रस्त्यांवर ठेविला; आणि उजवा भाग उस्मा-

नवाझारापर्यंत पसरून ठेविला. २१ वे तारखेस तुर्क सैन्यानें केरकोई जवळ शत्रूचे सैन्यावर मोठा हल्ला केला, परंतु सैन्य कमी पडल्यामुळें पराभव पावून त्यांस माघारी जावें लागलें. छावणीची जागा वाईट आहे व शत्रूस वरचेवर कुमक येत आहे असें पाहून महमदअल्लीनें आपलें सगळेंच सैन्य मागें घेतलें.

या सैन्यानें उस्मानपाशास सोडवावें व सुलीमानपाशास मदत करावी असा सुलतानाचा हेतु होता. तो परीपूर्ण झाला नाहीं हें पाहून महमदअल्लीस त्या कामावरून काढून त्याचे जागीं सुलीमानपाशास नेमिलें आणि सुलीमानपाशाचे जागीं रूफपाशास नेमिलें. ही गडबड आक्टोबरचे तिसरे तारखेस झाली.

बाल्कन पर्वता कडून जनरल गुर्को माघारी आला, झारउईचचें सैन्यास लोम नदीचे मागें हटावें लागलें, प्लेवना जवळ तर कांहींच उपाय चालेना, अशा प्रकारें आपले स्वारीचा मोड होण्याचा बेत आला हें रशियन बादशहानें पाहून आपले राज्यांतून १,८८,६०० सैन्य नवीन आणविलें. इतके दिवस लढाई करून निकोपोलिसचे किल्लयाशिवाय रशियन लोकांचे हातीं कांहीं लागलें नव्हतें; व सुमारें ५०,००० शिपाई खराब झालें होते. डाब्रूशा प्रांतांतील रशियन सैन्यानें कांहींच काम केलें नाहीं, तथापि तें सैन्य तेथें तसेंच राहूं दिलें.

मांटनिग्रो बरोबर लढाई चाललीच होती. तेथील निकसिक नांवाचा मोठा महत्वाचा किल्ला तुर्क लोकांनीं बरेंच दिवस आपल्या ताब्यांत ठेविला होता. त्याच ठिकाणीं कायती त्या प्रांतीं लढाई चालली होती. तेथील तुर्क सैन्यावर सुलीमानपाशा मुख्य होता तों पर्यंत मांटनिग्रन सैन्याचें कांहीं चाललें नाहीं. त्यास शिपका घाटांतील सैन्यावर नेमिल्या नंतर तुर्क सैन्याचा उत्साह कमी झाल्या सारिखा झाला. तथापि त्यांजवळ दारू गोळा होता तों पर्यंत त्यांनीं तो किल्ला शत्रूचे स्वाधिन केला नाहीं. शेवटीं सेप्टेंबरचे ८.वे तारखेस तेथील सैन्य मांटनिग्रोचे राजास शरण गेलें आणि त्यांनीं तो किल्ला त्यांचे स्वाधिन केला.

आक्टोबर महिन्यांत पावसाळा सुरू झाला. या मुळें रस्त्यांवर चिखल होऊन सैन्य इकडून तिकडें नेण्यास अडचण पडूं लागली. जनावरांस चारा व शिपायांस सरपण मिळेनासें झालें. ज्या प्रांतीं लढाई चालली होती त्या प्रांतांत राहणाऱ्या मुसलमान लोकांची पळापळ होऊन ते सर्व लोक आद्रियानोपल व कान्स्टांटिनोपल या दोन शहरीं व या मधल्या प्रांतांत भरले गेले. या परागंदा झालेल्या लोकांस व जखमी झालेल्या शिपायांस संभाळण्यासाठीं देशोदेशचे लोकांनीं धर्मार्थ पैसे पाठवून त्यांचा सांभाळ करविला. सुलतानानें आपले राजवाड्यापैकीं एक वाडा रिकामा करून या लोकांस राहण्यास दिला होता; आणि आपल्या खाजगत उत्पन्नापैकीं २५००० रुपये त्यांस खर्चण्यास दिले. या वेळेस हिंदुस्थानांतील पुष्कळ लोकांनीं त्या लोकांस पैशाची मदत केली. तथापि शेकडों लोक अन्न पाण्या वांचून मेले व शेकडों लोक ख्रिती लोकांनीं मारिले. मुसलमाना बरोबर यहुदी लोकांचीं ही बरीच दशा उडाली.

प्लेवना सभोंवती कायदेशीर वेढा घातल्याशिवाय उस्मानपाशाचा पाडाव होत नाहीं हें पाहून रशियन बादशाहानें जनरल टाडलबेन यास बोलावून आणून त्याकडे वेढ्याचें काम सोंपविलें. हे जनरल मोठे जगविख्यात इंजनेर आहेत. यांनीं सन १८५६ सालचे क्रिमियाचे लढाईंत सबास्टपूल किल्ल्याचा बचाव करण्यांत मोठी कीर्ति मिळविली आहे. याचप्रमाणें जनरल गुर्कोस सिपका घाटांतून बोलावून आणून त्यास स्वारांवर अधिपती नेमिलें. सप्टेंबरचे २८ वे तारखेस उस्मानपाशास ८० गाड्या भरून सामानाचा पुरवठा आलेला रुमानियाचे सैन्यानें धरिला. १९ आक्टोबर रोजीं ग्रविकाचे दुसरे रिडाउटवर त्या सैन्यानें हल्ला केला, परंतु २० मिनिटांचे आंत तुर्कांनीं त्यांस माघारी पळवून लाविलें.

रशियन लोकांस खरा शत्रु उस्मानपाशा भेटला होता. हा मोठा थंडा पुरुष आहे. कसलेही अकस्मात संकट आलें असतां तो घाबरणारा मनुष्य नाहीं. लढाईचे वेळेस याचे चित्त कधीं व्यग्र झालें नाहीं व यानें कधीं उतावळेपणानें काम केलें नाहीं. हा मोठा थट्टेखोर आहे. लढाईचे वेळेस

देखील तो शिपायांची थट्टा करी. यामुळें शिपायांची त्यावर मोठी भक्ति आहे. याचा हुकूम मोठा कडक आहे. कोणी ह्मणत फ्रान्स देशांतील मार्शलवझेन तो हाच, कोणी ह्मणत स्वतंत्र संस्थानांतून पळून गेलेल्या जनरलपैकीं हा एक आहे. अशा नाना प्रकारच्या बातम्या त्यावेळेस उडाल्या होत्या ; परंतु तें सर्व मिथ्या होतें. हा खरा तुर्क आहे. सन १८२३ सालीं हा एशिया मायनर प्रांतीं जन्मला. यानें कान्स्टांटिनोपल शहरीं विद्याभ्यास केला. हा आपला देश सोडून कधीं बाहेर गेला नाहीं. यास थोडी थोडी फ्रेंच भाषा बोलता येते. हा उंच व सडपातळ आहे. जेथें निकराची लढाई होई तेथें हा आपल्या सैन्याबरोबर असे. हा २तास निजे किंवा फार श्रम झाले तर ३तास निजे. शिपाई जे अन्न खात तेंच अन्न आपण खाई व ते जेथें निजत तेथेंच आपण पडत असे. याजवळ तोफा फार थोड्या होत्या यामुळें कोठें लढाई झाल्यास त्यास इकडच्या तोफा तिकडे न्याव्या लागत. याचा त्यास मोठा त्रास होई आणि यामुळेंच कांहीं कांहीं जागा रशियन लोकांच्या हातीं लागल्या.

१४ आगष्टपासून रशियन बादशहानें गोर्नीस्टोडन या गांवीं मुक्काम केला होता. तारीख ९ आक्टोबर रोजीं सिस्टोवा व निकोपोलिस येथील नावांचे पूल तुफान होऊन वाहून गेले. याचवेळेस रशिया देशांतून इम्पेरियनल गार्ड नांवाचे १०,००० पायदळ, कांहीं स्वार व कांहीं तोफा येऊन दाखल झाल्या. इतकें शत्रूचें सैन्य प्लेवना भोंवतीं असतां ११ आक्टोबर रोजीं शफकेटपाशा उस्मानपाशास जाऊन मिळाला. १३ आक्टोबर रोजीं महमदपाशा नांवाचे सरदारानें रशियनांचीं २०,००० मेंढें, ५०० गुरें व १०० घोडे धरून वेढ्याचे आंत नेले.

प्लेवना जवळील सैन्यास सामानाची किंवा शिपायांची मदत बाहेरून मिळूनये याचा बंदोबस्त करण्यासाठीं स्वार व पायदळ मिळून ३५००० सैन्य देऊन जनरल गुर्कोकडे तें काम दिलें. यानें २४ वे तारखेस गोर्नीडूबनीक जवळचे तुर्कांचे गोठावर हल्ला केला. या गोठावर ६४ तोफांचा मारा चालला होता. तथापि २५००

रशियन शिपाई मारिल्या शिवाय तुर्कांनीं ती जागा रशियन लोकांचे स्वाधिन केली नाहीं. या लढाईंत तुर्कांचा एक पाशा, ७० सरदार व २००० शिपाई पडले. ही लढाई एकसारखी बारा तास चालली होती. गोर्वींडुब्निक रशियन लोकांचे हातीं लागल्यानें वेढा पूर्ण झाला. तुर्क लोकांस मदत येण्यास रस्ता राहिला नाहीं. प्लेवनाः भोंवतालीं रशियन लोकांनीं सैन्य नेण्या आणण्यास रस्ते तयार केले व तारायंत्रे उभीं केलीं. भोंवतालच्या उंच टेकड्या त्यांचे हातीं असल्यानें प्लेवनामध्यें काय चालले आहे हें त्यांस दिसत असे. यामुळें कांहीं बेत करणें झाल्यास उस्मानपाशास रात्रीं किंवा अंधेरांत करावा लागत असे.

जनरल टाडलेबन यानें प्लेवना भोंवतालचे जाग्याचे तुकडे करून सैन्यास वाटून दिले होते. त्या गांवाचे भोंवतालीं एकंदर ४०० तोफा लाविल्या होत्या. या सर्व तोफा अशा ठेवल्या होत्या कीं त्यांचा मारा पाहिजे त्या एका जाग्यावर होत असे.

ज्या दिवशीं गुर्कोनें गोर्वींडुब्निकचा गोठ घेतला तेच दिवशीं इम्पेरियल गार्ड नांवाचे सैन्यानें टेलिच खेड्यावर हल्ला केला. त्यावर तुर्कांनीं असा मारा केला कीं त्यांस पळतां भुई थोडी झाली. या सैन्याची तुर्क लोकांबरोबरची ही पहिलीच लढाई होती, आणि त्यांत अपजय आला हें पाहून त्यांतील सरदार व शिपाई यांस फारच वाईट वाटलें; ह्मणून २८ वे तारखेस पुन्हा हल्ला करून त्यांनीं तें गांव घेतलें. हें गांव घेतल्यापासून उस्मानपाशाचा खास त्या ठिकाणीं पाडाव होतो असें सर्व लोकांस दिसूं लागलें. नोवेंबरचे पहिले तारखेस गुर्कोनें डोलनीडुब्निक येथें तुर्कांचे ६,००० शिपाई होते, त्यांवर चाल केली. तें सैन्य लढाई न करतां प्लेवनाकडे पळून गेले. ९ नोवेंबर रोजीं स्कोबेलेफ यानें रात्रीं हल्ला करून लोफचा गांवाजवळ एक टेकडी होती ती घेतली. या टेकटीवर तुर्कांनीं चार रिडाउट बांधिले होते. शत्रूचें सैन्य १०० यार्डांवर येईपर्यंत त्यास तुर्क शिपायांनीं पाहिलें नाहीं. नंतर एक दोन फेरी केल्या नाहींत तों शत्रु येऊन रिडाउटमध्यें घुसला आणि त्यांनीं संगिनीनें भोसकून तुर्कांस पळवून लाविलें.

ही टेकडी परत घेण्यासाठीं तुर्क सैन्यानें तीन वेळ हल्ला केला परंतु उपयोग झाला नाहीं. नोवेंबरचे १० वे तारखेस गुर्कोनें व्राका खेडें तुर्क लोकांपासून घेतलें. तेथें तुर्क लोकांची बायका पोरें होतीं त्यांस प्लेवनाकडे हाकून दिलें. असें करण्याचें कारण प्लेवनामध्यें पुष्कळ माणसें जमल्यानें धान्यादि सामुग्रीचा तोटा पडेल आणि मग उस्मानपाशाचा पाडाव होईल हें होतें.

प्लेवना भोंवती रशियन सैन्याचा वेढा तीस मैल होता व एकंदर सैन्य १,२०,००० होतें. 'नोवेंबरचे १२ वे तारखेस तुह्मी आह्मांस शरण या' असा निरोप रशियन सरदारांनीं उस्मान पाशास पाठविला. 'संरक्षणाचे मजजवळ जेवढे उपाय आहेत तेवढे अजून संपले नाहींत, व शिपाईगिरी मी अजून तुह्मांस दाखविली नाहीं ती दाखविल्या वर मग शरण येण्याचा विचार करीन.' असा उस्मानपशानें परत निरोप पाठविला.

कार्स शहर घेतल्याची बातमी प्लेवना जवळचे रशियन सैन्यास कळल्या बरोबर ती बातमी कोंडलेले तुर्क सैन्यास कळवावी म्हणून त्यांनीं एक अरसा तयार करून त्यांत आम्ही कार्स शहर व किल्ला घेतला. १०,००० तुर्क शिपाई शरण आले, रशियाचा बादशहा विजयीं असो. हीं वाक्यें मोठमोठ्या अक्षरांनीं लिहिलीं होतीं. तुर्क लोकांस तो अरसा दिवसा ह्मणून एका काठीस बांधून उंच उभा केला होता. आणि त्या भोंवती दिवे लाविले होते. तुर्कांनीं तो अरसा पाहतांच गोळ्या घालून फोडून टाकिला.

रशियन सैन्यानें आपले भोंवती पक्का वेढा घातला हें पाहून उस्मानपाशानेंही आपले रक्षणाचा पक्का बंदोबस्त केला होता. रशियन लोकांचें त्या ठिकाणीं पुष्कळ सैन्य व टाडलबेन, स्कोबेलेफ व गुर्को सारखे पराक्रमी सरदार जमलें होतें, परंतु हल्ला करून उस्मानपाशाचा पाडाव करण्याचे सामर्थ्य त्यांचे आंगीं नव्हतें. याचप्रमाणें शत्रूचा वेढा फोडून बाहेर पडण्याचें सामर्थ्य उस्मानपाशाचे आंगीं राहिलें नव्हते. त्याचे शिपाई एकसारखे चार महिने लढत होते यामुळें अगदीं थकल्यासारखे झाले होते. लढाई करून उस्मानपाशा हातीं लागत

नाहीं हें पाहून त्याचे सैन्यास कोंडून अन्न पाणी मिळेनासें करावें ह्मणजे तें शरण येतील हा रशियन लोकांचा बेत होता. रशियन बादशहाचें मोठें सैन्य एका ठिकाणीं अडवून धरिल्यानें दुसरें सैन्य तयार करून आपल्या मदतीस पाठविण्याची व्यवस्था करण्यास आपल्या सरकारास वेळ मिळेल असें उस्मानपाशाचे मनांत होतें. उस्मानपाशानें या ठिकाणीं शत्रूस अडवून धरिलें ह्मणूनच लढाई इतकी लांबली गेली, नाहीं तर तावडतोब लढाईचा निकाल होण्याची वेळ आली होती.

आक्टोबर महिन्यांत सुलीमानपाशास लोम नदीचे कांठचे सैन्यावर मुख्य अधिकारी नेमिलें; परंतु त्याचेही हातून ह्मणण्यासारखी एकही चांगली लढाई झाली नाहीं. २४ आक्टोबर रोजीं रशियन बादशहाचा भाचा पाहणी करणाऱ्या लोकांबरोबर गेला होता त्यास गोळी लागून तात्काळ तो मरण पावला. हा प्रांत मोठा कठीण आहे. यांत डोंगर, नद्या, दऱ्या वगैरे पुष्कळ असल्यामुळें सुलीमानपाशास चोहोंकडून भय वाटूं लागलें आणि तो आपल्याच बचावाची योजना करीत बसला. २४ आक्टोबर रोजीं काडीकोईवर व दुसरे दिवशीं रश्चकवर रशियन सैन्यानें हल्ला केला, परंतु त्यांचाच पराभव होऊन त्यांस परत माघारी जावें लागलें. सुलीमानपाशानें आपलें सैन्य दक्षिणोत्तर बेलीलोमपासून अस्मानबाझारपर्यंत पसरून ठेविलें होतें. १९ नोवेंबर रोजीं रश्चक किल्ल्यावरील अधिकारी सेलीमपाशा कांहीं सैन्य घेऊन बाहेर पडला आणि पिरगास पासून त्यांनीं शत्रूचे एका टोळीस संगिनीनें भोसकून मेचकाकडे हाकून लाविलें. थोडा वेळ गेल्यावर शत्रूची एक टोळी मेचकाकडे जात होती, तीस पाहून तुर्क सैन्यांतील एका पलटणीनें उगीचचे उगीच पळ काढिला. हें पाहून शत्रु आल्याची हूल होऊन सर्वच सैन्य घाबरून पळालें.

दिसेंबरचे ४ थे तारखेस सुलीमानपाशानें कांहीं सैन्य देऊन रशीद पाशास मारियानीं गांव घेण्यास पाठविलें. त्यानें तें गांवही घेऊन एलीना गांवावर चाल केली. तेथें शत्रूबरोबर एकसारखी तीन प्रहर लढाई करून शत्रूचे ६० सरदार व १८०० शिपाई मारून व ११

तोफा घेऊन एलीना गांवही घेतलें. १२ वे तारखेस तो पुढें चाल करून गेला. त्याची व शत्रूची माचका येथें गांठ पडून लढाई झाली त्यांत त्याचा पराभव झाला. १४ वे तारखेस रशियन लोकांनीं एलीना गांव तुर्कांपासून परत घेतलें.

रशियन सरकारची सरशी होत चालली हें पाहून तुर्कांबरोबर पुनः लढाई करण्याचे सर्वियाचे राजाचे मनांत आलें. दारूगोळा सरहद्दीवर पाठवून सैन्यासही सरहद्दीवर जाण्याचा हुकूम दिला. याचवेळेस बोसनिया देशांतील लोकांनीं पुनः बंड केलें.

तुर्कांमध्यें अतिशय बर्फ पडून थंडी फार पडू लागली यामुळें रशियन लोक परत जातील अशी लोक कल्पना करूं लागले होते; परंतु तसा प्रकार कांहींच दिसून आला नाहीं. उलट लढाई अधिक जोरानें करण्याची तयारी चालविली होती.

उस्मान पाशा सारखा शूर सरदार कचाटींत सांपडला गेला ह्मणून तुर्क सरकार कांहीं निराश होऊन बसलें नाहीं. सोफाया शहरा जवळ सैन्य जमा करण्याचा हुकूम झालाच होता. तेंच सैन्य पुष्कळ वाढवावें ह्मणून १४ नोवेंबर रोजीं गुप्त सभा भरवून मिळेल तितकें सैन्य मिळविण्याचा ठराव केला. अधिकारा वरून काढिल्या दिवसा पासून महमद अलीपाशा रिकामाच होता त्यास त्या सैन्यावर सेनापती नेमिलें; आणि १९ दिवसाचे आत प्लेवना कडें सैन्य चालू करावें असा हुकूम दिला. उस्मानपाशाच्यानें आतां शत्रूचा वेढा फोडून बाहेर पडवत नाहीं व त्या जवळची युद्ध सामुग्री व धान्यादिक फार झालें तर आणखीं एक महिनाभर पुरेल अशी अटकल करून त्या मुदतीचे आंत त्यास सोडविण्यास सैन्य गेलें पाहिजे हें पाहून सदरील हुकूम दिला असावा.

तुर्क सरकारा जवळ जमा होण्या सारखें सैन्य होतें तें:---

पुढलें वर्षीं सैन्यात दाखल होणारे नवीन शिपाई, या नवीन शिपायांची संख्या ४४००० जमली. नंबर २ चे रेडीफ सैन्य जागोंजाग जमा केलें तें येणेंप्रमाणें. शुम्ला जवळ २२००० त्याच प्रांतीं दुसरी कडे २९०००, मोनास्टीर जवळ ३२००० इतकें युरोप

खंडांत होते. एशियांत कारपुत जवळ ८७००, सिवास जवळ ८०००, एर्झरूम जवळ ८७००, कार्स जवळ ६७००, बियाझिद जवळ ७०००, डियारबेकीर जवळ ७०००, सिरिया मध्यें १४०००, बगदाद जवळ १९०००, येमन जवळ ९०००, व दमास्कस जवळ २८००० जमावयाचे होते. हें सगळें सैन्य २४०००० जमावयाचे होतें. यालोकांस एकाएकीं बोलावणें झाल्यामुळें व यांतिल बराच मुलूख शत्रूचे ताब्यांत गेल्यानें सगळे लोक कांहीं मिळाले नाहींत. तथापि फक्त सोफाया जवळ ५०००० सैन्य जमा झालें. या जवळ १५० तोफा होत्या. नोवेंबरचे १५ वे तारखेस हें सैन्य पुढें चालू झालें. ते अर्केनी गांवा पर्यंत येऊन पोहोंचलें. हें वर्तमान प्लेवना जवळ जनरल गुर्कोस लागलें. नोवेंबर २१ रोजीं जनरल गुर्को ३५००० सैन्य घेऊन तुर्क सैन्यास अडविण्यास निघाला. प्रावका व्राजा, एट्रोपोल कामार्ली, आरब कोनाक वगैरे ठिकाणीं लढाया देऊन त्यानें तुर्क सैन्यास परत सोफाया कडे घालविलें.

या वेळेस तुर्क लोकांला साह्य करणारा कोणी नव्हता. जिकडे तिकडे बंडे व लढाया चालू होत्या. ठिकठिकाणचीं सरकारें वरचेवर धमकी देतच होतीं. त्यांचीच प्रजा त्यांवर उठली होती. अशा अडचणी आल्या होत्या तरी सुलतानानें आपलें धैर्य जाऊं दिलें नाहीं. या वेळेस एकानें एका वर्तमान पत्रांत लिहिलें होतें तें:—

' आम्हांवर कोणता प्रसंग येणार हें आम्हांस दिसत आहे. आम्ही आपली अब्रू व देशाभिमान आजपर्यंत संभाळिला. आतां शत्रूस अडथळा करण्याचें कांहीं साधन आम्हाजवळ राहिलें नाहीं. बेअब्रू करून घेण्याचे बदली प्राण देण्यास आम्ही तयार झालों ह्मणून सर्वांनीं आमचा त्याग केला. आमचे सर्व देशांत हाहा:कार झाल्यामुळें शिपाई लढाईस जाईनात. युरोप खंडांतील सर्व राजांच्या फायद्यासाठीं आम्ही लढत आहों. परंतु ते आम्हांस कांहींच मदत करीत नाहींत. शत्रूस शरण जाण्याशिवाय दुसरा कांहींच उपाय राहिला नाहीं. राशियन लोकांस काय पाहिजे हें आम्हांस ठाऊक आहे. बासफरस व डारडेनेल्स रशियन लोकांचे हातीं गेल्यानें आमचे कांहीं

नुकसान नाहीं. आद्रियानोपलवर रशियन आले कीं, आम्ही त्या दोन्ही सामुद्रधुन्या त्यांचे स्वाधीन करूं. आणि रशियन लोकांचे आश्रित होऊन राहूं. आमचा सांभाळ करण्याचें ज्यानीं पत्करलें होतें त्यांच्यावर आतां आमचा विश्वास राहिला नाहीं. रशियन लोकांस जें पाहिजे तें आम्हीं दिल्यास त्यांपासून आम्हांस कांहीं उपद्रव होणार नाहीं. यांत आमचा इजिप्त देश गेला तरी आम्हांस हळहळ वाटणार नाहीं. रशियन सरकारानें जर्मन लोकांस मदत केली म्हणून आम्हास रशियन लोकांचे स्वाधीन करून तो उपकार जर्मन लोक फेडीत आहेत. आमचें राज्य मोडल्यास आस्त्रियासही थोडा देश मिळेल म्हणून या आशेवर आस्त्रियन लोक स्वस्थ बसले आहेत. फ्रेंच लोक बिचारे हतवीर्य झाले आहेत म्हणून त्यांस कांहींच बोलतां येत नाहीं. सर्वांत आम्हास इंग्रज लोकांचा फार राग आला आहे. बासफरसची सामुद्रधुनी रशियन लोकांस देऊं परंतु इंग्रज लोकांस देणार नाहीं. कान्स्टांटिनोपल शहर आपले हातीं येणार नाहीं हें रशियनांस पक्कें ठाऊक आहे. आम्ही त्या शहरास आग लावून जाळून टाकूं पण कोणाचे हातीं देणार नाहीं. आणि त्या जाळाचे उजेडानें एशिया खंडांत निघून जाऊं.

कार्स रशियन लोकांचे हातीं लागल्यावर सर्वांचें लक्ष प्लेवनाकडें लागलें. २१ वे तारखेस प्लेवनाचे वायव्य दिशेस राहोवा गांव आहे तें रुमानियन सैन्यानें घेतलें. महमदअलीचे सैन्यास वरचेवर मदत येत असतां तो मागें हटत चालला आहे हें पाहून त्यास सेनापतीचे जागयावरून काढून त्याचे जागीं चकीरपाशास नेमिलें. अशा प्रकारें एकास काढून दुसऱ्यास नेमण्याची गडबड कान्स्टांटिनोपल शहरांत चालूच होती. कित्येक जुन्या प्रधानास काढून नवे प्रधान नेमिलें. मेहरबानींतील लोकांस मोठमोठ्या जागा मिळाल्या व चांगले चांगले सरदार मागें पडले.

दिसेंबर महिन्यास आरंभ झाल्यापासून उस्मानपाशाचे सैन्यास धान्यादिकांचा तोटा यावयास लागला; व कपडे वगैरे भरपूर नसल्यामुळें थंडीचे योगानें शिपायांचे फार हाल होऊं लागले. या सैन्यास बाहेर

पडतां येऊं नये व बाहेरूनही आंत मदत जाऊं नये असा शत्रूनें कडेकोट बंदोबस्त केला होता. वीदनदीकडे वेढा फोडून गेल्यास पुढें डान्यूबनदी असून डावीकडे व उजवीकडे शत्रूचें सैन्य अडविण्यास तयारच होतें. सोफायाकडील रस्ता रशियन गार्ड नांवाचे सैन्यानें धरिला होता. लोफचाकडे स्कोबेलेफचें सैन्य होतें. कोणतेही बाजूस बाहेर पडून जवळपास कोठें आश्रय किंवा मदत मिळण्याची उस्मान पाशास आशा नव्हती. नोवेंबर महिना सगळा उगीच गेला परंतु दोघांचीही एकमेकांवर चालून जाण्याची छाती झाली नाहीं. बाहेरून आपणास सोडविण्यास कोणी येत नाहीं हें पाहून डिसेंबरचे ७ वे तारखेस त्यानें बाहेर पडण्याचा विचार केला. हा बेत त्याच रात्रीस शत्रूस कळला आणि त्यांनीं आपली तयारी ठेविली. ८ व ९ तारखेस त्यानें कांहीं गडबड केली नाहीं; परंतु ९ वे तारखेस उस्मानपाशानें आपले सैन्यास तीन दिवसांची चंदी व प्रत्येक शिपायास १५० काडतुसें व एक एक वाहनाचा जोड वाटल्याची बातमी एका हेरानें येऊन रशियन सरदारास कळविली. नंतर रात्रीचे १० वाजतां दुसरा हेर आला. त्यानें विदनदीचे पुलाजवळ तुर्क सैन्य जमा होत आहे अशी बातमी दिली. १० वे तारखेस सोमवारीं पाहटेस ३ वाजतां तिसरा हेर आला. त्यानें क्रिशाइन जवळचा रिडाउट सोडून तुर्क लोक गेल्याची बातमी दिली. जी जी जागा तुर्क सैन्य सोडून जाई ती ती जागा रशियन लोक मुकाट्यानें येऊन धरीत. ८ वे तारखेस रात्रीं उस्मानपाशानें आपले सर्व सरदार बोलावून मरावें किंवा सुटून जावें असा विचार ठरविला होता. त्याजजवळ २६००० शिपाई व ६००० गोलंदाज होते. विदनदीकडून बाहेर पडावें आणि विडन किल्ल्याचा आश्रय करावा असा उस्मानपाशाचा बेत होता. ती नदी उतरण्यासाठीं त्यानें ४ नावेचे पूल बांधिले होते. या शिवाय एक पहिलाच दगडी पूल होता. या ५ पुलावरून त्यानें आपलें सैन्य पलीकडे नेलें. याचे सैन्याबरोबर तीन बातरी तोफा व ६०० बैलगाड्या होत्या. प्रथम या गाड्यांचे आश्रयानें सैन्य चाललें होतें. उजाडल्यावर जेव्हां चोंहोकडून एक सारखा तोफांचा दणका

सुरू झाला. तेव्हां गाड्यांचे बैलांची दाणादाण झाली. धुरानें दाही दिशा कोंदून गेल्या. अगोदरच सकाळची वेळ, त्यांत रात्रीस बर्फ पडला होता व धुकें फार पडलें होतें यामुळें हवा अगदीं कुंद होऊन मेली होती. पर्जन्यकाळीं जसा अभाळाचा गडगडाट आणि विजांचा चमचमाट होऊन पाऊस पडतो, याप्रमाणें तोफांचे अवाज हें गडगडणें, बंदुकींतून लाख गोळ्या निघत ते पावसांचे थेंब व तोफ सुटण्याचे वेळेस जो जाळ होतो त्या विजा असा भास होऊन गेला. शत्रु कोठें आहे व आपण कोठें आहों हें कांहींच दिसेनासें झालें. उस्मानपाशापुढें व मागें सैन्य अशा व्यवस्थेनें गोर्नी इट्रापोल वेढ्यापर्यंत पाण्याचे लोटा सारखे ते गेले. तेथें शत्रूचा एक रिडाउट होता. त्यांत ग्रनाडियर नांवाची पहाडी पलटण होती. ती सगळी पलटण त्यांनीं नाहींशीं केली. अशा रीतीनें वेढ्याची पहिली ओळ फोडली. याचप्रमाणें दुसरी ओळही फोडली, परंतु तिसऱ्या ओळीं पर्यंत मात्र तुर्क सैन्याच्यानें जाववलें नाहीं. चोंहोकडून पावसासारखा गोळ्यांचा पाऊस त्यांवर पडूं लागला. त्यांस माघारी हाकून देण्यासाठीं शत्रूचे सैन्याच्या टोळ्यावर टोळ्या येऊ लागल्या. तुर्क शिपाई मरत पण घेतलेली जागा सोडीत नसत. उजवी कडून रुमानियाचे सैन्यानें, डावीकडून ग्रेस्टोवेक येथील सैन्यानें आणि समोरून ग्रनाडियर सैन्यानें मारा चालविला होता. दोन प्रहरचे सुमारास तुर्क सैन्यानें आपला मोहरा माघारी फिरविला. नंतर एकाएकी बार निघणें बंद होऊन चोहोंकडे सामसूम झाली. पुन. दुसरा हल्ला येतो कीं काय याची वाट पहात रशियन लोक तयारी करून उभे राहिले होते इतक्यांत तुर्कांचे सैन्यांत पांढरें निशाण उभें केलेलें रशियन लोकांनीं पाहिलें. पांढरें निशाण उभें करणें हें शरण आल्याची खूण आहे. तें निशाण पाहून रशियन लोकांस अत्यानंद झाला आणि तुर्क लोक शरण आले असा जयजयकार करण्यासाठीं तें सर्व सैन्य एकदम ओरडलें.

नंतर पांढरें निशाण घेऊन उस्मानपाशाचा एक सरदार रशियन सैन्यांत आला. पाशाचे दरजाचा कोणीं तरी सरदार शरण आल्याचें

बोलणें करण्यास आला पाहिजे असें रशियन सरदारांनीं सांगून त्यास परत पाठविलें. नंतर दोन सरदार आले. उस्मानपाशा स्वत: शरण आल्याचें बोलणें करण्यास येत आहे असें त्यांनीं रशियन सरदारांस सांगितलें. हें ऐकून त्यांस मोठा आनंद झाला. त्या ठिकाणीं पुष्कळ सरदार जमले होते. त्यांनीं बोलून दाखविलें कीं, खरी शिपाईगिरी उस्मानपाशानें गाजविली. जनरल स्कोबेलेफ बोलला कीं, खरोखर सध्याचे युगांत उस्मान मोठा बहादर सरदार आहे. त्यानें आपले देशाची अब्रू खरी संभाळली यांत कांहीं संशय नाहीं.

सर्व सैन्यानें प्रेझेंट * आर्मचा सलाम उस्मानपाशास द्यावा, अशी तयारी करून रशियन सरदार त्याची वाट पाहत उभे राहिले. फुटलेले गोळे, मोडलेल्या गाड्या, मेलेले बैल व घोडे, त्यांत जागोजाग पडलेलीं शिपायांचीं प्रेतें, ठिकठिकाणीं जमीन लाल होऊन रक्ताचीं थारळीं साचलेलीं वगैरे अनेक कारणानें ज्या ठिकाणीं रशियन सरदार उभे राहिले होते ती जागा मोठी भयाण दिसत होती. पहिले दोन सरदार परत गेल्यावर दुसरे दोन सरदार आले. त्यांत नकविबे नांवाचा एक सरदार होता. त्यानें फ्रेंच भाषेंत रशियन सरदारांस सांगितलें कीं, उस्मानपाशा जखमी झाला आहे; त्याच्यानें येववत नाहीं. तो कोठें आहे असें विचारिल्यावर पुलाचे पलीकडे एक झोपडी आहे त्या झोपडींत तो निजून आहे असें त्यानें सांगितलें, व ती झोपडी रशियन सरदारांस बोटानें दाखविली. हा सरदार इतकें बोलला तथापि त्याचा वरचेवर कंठ भरून येई व डोळ्यावाटे पाण्याच्या धारा चालल्या होत्या. अशा प्रकारें अर्धा पाऊण तास गेल्यावर स्कोबेलेफनें त्यांस विचारिलें कीं, तुम्हांस कांहीं बोलावयाचें आहे काय ? त्यानें होय म्हणून माननें खूण करून सांगितलें. जनरलनें सांगितलें कीं, थोडा वेळ दम धरा म्हणजे आपणाबरोबर बोलणें करण्यास कोणी येईल. त्या थोड्या वेळांत त्याशीं बोलण्याची पुष्कळांनीं खटपट केली परंतु कोणाशींच तो बोलला नाहीं. इतक्यांत जनरल स्ट्रकोफ शरणागताशीं बोलणें करण्याचा बादशहा पासून

* प्रेझेंट आर्मचा सलाम देणें लष्करी खात्यांत मोठा सन्मान मानितात.

अधिकार घेऊन आला. त्यानें त्या सरदारांस विचारिलें कीं, बोलणें करण्याचा अधिकार उस्मानपाशानें तुम्हांस दिला आहे काय? त्यानें नाहीं म्हणून सांगितल्यावरून त्यांस परत जाण्यास सांगितलें. नंतर जनरल स्टूकाफ व जनरल गनेस्की उस्मानपाशाबरोबर बोलावयास तो ज्या झोपडींत होता तेथें गेले. उस्मानपाशाचे तर्फे एका सरदारानें सांगितलें कीं, सर्वस्वी आम्ही तुमचे स्वाधीन आहों. इतकें बोलून तो रडावयास लागला.

खरोखर तुर्क लोकांवर रडण्यासारखाच प्रसंग आला होता. कारण प्लेवनाजवळच्या आपल्या बचावाच्या जागा सोडून ते एका बाजूस गेल्यामुळें ह्या जागा रशियन सैन्यानें धरल्या होत्या. त्यामुळें तुर्क लोकांस कोठें आश्रयाची जागा राहिली नव्हती. त्यांतून शत्रूचें सैन्य त्यांच्या चौपट होतें. दोन वाजतां उस्मानपाशा बरोबर बोलणें झालें आणि तीन वाजतां तुर्क शिपायांनीं हत्यारें खालीं ठेविलीं. नंतर उस्मानपाशास बसण्यासाठीं रशियाचे बादशहानें आपली गाडी पाठविली. त्या गाडींत बसून जात असतां रशियन सैन्याचे सेनापति ग्रांड ड्यूक निकोलास याची गांठ पडली. ग्रांड ड्यूकानें उस्मानपाशाचा हात हालवून सांगितलें कीं आपण प्लेवनाचा उत्तम प्रकारें बचाव केला तो पाहून मला मोठा संतोष झाला व इतिहासांत वर्णन करण्यासारखी आपण लढाई केली. यानंतर एका मागून एक पुष्कळ रशियन सरदार उस्मानपाशास पाहण्यास आले होते. त्यांत जनरल स्कोबेलेफ आला. तो म्हणाला कीं खरोखर आपण गाझी आहा. व जरी आपण शरण आला तरी विजयी सरदारांमध्यें आपली गणना केली जाईल यांत संशय नाहीं. या शेवटचे लढाईंत चार पांच हजार तुर्क शिपाई मेले व जखमी झाले. २७,००० शरण गेले व ६० तोफा शत्रूचे हातीं लागल्या.

प्लेवनाचे रस्त्यांत व गांवाबाहेर रानोमाळ मनुष्यांचीं प्रेतें पडून कुजावयास लागलीं होतीं. त्यांस पुरण्याचे देखील कोणी मनांत आणिलें नाहीं. ११ वे तारखेस रशियन लोकांनीं जय मिळाला म्हणून मोठा आनंद केला. त्या प्रेतांचा तर काय परंतु अन्न

अन्न व पाणी पाणी करीत हजारों जखमी व अजारी लोक पडले होते त्यांचा कोणी समाचार देखील घेतला नाहीं. जखमी, अजारी, व मुडदे सर्व एकाच ठिकाणीं पडले होते त्यांस कोणी वेगळे देखील केले नाहीं.

प्लेवनाजवळ रशियन व रूमानियन या दोघांचे मिळून एक लक्ष १९,००० शिपाई व ५५८ तोफा होत्या. बालकन पर्वतावर ३० हजार शिपाई व १६२ तोफा, लोम नदीचे कांठीं झारविचचे हाताखालीं ७३,००० शिपाई व ४३२ तोफा, डाब्रूशा प्रांतांत ३८००० शिपाई व ४४० तोफा. इतके रशियन सैन्य युरोपखंडांत तुर्कांचे राज्यांत होते. तुर्कांचें सैन्य पश्चिम बलगेरियांत ६२,००० शिपाई व १३२ तोफा, बालकन पर्वतांत २६,००० शिपाई व ७६ तोफा, लोम नदीचे कांठीं (डाब्रूशा प्रांतांतील व किल्ल्यांतील मिळून) १,३५,००० शिपाई आणि ३८६ तोफा होत्या.

प्लेवनाजवळ सैन्य शरण गेले, सुलीमानपाशा पराभव पावून मागें हटला, महमदअल्लीही मागें मागें हटत चालला होता, कार्स शहर शत्रूचे हातीं गेले, एर्झरूमला वेढा पडला होता, पुष्कळ देश शत्रूनें जिंकले होते, ताब्यांतील प्रजेनें व संस्थानिकांनीं बंडें केलीं होतीं अशा प्रकारें चोहोंकडे भय उत्पन्न झालें असतां १२ दिसेंबर रोजीं तुर्क लोकांची पार्लमेंट सभा भरली. व सर्वानुमतें ठरलें कीं, मोठमोठ्या राष्ट्रांस मध्यस्ती करण्यासाठीं विनंती करावी. नंतर एक सरकुलर काढलें तें:––तुर्क सरकारानें बुध्यां उकरून ही लढाई काढली नाहीं. ही लढाई होऊं नये म्हणून आम्हीं पुष्कळ प्रयत्न केला. राजाचे सांगणविरून लोक आपले देशाचा बचाव करण्यासाठीं शूरपणानें लढत आहेत. रशियन लोकांनीं ही लढाई कोणत्या कारणासाठीं काढली हें सर्वांस माहीत आहेच. ख्रिस्ती लोकांवर जुलूम होऊं नये म्हणून लढाईस रशियन लोक उठले असें सर्वांस वाटतें काय? कोणावरच जुलूम न व्हावा, कायदा सर्वांस सारखा लागू असावा असा क्रम तुर्कांचे राज्यांत चालू झाला आहे. परंतु या लढाईमुळें राष्ट्रावर मोठें अरिष्ट आलें आहे. व्यापार व शेतकी बंद पडली व सरकारास

अतिशय खर्च येत आहे, यामुळें सर्वच अव्यवस्था होण्याची वेळ आली आहे. आतां जें करावयाचें रशियन सरकारचे मनांत आहे तें आम्ही करावयास लागलों आहों मग आतां निरर्थक लढाई कशास वरें चालविली आहे. आतां युरोपखंडांतील मोठे राष्ट्रांस आमची अशी विनंती आहे की, हजारों मनुष्ये मरताहेत त्यांवर दया करावी आणि मध्यें पडून ही लढाई मिटवावी.

या सर्क्युलराचे संबंधानें रशियन बादशाहा बोलला कीं, 'आम्ही जें करीत आहों तें युरोपखंडांतील सर्व राष्ट्रांचे अनुमतानें करीत आहों. आम्ही कोणास आतां मध्यस्ती करूं देणार नाहीं व कोणी करूं लागल्यास त्याशीं आह्मी लढण्याची तयारी करून ठेवली आहे.'

प्लेवना घेतल्यावर रशियन बादशाहा आपले राजधानीचे शहरीं निघून गेला. तुर्कीचे संबंधानें विचार करण्यासाठीं इंग्रज सरकारानें आपली पार्लमेंट सभा भरविली.

सोफाया आणि इचटमान यांचे मध्यें व स्लाटिझाचे रस्त्यावर तुर्की सैन्यानें मोठी मजबूत जागा पाहून तळ दिला होता. कामार्लीजवळचे सैन्यासही पुष्कळ मदत आली होती. या सैन्यावरून महमदअलीस काढून त्यावर शकीरपाशास नेमिलें होतें. येथें जे स्वार होते त्यावर बेकरपाशा मुख्य होता. लोमनदीचे कांठीं सुलीमनपाशा होता त्यास तिकडील किल्ल्याचा बंदोबस्त करून बाकीचें सैन्य घेऊन जलमार्गानें कान्स्टांटिनोपल शहरीं येण्याचा सुलतानानें हुकूम पाठविला. त्याप्रमाणें सुलीमानपाशा कान्स्टांटिनोपल शहरीं गेल्यावर त्यास तिकडील सैन्यावर सेनापती नेमिलें.

या वेळेस सर्व देशांत बर्फ पडावयास लागला होता यामुळें दोन्ही पक्षांकडील सैन्यास मोठी अडचण पडूं लागली. पश्चिमेकडील वारा सुटून काळेसमुद्राचें पाणी डान्यूबनदींत शिरलें आणि तेणेंकरून निकोपोलीस येथें रशियन लोकांनीं केलेला नावेचा पूल वाहून गेला.

सर्वियाचे राजानें पुनः लढाईची तयारी करून रशियन लोकांचे सांगणी वरून १५ दिसेंबर रोजीं आपलें सैन्य तुर्कीवर चालविलें. आणि २४ दिसेंबर रोजीं आठ तास लढून अकपालाक गांव घेतलें,

नंतर दोन दिवस लढून पायराट घेतलें. या शिवाय पुष्कळ सामान व दारूगोळा सर्वियन लोकांचे हातीं लागला.

अशा प्रकारें सर्वांनीं तुर्कांवर गर्दी उडविली हें पाहून इंग्लिश लोकांत अगदीं गोंधळ होऊन गेला. त्यांत दोन तट लढाईचे आरंभापासून झाले होते. एका तटाचें म्हणणें तुर्कांचे प्रकरणांत हात घालूं नये व दुसरे तटाचें म्हणणें तुर्कांस मदत करून रशियास तंबी द्यावी. शेवटीं या दोन्ही तटांची ट्राफालगारस्क्वेयरमध्यें २९ डिसेंबर रोजीं मारामारी झाली.

जनरल गुर्कोजवळ पहिले ३०००० सैन्य होतें. प्लेवना घेतल्यावर त्यास आणखी सैन्याची कुमक आली. या सैन्यानें सोफाया शहराकडून चाल करावी व दुसरें एक सैन्य बनवून त्यानें शिपका घाटांतून जावें असा रशियन लोकांनीं बेत केला.

जनरल गुर्कोनें आपले सैन्याच्या ९ टोळ्या केल्या व त्यांणीं ९ ठिकाणीं बाल्कन पर्वत उतरण्याचा हुकूम दिला. अधीं डोंगरांतील रस्ता त्यांतून बर्फ फार पडून घसरडे झालें होतें. यामुळें घाटेंत रशियन शिपायांचे फार हाल झाले व कित्येक तर थंडीनें काकडून मरून गेले. तोफा, घोडे वगैरे दोरास बांधून डोंगराकर नेले व खालीं आणिले. अशा रीतीनें रशियन सैन्य बाल्कन पर्वत उतरून गेले आणि २७ वे तारखेस सामान भरलेल्या २०० गाड्या त्यांनीं धरिल्या. नंतर ३१ डिसेंबर रोजीं बाबाकोनाक जवळ लढाई झाली त्यांतही रशियन लोकांसच जय मिळाला.

येथून पुढें सन १८७८ साल लागलें. या सालाचे पहिले दिवशींच जनरल गुर्कोनें तुर्कांचा बाबाकोनाक जवळ दुसरे वेळ पराभव केला. तुर्क लोक मागें सरत सरत सोफायापर्यंत आले. आणि तिसरे तारखेस थोडी लढाई करून सोफाया सोडूनही मागें सरले आणि त्याच दिवशीं रशियन लोकांनीं सोफाया शहर घेतलें.

डिसेंबर महिन्याचे २७ वे तारखेस सेंटपिटर्सबर्ग येथील इंग्रज सरकारचे वकिलानें कोणचे अटीवर लढाई तहकूब कराल असें रशियाचे मुख्य प्रधान प्रिन्स गार्चाकाफ यांस विचारिलें. त्यास त्यानें

उत्तर दिलें कीं, हें 'विचारणें तुर्कीचे सुलतानानें आमचे सैन्यावर जो सेनापति आहे त्यास विचारावें. परंतु मी आतां तुम्हांस इतकें सांगतों कीं, तुर्क लोक आमचे हातीं आले आहेत. आम्हास पाहिजे तसा तह करून घेतल्याशिवाय आम्ही त्यांस कधीं सोडणार नाहीं.'

मान्टनिग्राचे सैन्यानें जानेवारीचे १० वे तारखेस अनवारी गांव घेतलें. नंतर १९ वे तारखेस आणखी एक वेळ शत्रूचा पराभव करून तें सैन्य स्कुटारी बंदरावर गेलें. सर्वियाचे सैन्यानें याच मितीस निश्च शहर घेतलें.

जनरल गुर्कोनें आपलें सैन्य सोफायाजवळ जमविलें. नंतर त्याचे चार भाग करून चार वाटेनें चालविलें. उजवीकडचे भागावर वील-हेमीनाफ यास नेमून त्यास सामाकोवावर जाण्यास सांगितलें. तो आपलें सैन्य घेऊन ७ वे तारखेस तें शहर सोडून निघाला. मधले भागावर कौंटशौलाफ यास नेमिलें. तो ९ वे तारखेस इटचीमानच्या रस्त्यानें तारतार बा.ारनजीकचे गांवावर गेला. डावे भागावर जनरल शील्डर स्कुडनर यास नेमून त्याला टोपोलनिका नदीचे कांठानें जाण्याचा हुकूम दिला. डाव्याचे डाव्या भागावर जनरल क्रुडनेर यास नेमून त्याला चकीर पाशाचे मागें लाविलें.

सोफायाजवळ तुर्क सैन्याचे दोन तुकडे झाले होते. एक भाग कापूडचककडे गेला आणि दुसरा सामाकोवाकडे गेला. पहिल्या भागाचे पुन्हा दोन तुकडे होऊन एक तुकडा लाटिझाकडे गेला. त्यांवर बेकर पाशा होता. सामाकोवाकडे गेलेलें सैन्याचे मागें रशियन सैन्याची एक टोळी लागली. तुर्क सैन्य पुढें व रशियन सैन्य मागें अशीं तीं दोन्हीं सैन्यें फिलिपोलिसपर्यंत गेलीं. १५ वे तारखेस रशियन लोकांनीं तें शहर घेतलें. या शहराचे दक्षिणेस जो डोंगर आहे त्याजवळ चांगली कसून लढाई झाली. तुर्क सैन्यावर फौदपाशा मुख्य होता. जनरल गुर्कोनें आपल्या सैन्याचे तीन भाग येथें जमा केले होते. फौदपाशाजवळही १५००० सैन्य होतें. तिहींकडून शत्रूनें आपणास घेरिलें हें पाहून तुर्क शिपाई राक्षसासारखे लढले. फौदपाशा सर्वांचे पुढें होऊन लढत होता. त्यानें आपले तरवारीनें

१७ शिपाई मारून मग तो मरण पावला. आपला सरदार मेला हें पाहून तुर्क सैन्याची पळापळ झाली. ही लढाई जानेवारीचे १६ वे तारखेस झाली. ह्यांत तुर्कांच्या ९० तोफा शत्रूच्या हातीं लागल्या.

शिपका घाटांत उभयपक्षांचीं सैन्यें समोरासमोर पडून राहिलीं होतीं. नंतर रशियन सैन्यास प्लेवनाहून मदत आल्यावर त्यांनीं तुर्क सैन्यावर हल्ला करण्याचा विचार केला. शिपका घाटांत शिपका खेड्याचे दक्षिणेस ४ मैलावर सिनोवा नांवाचें खेडें आहे. त्या खेड्याभोंवतालच्या मैदानांत तुर्क सैन्य होतें. त्यावर वेसोलपाशा मुख्य होता. या सैन्यानें रिडाउट वगैरे बांधून केझनलिककडे जाण्याचा रस्ता धरिला होता. हें एकंदर ३०,००० सैन्य होतें. येथें थंडी फार पडल्यामुळें बर्फ इतका पडला होता कीं रस्ते दिसत नव्हते. अशा अडचणींतून तुर्क सैन्याचे पुढें जाऊन लढाई करणें मोठें भय आहे असें समजून रशियन लोकांनीं आपले सैन्याच्या तीन टोळ्या केल्या; आणि तुर्क सैन्याचे मागें जाऊन हल्ला करावा असा विचार ठरविला. पहिल्या टोळीवर राडेस्की, दुसरीवर स्कोबेलफ आणि तिसरीवर प्रीन्स मिरेस्की मुख्य सेनापती होते. प्रत्येक टोळींत २०,००० सैन्य होतें. जानेवारीचे ९ वे तारखेस सैन्य चालू होण्याचे अगोदर जनरल स्कोबेलेफ यानें आपले सैन्यास उपदेश केला तो:—"शिपायांनो, आज तुह्मांस मोठें जोखमीचें काम करावयास जावयाचें आहे. बर्फांतून रस्ते काढीत तें काम करावयास जावें लागेल. तुमचे नांवास व कीर्तीस योग्य असें हें काम आहे. रस्ते काढून बालकन पर्वतावर गेल्यानंतर तुर्क लोकांच्या मोठ्या जंगी सैन्याबरोबर तुह्मांस लढावें लागेल. तें सैन्य तुह्मांस अडविणार आहे. शिपायांनो, ध्यानांत ठेवा कीं आतां आपले देशाची अब्रू राखणें तुमचे हातीं आहे. तुह्मांस यश यावें ह्मणून बादशहासुद्धां सर्व रशियन लोक देवाची प्रार्थना करीत आहेत. तुर्क शिपायांची संख्या फार आहे, ते मोठे शूर आहेत व आपला तिरस्कार करितात ह्मणून भिऊ नका. तुह्मी ज्या कामासाठीं लढत आहा तें काम परमेश्वराचेंच आहे. यास्तव तो तुह्मांबरोबर राहील यांत संशय नाहीं. गेल्या जुलै महिन्यांत पराभव

होऊन माघारीं जावें लागलें हा विचार मनांत आणूं नका. आपल्या भावांचा देश सोडविण्यासाठीं, आपले धर्माचें रक्षण करण्यासाठीं व बल्गेरियन लोकांच्या आया बहिणींची अब्रू राखण्यासाठीं लढत आहां. या परोपकाराचे कामीं ईश्वर तुह्मांस खास यश देईल."

६ वे तारखेस सर्व सैन्य पुढें चाल करून गेलें. तिसरी टोळी आपले नेमलेले जागीं जात असतां तीस तुर्क लोकांनीं पाहिलें ; आणि तीवर असा मारा केला कीं दोन प्रहरांत ४,००० शिपाई मारिले. प्रिन्स मिरास्की यास आपला खास पाडाव होतो असें वाटून त्यानें दुसऱ्या व पहिले टोळीवरचे अधिकाऱ्यांस मदत पाठवा ह्मणून वरचेवर निरोप पाठविले. तिसऱ्या भागावरचा मारा कमी व्हावा आणि तुर्क सैन्याचें लक्ष आपलेकडे लागावें ह्मणून राडेस्कीनें तुर्क सैन्यावर दुसरी कडून चाल केली; परंतु त्यालाही तुर्कलोकांनीं आपला बचाव करावयास लाविलें. या सगळ्या सैन्याचा पराभव होण्याची वेळ आली होती, परंतु जनरल [illegible]बेलेफचे भागानें सर्वांची अब्रू संभाळली. यानें केझनलिकचे रस्याकडे स्वारांस पाठवून आपण बाकीचें सैन्य घेऊन शत्रूवर चालून गेला. बार वगैरे काढून वेळ न गमावितां बंदुकीस संगिनी चढवून त्याचे सैन्यानें एकदम धावा केला. नंतर संगिनींची अशी जबरदस्त लढाई झाली कीं, एका प्रहरांत फक्त तुर्क लोकांचे ८,००० शिपाई मेले गेले. आतां अधिक लढून उगीच शिपायांचा नाश करून घेणें बरें नाहीं असें समजून वेसोलपाशानें आपले शिपायांस हत्यारें खालीं ठेवण्यास सांगितलें. ही लढाई जानेवारीचे १० वे तारखेस होऊन २२,००० शिपाई, २८० सरदार, ४० तोफा आणि ७ निशाणें रशियन लोकांचे हातीं लागलीं.

ही लढाई झाल्यावर रशियन लोकांची पहिली टोळी फिलीपोलिसकडे, दुसरी हेरमानलीकडे आणि तिसरी यांबोलीकडे गेली.

शत्रूनें घेतलेल्या मुलखांतील मुसलमान लोकांची मोठी त्रेधा उडाली. त्यांस घरीं राहूनही सुख नव्हतें व पळून गेल्यानेंही सुख मिळालें नाहीं. घरीं बल्गेरियन लोकांचें भय, बाहेर शत्रूचें भय. बल्गेरियन लोकांनीं तर आपले नीचपणांची कमाल केली. लहान

मुलाबाळचें अंथरून किंवा मेलेल्या माणसांचे अंगावरचे कपडे देखील त्यांनीं राहूं दिले नाहींत. रस्त्यावर पडलेलीं प्रेतें एका बाजूस न करतां त्यांनीं त्यांवरून गाड्या चालवाव्या; या लोकांचे भयास्तव मुसलमानांची इतकी पळापळ झाली कीं, मोठमोठ्या रस्त्यांवरून जाण्यास वाट न मिळाल्यामुळें नव्या वाटा पडल्या होत्या. थंडीनें लोकांचे फार हाल झाले. कित्येक बायका पोरें तर थंडीनें कांकडून रस्त्यावरच मरून पडलीं होतीं. लहान मुलें चालेनाशीं झालीं कीं, त्यांस तेथेंच सोडून द्यावें किंवा जिवंतपणीच बर्फांत पुरून टाकावें. अशा अडचणीनें सुमारें एक लक्ष माणसें मेलीं असावी असा अजमास आहे. मोडलेल्या गाड्या, ओझ्यामुळें टाकून दिलेल्या सतंज्या, चटया, बिछानें, ब्लांकेटी वगैरे घरांतील सामान शेकडों मैलपर्यंत रस्त्यांवर जागोजाग पडलें होतें.

जों जों थंडी अधिक पडूं लागली तों तों एर्झरूमजवळचे दोन्ही सैन्यास अधिक त्रास होऊं लागला. सैन्य रक्षकांचे कामावर जे शिपाई जात त्यांतून कांहीं शिपाई कांकडून मेले नाहींत असा एक दिवस जात नसे. सर्पण मिळेनासें झालें होतें यामुळें आजू बाजूचे गांवांतील जुनीं घरें पाडून ते जाळूं लागले. जनावरांच्या कुजलेल्या प्रेतांत माती घालून वाळवीत आणि त्यांस गोवऱ्यांप्रमाणें उपयोगास लावीत. शत्रूचा पूर्ण वेढा त्या शहराला पडल्यावर त्यांनीं एक जाहीरनामा शहरांत लाविला.' त्यांत लिहिलें होतें कीं " शहरवासीं लोकांनो, कार्स शहर आमचे हातीं आलें आहे. आतां आह्मांस अडथळा करूं नका. जर तुम्ही मुकाट्यानें आम्हांस अनकूळ व्हाल, आणि शहर आमचे स्वाधीन कराल तर कार्स व अर्दहान शहरचे लोकांचा जसा बंदोबस्त केला आहे तसा तुमचा बंदोबस्त करूं. कोणत्याही प्रकारें तुह्मांस इजा लागूं देणार नाहीं. आम्ही सांगतो तें न ऐकाल तर तुह्मांस जें दुःख होईल तें तुम्ही आपण होऊन आपणावर ओढून घेतलें असें होईल." तुर्की शिपायांस पुरते कपडे नसल्यामुळें त्यांचे फार हाल होऊं लागले. त्यांची दोन वर्षांचे पगाराची बाकी सरकाराकडे थकली होती. दुसऱ्या एखाद्या देशाचे हे शिपाई असते तर त्यांनीं खचित बंड केलें असतें आणि तें शहर सोडून निघून गेले असते; परंतु तुर्क लोक विश्वासु इमानी व धर्माभिमानी असल्यामुळें तशीच आपदा भोगून राहिले होते.

बाल्कन पर्वताचे आलीकडे जितके तुर्क सैन्य होतें तितक्यावर सुलीमानपाशा मुख्य होता. त्यानें आद्रियानोपल जवळ सर्व सैन्यानें जमावें असा हुकूम केला होता; परंतु शिपका घाटांतील सैन्य शरण गेलें, व दुसरीकडील जागोजागचे सैन्याची शत्रूनें पाठलाग करून पांगापांग केली. अशा प्रकारें सुलीमानचे हाताखालीं सैन्याची दशा उडाली हें पाहून त्यास सेनापतीचे जाग्यावरून काढून रूफपाशास त्याचे जागीं नेमून महमद अल्लीस त्याचे मदतीस दिले.

तुम्ही रशियन सैन्याचे सेनापती ग्रांड ड्यूक निकोलास याज-बरोबर समक्ष लढाईचे तहकुबीचें बोलणें करा असा इंग्रज सरकाराकडून सुलतानास निरोप आला. हा निरोप येण्याचे अगोदरच लढाई तहकूब करण्याची विनंती सुलतानानें रशियन सेनापतीस केलीच होती. यासंबं-धानें बोलणें करण्यास १७ जानेवारी रोजीं सरवरपाशा कान्स्टांटिनोपल शहर सोडून निघाला. इंग्रज व आस्त्रियन सरकार यांजकडून पुन्हा निरोप आला कीं, इतर सरकारांचे हितास धक्का लागेल अशा प्रकार-चा तह तुम्ही रशियन सरकाराबरोबर करूं नका. त्यांस सरवरपाशानें उत्तर दिलें कीं, "आतां रशियन सरकाराबरोबर लढण्याचें सामर्थ्य आमचे आंगीं राहिलें नाहीं. आम्ही सर्वस्वी त्यांचे हातीं सांपडलों आहों. ते सांगतील तसा तह करून घेणें आह्मांस भाग आहे. तुम्ही आपले हिताकडे लक्ष्य देतां तसें आह्मांसही आपले हिताकडे लक्ष्य दिलें पाहिजे. आमचें अर्धें राज्य जाऊन निर्विवाद अर्धें राज्य आह्मांस राहिलें तरी त्यांत आमचा संतोष आहे." हा परत निरोप पोहोंचल्या-बरोबर पुन्हा इंग्रज व आस्त्रियन सरकारचा निरोप आला कीं, सन १८५६ व सन १८७१ सालीं झालेले तहनामे जामीनदार राष्ट्रांचे संमतीशिवाय मोडल्यास तो तह कोणी कबूल करणार नाहीं. या नि-रोपावरून तुर्क सरकारास थोडा धीर आला व रशियन सरकारानें फार मोठी मागणी केल्यास इंग्रज लोक आपणांस मदत करतील असें तुर्क लोकांस वाटूं लागलें.

लढाई तहकूब करावी ह्मणून बोलणें करण्यास सरवरपाशा गेला

तेच वेळेस इंग्लंड देशची पार्लमेंट नांवाची राजसभा भरली. त्यांत राणी-स हेवांनीं भाषण केलें तें:—

युरोपखंडाचे पूर्वेस व आर्मेनिया देशांत लढाई चालली आहे, ती लढाई बंद व्हावी ह्मणून मी जी कांहीं खटपट केली ती तुह्मांस कळवावी व त्याच गडबडींत तुमचा सल्ला घ्यावा हें मला योग्य वाटल्यावरून नेमलेले वेळेचे अगोदर मीं तुम्हांस बोलावणें केलें आहे. आपले तिन्हाईतपणास धक्का लागेल असें काम लढणारे दोन्ही राष्ट्रां-तून एकानेंही केलें नाहीं. व तसें काम करण्याची त्यांची इच्छाही नाहीं असें मला वाटतें. आपला तिन्हाईतपणा जों पर्यंत ते मोडणार नाहींत तों पर्यंत आपण तिन्हाईत राहूं. ही लढाई जर आणखी कांहीं दिवस चालली आणि त्यांत मला सावधगिरीनें राहण्या-चा प्रसंग आला तर मग कसें? त्यासाठीं कांहीं तयारी करून ठेवावयास नको काय? ही सावधगिरी ठेवण्यास मला जें कांहीं लागेल तें देण्यास माझी पार्लमेंट सभा मला उदारपणानें मदत करील अशी माझी खातरी आहे."

जो जो मुलूख रशियन लोकांनीं घ्यावा त्या त्या मुलखांतले मुसल-मान प्रजेनें कान्स्टांटिनोपल शहरीं व त्याच्या भोंवतालचे प्रांतीं पळून जावें. त्या शहरीं व भोंवतालचे प्रांतीं सुमारें १०० मैल पर्यंत परा-गंदा झालेले लाखों मुसलमान लोक जमा झाले होते. त्यांत कित्येकांस राहण्यास घरें मिळालीं नाहींत, कित्येकांस खाण्यास कांहीं नव्हतें असा एकच गोंधळ चालू होता. या शिवाय थेसली, इपायरस व मासीडोनिया येथील लोक बंड करण्यास तयार झाले होते. एकं-दरींत सुलतानाचे सर्व राज्यांत गोंधळ होऊन गेला होता.

सिपकाघाट घेतल्यावर तेथील रशियन सैन्य बालकन पर्वत उतरून खालीं आलें, जनरल गुर्कोनें फिलीपोलीस शहर घेतलें, पुष्कळ तुर्क सैन्य शरण गेलें, सुलीमानपाशाचे सैन्याची पळापळ झाली, या सर्व कारणावरून रशियनांस शरण जाण्याशिवाय दुसरा कांहीं तुर्क लोकांस उपाय राहिला नव्हता. जितकी लढाई अधिक लांबेल तितकी अधिक फायदेशीर होईल हें समजून रशियन लोकांनीं

तहाचें बोलणें दिरंगाईवर चालविलें. १९ वे तारखेस लढाई न करतां अद्रियानोपल शहर रशियन लोकांचे हातीं लागलें. तें शहर कान्स्टांटिनोपल शहरचे वायव्येस १३५ मैलांवर आहे. तें सन १३६१ पासून सन १४५३ पर्यंत तुर्क सरकारचे राजधानीचें शहर होतें. हें कान्स्टांटिनोपल शहराचा दरवाजा असल्या सारखें आहे. तें शहर शत्रूचे हातीं गेलें कीं, बहुत करून सुलतानास शत्रूबरोबर तह करावा लागतो. या ठिकाणीं रशियन सैन्यास अडवावें असा सुलेमानपाशाचा बेत होता. येथें १५००० तुर्क सैन्य जमलें होतें. शिपका घाटांतील सैन्य समोरून आलें व जनरल गुर्कोचें सैन्य मागून येत आहे हें पाहून तो भ्याला व र्होडोप पर्वतांत पळून गेला. २७ वे तारखेस ग्यांडडयुक तेथें आला आणि लढाईचे तहकूबीचे बोलणें तेथें चालूं झालें.

तुर्क सैन्याचा जमीनीवर चोहोंकडे पराभव झाला हें पाहून जहाजां-वरचा अधिकारी होबर्टपाशा यास मोठा आवेश आल्यासारखा झाला आणि आजपर्यंत जीं कांहीं पांच चार जहाजें रशियन लोकांनीं टारपेडो लावून फोडलीं ती भीति मनांत न आणितां जानेवारी महि-न्याचे आरंभास ४लढाऊ जहाजें घेऊन बाटूमबंदर सोडून तो निघाला, आणि चेवकेटिल, ग्रिगोरेथी, आणि पोटी इतक्या बंदरावर तोफांचा मारा करून त्या बंदरांचा बराच नाश केला. नंतर क्रिमिया देशांतील युपा, टोरिया, थिओडोसिया व दुसरी कडील याल्टा, अनापा आणि केरलीव वगैरे बंदरांचा त्यानें नाश केला.

जानेवारी महिना संपत आला तथापि लढाई तहकूब झाल्याची कांहींच बातमी इंग्रज सरकारास कळली नाहीं म्हणून मुख्य प्रधान लार्ड बकिन्सफील्ड साहेबानीं युरोपखंडांतील मोठमोठ्या राष्ट्रास कळ-विलें कीं, ' आजपर्यंत आम्ही तिऱ्हाईतपणानें वागलों. लढणाऱ्या दोन राष्ट्रांमध्यें काय बोलणें चालणें चाललें आहे हें आह्मांस कांहींच कळलें नाहीं. इंग्लिश लोकांचे हितास धक्का बसेल अशा रीतीनें रशियन सैन्य चाल करून जात आहे. कान्स्टांटिनोपल शहरीं गोंधळ चालला असल्यामुळें आमच्या प्रजेच्या निर्भयपणाची जबाबदारी

सुलतानानें आपले शिरावरून काढून टाकली आहे. यास्तव कान्स्टांटिनोपल शहरांतील इंग्रज सरकारचे प्रजेच्या जीवांचें व मालमत्तेचें रक्षण करण्यासाठीं डारडनेलचे समुद्रधुनींतून जाण्याचा आम्ही आपले जहाजांस हुकूम दिला आहे." हुकमाप्रमाणें जानेवारीचे २५ वे तारखेस इंग्रज सरकारचीं जहाजें डार्डनेलचे सामुद्रधुनींत शिरलीं. तुर्क सरकारचे परवानगीशिवाय त्या सामुद्रधुनींत कोणांच्याच जहाजांस जाण्याचा हुकूम नव्हता; परंतु यावेळेस तुर्क सरकारास इंग्रज लोक आपले मदतीस आले असें वाटून त्यांनीं त्यांच्या जहाजांस आंत येऊं दिलें. एक दोन दिवसांत लागलीच बेसिकाचे उपसागरांत परत येण्याचा त्या जहाजांस इंग्रज सरकारचा हुकूम झाला.

तुर्क सैन्याची पळापळ झाल्यावर रशियन सैन्याच्या ६ टोळ्या झाल्या. त्यांपैकीं कोणी काळ्या समुद्राकडे गेले व कोणी मारमोराचे समुद्राकडे गेले. सुलीमानपाशानें आपले सैन्यापैकीं कांहीं सैन्य गालीपोली येथें ठेविलें व बाकीचें सैन्य घेऊन तो जहाजांतून कान्स्टांटिनोपल शहरीं गेला. आद्रियानोपल जवळचे सैन्यावर महमदअली होता. तोहि मागें हाटत हाटत सराईचे मार्गानें राजधानीकडे गेला. सगळेंच सैन्य मागें सरलें असें पाहून स्टानिमाका येथें बेकरपाशा होता, तोही रोडोप पर्वताचेखालीं उतरला. नंतर गांवामागें गांव व शहरामागें शहर रशियन सैन्याचे हातीं लागलें.

डार्डनेलच्या मुखाजवळ उत्तर किनाऱ्यास गालीपोली ह्मणून बंदर आहे. त्या बंदरास इंग्रज लोक फार चाहातात. कारण हें बंदर ज्याचे ताब्यांत राहील तो डार्डनेलचे सामुद्रधुनींत कोणांसही जाऊं देणार नाहीं असा त्यांचा समज आहे. रशियन सैन्य त्या बंदराजवळ गेलें तेव्हां रशियन सरकारानें प्रसिद्ध केलें कीं, गालीपोलीवर हल्ला करावा किंवा तें बंदर आपले ताब्यांत घ्यावें अशी आमची इच्छा नाहीं परंतु तुर्क लोकांचें सैन्य जर त्या ठिकाणीं राहील आणि त्यापासून आम्हांस त्रास होईल तर मग आम्हांस तें शहर घेणें भाग पडेल.

बालकन पर्वताचे उत्तरेस जीं कांहीं तटबंदी शहरें राहिलीं होतीं त्यांपैकीं रशियन लोकांनीं २० जानेवारीस अस्मानबाझार आणि

दुसरे दिवशीं रासग्रड घेतलें. रश्चक व विडन येथें लढाई चालूच होती. ब्रानियाजवळ तुर्क व सर्वियन लोकांची एक सारखी चार दिवस रगडून लढाई झाली तींत तुर्क लोकांचा पराभव होऊन सर्वियन लोकांचे हातीं तें गांव लागलें. याचप्रमाणें मांटनिग्रो देशांत व हर्जिगोविना प्रांतांत तुर्क लोक पराभव पावले.

जिकडे तिकडे तुर्क सैन्याची दशा झाली, कोणी मदत करीना व लढाई तहकूब करावी ह्मणून कोणी मध्यस्तीस येईना हें पाहून तुर्क सरकार सर्वस्वी शत्रूचे स्वाधीन झालें.

रशियन लोकांस कायती इंग्रज सरकारची भीति होती. ती भीति दूर करण्यासाठीं त्यांनीं तयारी केली होती ती अशी:—

१ बाल्टिक समुद्रांतून रशिया देशांत येणारा माल बंद होईल म्हणून दुसरीकडून माल आणण्यासाठीं आगगाडीचा रस्ता करविला.

२ माल नेण्यास जर्मनींतून पुष्कळ वागन विकत आणिल्या व लष्कर नेण्यासाठीं आगगाडीचे रस्त्यावर दुहेरी रेल घातले.

३ चांगले, शक्तिमान व ४० वर्षांचे आतले वयाचे असे ३००००० शिपाई तयार करून ठेविले.

२७ जानेवारी रोजीं आद्रियानोपल येथें तहाचें बोलणें सुरूं झालें व रशिया सरकारानें ग्रयांडड्युक निकोलास याचे मार्फत तहाच्या शर्ती तुर्क सरकारचा मुखत्यार सरवरपाशा यास सांगितल्या. सरवर-पाशाबरोबर नामिकपाशा व आणखी दोन सरदार होते. त्या शर्तींचा विचार करते वेळेस नामिकपाशा ह्मणाला कीं, या शर्ती कबूल करूं नयेत. सरवरपाशा०, सर्व राज्याचा नाश होईल. ना० लढाईंत नाश होऊं द्या परंतु आपले हातानें आपला नाश करून घेऊं नका.

शेवटीं त्या शर्ती त्यांनीं सुलतानास कळविल्या. त्यानें कबूल करण्यास रुकार दिल्यावर तारीख ३१ जानेवारी रोजीं लढाई तहकूब करण्याचा व तह करण्याचा केझनलिफ येथें मसूदा तयार झाला.

तुर्क लोकांचा अगदीं पराभव झाला, तहाचें बोलणें होऊन रशियन सरकारानें सांगितलें त्याप्रमाणें तह करण्यास तुर्क सरकार कबूल झालें आहे, ही बातमी जेव्हां इंग्लंड देशांत गेली तेव्हां प्रधान मंडळांत

मोठी गडबड झाली. परराष्ट्र संबंधी प्रधान लार्ड डर्बी साहेब यानीं आपले कामाचा राजीनामा दिला. त्यांचे जागयावर लार्ड सालिसबरी साहेबांस नेमिल्यावर रशियन सरकारास कळविण्यासाठीं सेंटपिटर्सबर्ग येथील आपले वकिलास त्यांनीं निरोप पाठविला कीं, "तुर्क आणि रशियन सरकारांमध्यें नवीन झालेले तहनाम्यानें पारिसचे तहनाम्यास बाध येत असेल तर तो तहनामा आह्मी कबूल करणार नाहीं, तसा कांहीं मजकूर त्यांत असल्यास तो कायम करण्यासाठीं सन १८५६ सालीं पारिस येथें झालेले तहनाम्यास जितक्या सरकारांची संमती होती तितक्या सरकारांची संमती घेतली पाहिजे."

तुर्क सैन्याचा रशियन सैन्यानें पराभव केला हें पाहून आस्त्रियन सरकारास भीति उत्पन्न झाली; आणि एक सभा भरवून त्यांत तुर्क आणि रशियन लोकांमध्यें झालेले तहाचा विचार व्हावा अशा अर्थाचें एक सर्क्युलर त्या सरकारानें काढिलें, व सैन्याची तयारी चालविली यास रशियन सरकारानें उत्तर दिलें कीं, तहांतील सर्व कलमें दाखविण्याची कांहीं जरूर नाहीं. युरोपखंडांतील सरकारांस दाखविलीच पाहिजेत अशीं जेवढीं कलमें आहेत तेवढीं मात्र दाखविलीं जातील, परंतु त्या कलमांचे संबंधानें कांहीं चर्चा झाल्यास ती कबूल करणें किंवा न करणें आमचे खुषीवर असावें. या संबंधानें बरीच भवती न भवती होऊन सर्वच राष्ट्रें आपआपल्या ठिकाणीं लढाईचे तयारीस लागलीं.

इंग्रज सरकारानें तयारी साठीं ६०,००,००० पौंड खर्चण्याची पार्लमेंट सभेची परवानगी मिळविली, अमानत सैन्यास तयार होण्याचा हुकूम दिला, लढाऊ जहाजें तयार करून ठेविलीं, हिंदुस्थानांतून ८ काळ्या पलटणी, कांहीं तोफा व कांहीं सापऱ्या कंपनी माल्टा बेटांत नेऊन ठेविल्या. रशियन सैन्य कान्स्टांटिनोपल शहरापासून १२ मैलांवर स्यानस्टिफानो ह्मणून गांव आहे तेथें आलेसें पाहून इंग्रज सरकारानें भूमध्य समुद्रांतील आपलीं लढाऊ जहाजें परवानगी शिवाय पुन्हा डार्डेनेलचे सामुद्रधुनींतून मारमोराचे समुद्रांत नेलीं; आणि गुप्त

रीतीनें सुलतानापासून जुलै महिन्याचे ४ थे तारखेस तहनामा करून घे-तला. त्यांतील कलमें येणेंप्रमाणें:—

१ बाटूम, अर्दहान, कार्स हीं तिन्हीं किंवा यांतील कोणतेंहि एक शहर जर रशियन सरकार घेईल आणि पुन्हा मुलूख मिळविण्यासाठीं कुरापत काढील तर इंग्रज सरकारानें सुलतानास सैन्याची मदत करावी. याच कामाबद्दल तयारी ठेवण्याचे खर्चासाठीं सायप्रस बेट सुलतानानें इंग्रज सरकारास द्यावें.

२ एक महिन्यांत तें बेट सुलतानानें इंग्रज सरकारचे स्वाधीन करावें.

३ धर्मसंबंधी व्यवस्था ठेवण्यास तुर्क धर्माधिकारी त्या बेटांत असावेत.

४ मुसलमान लोकांस कामावर नेमण्यास प्रतिबंध नसावा.

५ खर्च वजा जाऊन वसुलपैकीं बाकी जी शिलक राहील ती सुलतानास दर पांचवे वर्षीं देत जावी.

६ पडजमीनींची सुलतानानें पाहिजे त्या रीतीनें व्यवस्था करावी.

७ त्या जमीनींपैकीं कांहीं जमीन इंग्रज सरकारास पाहिजे असल्यास त्यांनीं सुलतानापासून विकत घ्यावी.

८ कार्स वगैरे वर सांगितलेलीं शहरें जर रशियन सरकारानें घेत-लीं नाहींत तर हा तहनामा रद्द आहे असें समजावें.

तुर्क आणि रशियन सरकारांमध्यें जो तहनामा झाला त्यांतील आशय:—

१ सुलतानानें मांटनिग्रो संस्थानास अंटिवारी व स्कुटारी शहरांचे बाजूस समुद्र किनाऱ्याकडील प्रांत द्यावा. दोन्ही राष्ट्रांतील पंच नेमून त्यांनीं सरहद्द कायम करावी.

२ मांटनिग्रो हे स्वतंत्र संस्थान आहे असें सुलतानानें मान्य करावें.

३ सर्विया हें स्वतंत्र संस्थान आहे हें सुलतानानें मान्य करून त्यासही थोडा अधिक मुलूख द्यावा.

४ या कलमांत सर्विया संस्थानांस जो नवीन मुलूख द्यावयाचा त्यांत राहणाऱ्या मुसलमान लोकांचे मालमत्तेविषयीं आहे.

५ रुमानिया हें संस्थान स्वतंत्र आहे असें सुलतानानें मानावें.

६ बलगेरियाचें नवें संस्थान करून त्यांत ख्रिस्ती सरकार असावें; व त्या देशासाठीं तेथील राहणारांचें नवें सैन्य उभारावें.

७ बलगेरियांत जो राजा करावयाचा तो तेथील लोकांनीं निवडलेला असावा.

८ त्या देशांत सुलतानानें आपलें सैन्य ठेवूं नये. तेथील जुनें किल्ले सरकारी खर्चानें पाडावेत. शुम्ला, वार्ना व डान्यूबनदीचे कांठीं जे किल्ले आहेत त्यांतील लढाईचे सामानाची व्यवस्था सुलतानास वाटेल त्या रीतीनें त्यानें करावी; आणि ते किल्ले पाडून टाकावेत. बलगेरिया देशांतील सैन्य तयार होईपर्यंत ५०,००० सैन्य दोन वर्षेपर्यंत रशियन सरकारानें तेथें ठेवावें. त्याचा खर्च तेथील सरकारानें द्यावा.

९ बलगेरिया देशाच्या सरकारानें सुलतानास किती खंडणी द्यावी याचा विचार सर्व राष्ट्रांनीं मिळून करावा.

१० या देशाचे पलीकडे सुलतानाचा जो मुलूख आहे त्यांत सैन्य वगैरे पाठविणें झाल्यास त्या सैन्यास बलगेरियांतून जाण्याची परवानगी असावी.

११ यांत त्या देशांतील मुसलमानांची मालमत्ता व देणगी बाबदल आहे.

१२ बोसनिया व बलगेरिया या देशांचे समुद्र कांठावर सुलतानानें लढाऊ जहाजें ठेवूं नयेत.

१३ सुलीना खाडींत जहाजें जाण्या येण्यास प्रतिबंध नसावा. लढाईमुळें त्या ठिकाणीं ज्यांचें नुकसान झालें असेल तें सुलतानानें भरून द्यावें.

१४ बोसनिया व हरजिगोविना प्रांतांत सुधारणा करावी. ती सुधारणा कान्स्टांटिनोपल शहरीं भरलेले सभेनें ठरविली आहे त्याप्रमाणें व्हावी. त्यांत कांहीं बदल करणें झाल्यास रशिया, टर्की व आस्त्रिया येथील तीन सरकारचे विचारानें बदली करावी. तेथील लोकांकडे थकलेला सारा त्यांस माफ करावा. एक वर्षपर्यंत

तेथें जें उत्पन्न होईल तें तेथील लोकांचें झालेलें नुकसान भरून देण्यांत खर्ची घालावें.

१५ क्रीट, इपायरस आणि थेसली येथील कारभार पंच नेमून त्यांचे मार्फत चालवावा. हे पंच त्याच देशांतील असावेत. त्यांनीं कोणचेंही काम करणें झाल्यास सुलतानाचे विचारें करावें. असल्या कामास संमती देण्याचे अगोदर सुलतानानें रशियन सरकारचा विचार घ्यावा.

१६ यांत अर्मेनिया प्रांतांत सुधारणा करण्याविषयीं आहे.

१७ या लढाईचे संबंधानें जे लोक कैद झाले असतील त्यांस सुलतानानें सोडून द्यावें.

१८ इराण सरकारची सरहद्द दुरुस्त करून त्यास सुलतानानें खाटूर प्रांत द्यावा.

१९ सुलतानानें २१,००,००,००० रुपये लढाईचे खर्चाबद्दल रशियन सरकारास द्यावें. एशियामायनरमधील अर्दहान, कार्स, बाटूम, बायझिद हीं शहरें धरून सोधानलीडाग पर्यंत मुलूख व तुर्कीमधील सर्पंट व डेल्टा हीं बेटें दिल्यास १,६५,००,००,००० रुपये कमी करून बाकी पैसा सुलतानानें द्यावा. वर सांगितलेलीं बेटें रुमानिया सरकारास देऊन त्याबद्दल बसारेबिया प्रांत घेण्याचा अधिकार रशियन सरकारास असावा. वर सांगितलेले रकमेंत दीड कोट रुपये कान्स्टांटिनोपल येथील रशियन प्रजेचे झालेले नुकसानीबद्दल आहेत. त्या नुकसानीची चौकशी झाल्याबरोबर तुर्क सरकारानें तो पैसा द्यावा.

२० तुर्क कोर्टांमध्यें रशियन लोकांच्या फिर्यादी पुष्कळ दिवस चालू आहेत त्याचा ताबडतोब त्यांनीं निकाल करावा.

२१ यांत रशियन सरकारास जो प्रांत द्यावयाचा तेथील मुसलमान रहिवाशांचे मालमिळकतीबद्दल आहे.

२२ रशिया देशांतील यात्रेकरी व संन्याशी वगैरे लोकांस इतर देशांतील यात्रेकरी व संन्याशीलोकांप्रमाणें एशियामायनर मधील क्षेत्राचे ठिकाणीं जाण्यास मोकळीक असावी.

२३ आजपर्यंत उभय सरकारांमध्यें जे कांहीं तहनामे झाले असतील ते दोघांनीं ही पाळावेत.

२४ डारडनेल व बासफरस या दोन समुद्रधुन्यामधील रस्ते लढाईचे व शांततेचे वेळेस व्यापाऱ्यांचे जाहाजांस जाण्या येण्यास मोकळे असावेत.

२५ यांत रशियन सैन्यानें तुर्कीचा मुलूख सोडून जाण्याविषयीं आहे. तह कायम झाला म्हणजे बलगेरियांत जें सैन्य ठेवावयाचें तें सोडून बाकीचें सैन्य तुर्कीमधील तीन महिन्यांत व एशिया मायनरमधील सहा महिन्यांत रशियन सरकारानें काढून न्यावें.

२६ रशियन सैन्य ज्या ठिकाणीं असेल तें ठिकाण सोडून जाईपर्यंत तेथचा कारभार रशियन अधिकाऱ्यांनीं पहावा.

२७ रशियन सैन्यास कोणत्याही प्रकारें मदत केलेले आपले प्रजेपैकीं कोणत्याही मनुष्यास तुर्क सरकारानें शिक्षा करूं नये.

२८ लढाईत धरलेले कैदी एकमेकांनीं परत द्यावेत.

२९ हा तहनामा १५ दिवसांत सेंटपिटर्सबर्ग येथें कायम होऊन त्यावर दोन्ही सरकारच्या सह्या व्हाव्यात.

या तहाचा विचार करण्यासाठीं तारीख १३ जून रोजीं बर्लीन येथें सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींची सभा भरण्याचें ठरलें. त्यांत युरोपखंडांतील सर्व शहाणे व मुत्सद्दी जमले होते. एकंदर २० वेळ सभा भरून या तहाचे संबंधानें मोठी वाटाघाट होऊन तारीख १३ जुलै रोजीं तहनामा कायम झाला. पहिल्या तहनाम्यांतील फेरफार केलेलीं कलमें:—

१ बालकन पर्वताचे उत्तरेस एक आणि दक्षिणेस एक अशीं बलगेरिया देशाचीं दोन संस्थानें करून उत्तर भागावर एक मांडलिक राजा आणि दक्षिण भागावर एक ख्रिस्ती गवरनर नेमावा. दक्षिणेकडील संस्थान सुलतानाचे ताब्यांत देऊन बालकन पर्वतामधील रस्तेही त्याचे स्वाधीन असावेत.

२ रशियन सरकारानें आपलें ५०,००० सैन्य ९ महिनेपर्यंत बलगेरियांत ठेवावें, नंतर काढून न्यावें.

३ बोसनिया प्रांतांतील परागंदा झालेल्या लोकांचे संबंधानें आस्ति-

यन सरकारास दहा लाख रुपये खर्च आला म्हणून त्या सरकारानें बोसनिया व हरजिगोविना प्रांत आपल्या ताब्यांत घेऊन तेथील राज्यव्यवस्था करावी.

४ रुमानिया, सर्विया व मांटनिग्रो हीं संस्थानें स्वतंत्र असावीत; परंतु पहिल्याप्रमाणें त्यांनीं तुर्क सरकारास खंडणी देत जावी. बलगेरियांतील दोन्ही संस्थानांनीं तुर्क सरकारचें कर्ज फेडीस्तव खंड देत जावा.

५ बाटम, कार्स, बायझीद व अर्दहान हीं शहरें व यांच्या लगत्याचा मुलूख लढाईचे खर्चास्तव रशियन सरकारास सुलतानानें द्यावा.

६ सन १८५६ व १८७१ सालचे तहनामे कायम आहेत असें समजावें. बसारेबिया प्रांत रशियन सरकारास देऊन त्याबद्दल डान्यूब नदीचे दक्षिणेकडचा थोडा मुलूख रुमानियाचे राजास द्यावा.

७ डान्यूब नदींत व्यापारासाठीं सर्व राष्ट्रांच्या जहाजांस जाण्या येण्याची मोकळीक असावी.

बर्लीन येथें जरी सर्व मोठ्या राष्ट्रांचे अनुमतानें तहनामा झाला तरी युरोपखंडांतील मुसलमानांचें राज्य नष्ट झाल्यासारखें झालें. रुमेनिया, सर्विया, मांटनिग्रो हीं स्वतंत्र संस्थानें झालीं. बलगेरियाचे दोन भाग होऊन एक भाग स्वतंत्र स्थापन झाला व दुसऱ्या भागावर ख्रिस्ती गवरनर जनरल नेमून त्याचे मदतीस राज्यकारभार चालविण्यासाठीं सर्व राष्ट्रांचे वकील पंच नेमिलें गेले. थेसली, इपायरस व अलबेनिया या बाकी राहिलेले प्रांतांतील लोकांसही बंड करण्याची इच्छा उत्पन्न झाली. कान्स्टांटिनोपल शहराभोंवती शत्रूचे सैन्य होतेच, जवळ खजिन्यांत कांहीं शिलक नव्हती, व्यापार वगैरे बंद पडला होता, देणेदारांचा लकडा मागें होताच, हा सर्व विचार मनांत आणून सुलतान आपले दुःखांत होता तोंच रशियन सरकारानें त्यापासून दुसरा तहनामा करून घेतला. त्यांत एकंदर १२ कलमें आहेत. त्यांतील सारांशः—१ तुह्मां आह्मांमध्यें आतां शत्रुत्व राहिलें नाहीं. २ बर्लीन येथील तहनाम्यानें स्यानास्टिफानोचे तहनाम्यांतील ज्या कलमांस बाध आला नाहीं तीं कलमें कायम आहेत असें समजावें. ३ रशियन सरकारांस दिलेलें प्रांताबद्दल ३२१० लक्ष रुपये वजा करून बाकीच्या पैशाचे हप्ते करून

द्यावेत. ४ तुर्क देशांत राहणाऱ्या रशियन प्रजेचे लढाईमध्यें जें नुकसान झालें असेल तें तुर्क सरकारानें भरून द्यावें. ५ या नुकसानीबद्दलचा पैसा १०७० लक्ष रुपायांपेक्षां अधिक होऊ नये. ज्यांची नुकसान झाली असेल त्यांनीं आपली फिर्याद दोन वर्षांचे आंत दाखल करावी. ६ लढाईंत कैद केलेले तुर्क शिपायांचे पोटगीचा खर्च सुलतानानें भरून द्यावा. हा पैसा २१ हप्त्यांत फेडावा. ७ रशियन सरकारास दिलेले प्रांतांतील राहणारे लोकांस तेथें राहणें न आवडल्यास त्यांनीं तीन वर्षांत आपली मालमत्ता, जमीन जुमला विकून निघून जावें. जर या मुदतींत ते लोक न जातील तर ते लोक रशियन सरकारची प्रजा आहे असें समजलें जाईल. ८ दोघांनींही दोघां विरुद्ध गुन्हे केलेल्या गुन्हेगारांस माफी करावी. ९ लढाईचे संबंधांत जे लोक कैद झाले असतील त्यांस सोडून द्यावे. १० लढाईमुळें पूर्वी झालेले जे तहनामे मोडले असतील ते आतां कायम आहेत असें समजावें. ११ रशियन प्रजेच्या नुकसानीबद्दल झालेले हुकुमनामे सुलतानानें स्वतः पहावेत. १२ तहनामा पसंत होऊन त्यावर सह्या झाल्या कीं त्यांत लिहिल्याप्रमाणें अंमल सुरूं करावा.

बोसनिया व हर्जिगोविना हे दोन प्रांत आस्ट्रियन सरकारानें घ्यावेत असें ठरलें होतें. त्याप्रमाणें ते प्रांत ताब्यांत घेण्यास त्या सरकारानें आपलें सैन्य पाठविलें. आपण आतां पराधीन होणार हें पाहून तेथील लोकांनीं बंड केलें. त्या बंडवाल्यांच्या आणि आस्ट्रियन सरकारच्या बऱ्याच लढाया झाल्या. नंतर ते प्रांत त्यांचे ताब्यांत गेले.

थेसली व इपायरस या दोन देशांत ग्रीक लोक राहतात; म्हणून ग्रीक सरकारानें ते प्रांत मिळविण्याची संधि बरी आहे असें समजून लढाई चालली असतांच खटपट चालविली होती. पुढें बर्लीन येथील सभेमध्यें ग्रीक सरकार व तुर्क सरकार या दोघांनीं एक विचारानें सरहद्द दुरस्त करावी असें ठरलें होतें. तें प्रकरण अद्याप तसेंच राहिलें आहे. ग्रीक सरकारास फ्रेंच सरकारची मदत आहे. तेव्हां तें प्रकरण कोणत्या थरावर जाईल त्याचा आज निर्णय करितां येत नाहीं.

जिकडे तिकडे दंगा चालू आहे हें पाहून अलबेनिया देशांतील

लोकांसही दंगा करण्याची इच्छा उत्पन्न झाली. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं महमदअलीपाशास सुलतानानें पाठविलें. त्यास त्या लोकांनीं ठार मारिलें. अशा प्रकारें लढाईंत उदयास आलेल्या एका सरदाराचा शेवट झाला. नंतर लागलीच त्या प्रांतीं सुलतानानें बंदोबस्त करून तेथील बंड मोडिलें.

तहनाम्याप्रमाणें अंमल सुरू करण्यास रुमानियासाठीं एक, सर्वियासाठीं एक, मांटनिग्रोसाठीं एक व बलगेरियासाठीं एक अशी जिकडे तिकडे कमिशनेंच झालीं होतीं. त्यांतील बलगेरियाचे भाग करण्यासाठीं जें कमिशन नेमिलें होतें त्यास मात्र रशियन लोकांनीं हस्ते परहस्ते आणवतील तितके अडथळे आणिले. कारण बलगेरियाचे दोन भाग करावे असें त्यांचे मनांत नव्हतें; परंतु त्यांच्या खटपटीचें कांहीं सार्थक झालें नाहीं. या देशाचे दोन भाग होऊन एका भागावर तेथील लोकांनीं निवडलेला जर्मन राजपुत्र राजा झाला; आणि दुसऱ्या भागावर सुलतानानें आलेकोपाशा नांवाच्या एका ख्रिस्ती मनुष्यास गवरनर जनरल नेमिलें.

तहनाम्यावर परस्पर सरकारांच्या सह्या झाल्यावर ४० दिवसांत रशियन सैन्यानें तुर्कीचे राज्यांतून निघून जावें असें ठरलें होतें. त्याप्रमाणें सह्या झाल्यावर प्रथम बाटूम बंदर तुर्क सरकारानें रशियन सरकारच्या स्वाधीन केलें कीं लागलीच एशियामायनर प्रांतांतील रशियन सैन्य निघून गेलें. बाटूम बंदर व त्याच्या भोंवतालचा प्रांत रशियन सरकारचे ताब्यांत गेला हें पाहून त्या प्रांतीं लाझी जातीचे जे लोक राहत होते त्यांस तें पसंत वाटलें नाहीं. तीन वर्षेपर्यंत दर एक मनुष्यास दररोज आडीच आण्याचे पैसे व दीडशेर मका देण्याचें रशियन अधिकाऱ्यानें कबूल केलें होतें परंतु तेथें राहण्यास कोणी कबूल झाला नाहीं. त्यांनीं आपलीं घरें दारें व बागबगीचे सोडून ते लोक तुर्क राज्यांत ट्रेबीझांड येथें जाऊन राहिले.

सुलीमानपाशास जिकडे तिकडे अपजय आला हें पाहून सुलतानाची त्यावर गैरमर्जी झाली आणि त्यावर खटला करून १५ वर्षांची कैद देऊन किल्ल्यांत टाकिलें. उस्मानपाशानें बहादरी केली ह्मणून त्यास लष्करी खात्याचे प्रधान केलें.

खिस्ती लोकांवर मुसलमानांनीं जुलूम केला असा आरोप तुर्क सरकारवर ठेवून राशियन लोकांनीं ही लढाई केली. या लढाईंत तर राशियन यांनी आपले दांडगेपणाची कमाल केली. ज्या गांवीं जावें त्या गांवांतील मुसलमानांवर त्यांनीं नाहीं तसा जुलूम करावा. ज्यांचे आंगांत शक्ति असे ते तर पळून जात, परंतु म्हातारीं माणसें, बायका, मुलें वगैरे तें घरीं राहत. त्यांनीं मोठी आग पाखडली. मुसलमानाचें घर ह्मटलें कीं तोफ उडवून लावावें किंवा मशालीनें पेटवून आग लावावी, आणि कांहीं माणसें असल्यास आंतच जाळून टाकावीत. बाहेर कोणी त्याची नाना प्रकारें विटंबना करावी. पळून गेलेले लोक एकटे दुकटे जात नसत. या लोकांची सुमारें ९०।६० ह-क टोळी दक्षिणेकडे जात होती. त्यांबरोबर सुमारें ३०।४० ड्या होत्या. त्यांत बायका व मुलें बसलीं होतीं. पुरुष मंडळी ळली होती. त्यांवर राशियन स्वारांच्या एका टोळीनें येऊन ला. तीस मुसलमानांनीं माघारीं पिटवून लाविलें. दुसरे दिवशीं कांहीं पायदळ व तोफा घेऊन आले, आणि त्या गाड्यांवर शारा करून त्या निरपराधी बायका, मुलांस ठार मारून टा-शिवाय सुमारें पांच पंचवीस गांवें याचवेळेस जाळिलीं. लढाई ल्यावर ही गर्दी उडविली. मग लढाईचे वेळेस त्यांनीं का केला असेल याची कल्पनाच होत नाहीं.

प्रकारें राशियन लोक जुलूम करिताहेत हें ऐकून रोडोप पर्व-सलमान लोकांनीं कट करून बंड केलें. ते लोक सुलतानास राजा ह्मणून मानीत पण त्याचा हुकूम मानीत नसत व त्यास नसत. करनल सेंटक्लेयर नांवाचा एक इंग्रज त्यांचा मुख्य त्यांनीं जेवढा मुलूख आपले ताब्यांत घेतला होता त्याचे तीन करून त्यावर तीन अधिकारी नेमिले होते. सर्वांवर सेंटक्लेयरचा र होता. त्यांचें एकंदर ४०,००० सैन्य जमलें होतें. त्या त्या व राशियन लोकांच्या दोन चार लहान लहान लढाया यांत बंडवाल्यांसच जय मिळाला. ते आपले हद्दींत कोणास सत व हद्दीबाहेरचीं गांवें लुटीत. अशा प्रकारें तें बंड बरेच आलें असतां सेंटक्लेयरवरच फितुराचा आरोप त्यांनीं आणिला;

यामुळें तो पळून गेला. नंतर लवकरच त्या बंडाची वाताहात झाली.

सर्वस्वी नागवलेले व अनाथ झालेले मुसलमानांची रोडोप पर्वत पासून ते कान्स्टांटिनोपल शहरापर्यंत गर्दी झाली होती. गांव राहण्यास घरें मिळेनांत ह्मणून हजारों लोक रानांत झाडांचे आश्र राहिले होते. धर्मार्थ कोणी कांहीं आणून दिल्याशिवाय खाण किंवा पांघरण्यास त्यांजवळ कांहीं नव्हते. लढाई संपल्यावर त्या लोक व्यवस्था लावण्यास तुर्क सरकारास नाकोंनळ आलें. कारण त्यांच्या घरा रांची व शेतमळ्यांची रशियन लोकांनीं धूळधाण करून टाकली होत

तुर्क राज्य संभाळण्यासाठीं व त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं इंग्र सरकारानें पुष्कळ खटपट केली, परंतु तें प्रकरण भलत्याच थरास जाऊन पोहोंचलें. जर्मनी, रशिया व आस्त्रिया या तीन देशांचे बादशहांचा जो एकांत झाला त्याचप्रमाणें गोष्ट घडून आली. यांत रशिया व आस्त्रिया, या दोन देशांचा फायदा झाला व दोघांसही मुलख मिळाला हें त्या एकांताचेच फळ होय. जर्मन बादशहास मात्र या प्रकरणांत कांहीं मिळालें नाहीं. त्याला काय द्यावयाचें त्या एकांतांत ठरलें आहे तें कांहीं अद्याप बाहेर आलें नाहीं. या त्रिकुट बादशहांचा सन १८७३ सालीं गुप्त विचार ठरला. त्यांतील एक प्रकरण सन १८७७ सालीं उघडकीस आलें. बाकीचीं प्रकरणें कधीं व केव्हां उघडकीस येताल तीं येवोत. परंतु यांत एक गोष्ट सिद्ध झाली. ती ही कीं, या त्रिकुट बादशहांचा जो विचार ठरेल त्यास अडथळा आणण्याचें सामर्थ्य युरोपखंडांत कोणाचे आंगीं नाहीं. इंग्रज सरकारचे हितास धक्का बसल्याशिवाय ते कोणाचे खटल्यांत हात घालीत नाहींत हें उघड दिसावयास लागलें आहे. फ्रेंच सरकार तर नुक्तेच लढाईंतून सुलाखून निघाले आहे. त्यांतून तेथें प्रजासत्तक हें नवीनच राज्य झालें अस. त्यामुळें त्यांस आपलीच व्यवस्था करण्याची मारामार पडली आहे. इतालियन सरकार कांहीं तरी मिळेल या आशेनें त्या त्रिकुट बादशहांचे गुलाम बनले आहे. अशीच आणखीं कांहीं वर्षें गेल्यास युरोपखंडाचा नकाशा अगदीं बदलून जाईल असा सुमार दिसतो. तुर्कीचे प्रकरण अजून पहिल्याप्रमाणेंच भयोत्पादक राहिले आहे. पुढें मागें तेथें काय यादवी होईल याची कल्पना करवत नाहीं.